म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १५४०
१६६४
REFBK-0013749



# जटायु

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36559 वि:
क्रमांक 2540 नों: दि:

# जटायु

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

प्रि. सुमेरजी
एम्. ए. बी. टी.

मूल्य चार रुपये

REFBK-0013749

सुरसग्रंथमाला, सोलापूर.

प्रकाशक : न. गौ. व्होरा
सुरसग्रंथमाला, सोलापूर.

★

सर्व हक्क प्रकाशकाधीन
प्रथमावृत्ति : १९६४

★

मुद्रक : पु. म. गोखले
रमेश प्रेस, ७०२ सदाशिव, पुणें २.

★

## तीर्थस्वरूप श्री. माणिकचंद चवरे

" ज्यांनी अत्यंत ममतेनं आणि सौहार्दानं
अनेकांचीं जीवनपुष्पें फुलविलीं आणि
आपल्या निस्वार्थी सेवेने अने-
कांना 'माणूस' बनविले
त्यांना......"

सादर समर्पित

# निवेदन

' जटायु ' ही एक चिंतनिका आहे कीं ' संवादिका ' आहे हें वाचकांनी ठरवावयाचें आहे. हें लहानसें पुस्तक सेवेत सादर करतांना आनंद या गोष्टीचा आहे कीं अनेक भारतीय संत, पंथ, आणि पुस्तकें यांच्या नित्य वाचनानें जो अस्सल भाग मनावर चित्रित झाला आहे तो अगदीं साध्या, सरळ भाषेंत मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् हा प्रयत्न करतांना भारतीय संस्कृतीचीं चिरमूल्यें मी डोळ्यासमोर ठेवली आहेत. पाश्चात्यांचे अंधानुकरण जसे मला त्याज्य आहे तसेच पौर्वात्यांची अंधश्रद्धाहि मला अमान्य आहे. जीवनाचा विकास हा ज्याचा त्याचा प्रश्न असून त्यानें विवेकाने तो सोडवावा असें मला नेहमींच वाटत आले आहे.

आजच्या आणीबाणीच्या काळांत ' जटायू ' ची देशाला आवश्यकता आहे असें मला वाटते. जटायू हा केवळ पक्षी नाहीं. त्याच्या पाठीमागे एक संस्कृति आहे. एका सीतेसाठीं प्राणपणाने दुष्टत्वाशी उभे वैर मांडणारा जटायू पाहिला आणि पाकिस्तानी लोकांकडून होणाऱ्या आमच्या स्त्री–जातीची विटंबना व ती पाहून डोळ्यावर पट्टी बांधून पंचशीलाचे दुबळे धोरण अवलंबिणारे आमचे सरकार पाहिलें तर आजच्या या काळांतहि त्या जटायूची तीव्रतेने आठवण होते. आपले सामर्थ्य रावणाच्या दुष्टत्वापुढें हीन प्रतीचे आहे, हे माहित असूनहि शारीरिक सामर्थ्यापेक्षां निष्ठेचें सामर्थ्य हेंच शेवटीं महनीय ठरतें, असा निर्णय घेऊन जटायूनें त्या घाताचा

मार्ग अवलंबिला. तें सामर्थ्य भारतीय जनतेंत निर्माण व्हावें हा हेतु या पुस्तकाच्या मांडणीत आहे.

या लहानशा पुस्तकांत अनेक विषयांची मांडणी झाली असल्यानें कांहीं विषयांचा संकोच व कांहींचा विस्तार होणें अपरिहार्य झालें आहे. विषयांचें वैविध्य असलें तरी अंतःप्रवाह हा आहे कीं, मानवाचें मन जितकें आत्मरति केंद्रित होईल तितकें तें त्याच्या व समष्टीच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें श्रेयस्कर आहे. असो.

हे सारे निबंध एकत्रित करून घेण्याच्या कामीं व त्यांची निवड व संकलन करण्याच्या कामीं माझे परममित्र श्री हिरालालजी व्होरा यांनी जे सहकार्य केलें, तें म्हणजेच हें पुस्तक होय.

त्यांना या प्रसंगी कसे धन्यवाद द्यावेत हेंच कळत नाहीं. पण आतांच त्यांना धन्यवाद देऊन मोकळा होण्याची माझी इच्छा नाहीं.

१-५-१९६४ ] --लेखक

★

## अनुक्रम


* जटायु
* थोरपणाचा शोध
* भक्ति
* मुक्ति
* समता
* पुरुषार्थ
* पुण्य
* चेतना
* तत्त्वज्ञान
* सत्य
* जितं मया
* स्वातंत्र्याची प्रतिष्ठा
* अध्यात्म
* व्रती
* अव्यक्ताशी भांडण
* जीवन संघर्ष
* निवृत्ति–प्रवृत्ति
* सोईच्या तंबूतील प्रवासी
* मी सचित आहे


★

# जटायु

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३६५५९........ वि:
क्रमांक ......१५६०........ नों. दि. १८-१२-६

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १३६०७९
ठाणे (स्थळ प्रत)

# जटायु

मी पहिल्यांदा जेव्हां रामायण वाचलें तेव्हा माझ्या मनावर ज्या कांहीं व्यक्ति, स्थळें किंवा प्रसंग यांचा परिणाम झाला, त्यांतील अग्रत्व जटायूला मिळालें. कां, कोण जाणें माझें मन जटायु पक्षाकडे चिरकेंद्रित झालें. राम बोलून चालून आर्यविभूति ! शिवाय कुलपरंपरेने लाभलेलें भव्यत्व, दिव्यत्व इत्यादि गुण मूलतःच त्याजजवळ होते; पण जटायूकडे असें काय होतें ? पक्षीच तो. पण त्याची ती मूर्ति माझ्या मनावर चिर-अंकित झाली खरी. चित्रकार रविवर्म्यानं काढलेलं चित्रहि माझ्या वडि-लांच्या खोलींत मी पाहिलेलं होतं. परस्त्रीहरण करणाऱ्या रावणाला आपल्या सामर्थ्यवान पंखांनीं सपाटा मारणाऱ्या, चोचीनं त्याचं दिखाऊ मोठेपणाचं वस्त्र रक्तलांछित करणाऱ्या जटायूचं तें चित्र आजहि माझ्या मनःश्चक्षूंसमोर ताजं उभं आहे.

पण तुम्ही म्हणाल, " अहो, आजच तुम्ही हें काय काढलं ? रामायणांतील इतर पात्रें कां नव्हती तुम्हांला वर्णन करायला ? आणि जटायूचं एवढं कौतुक काय म्हणून करतां आहांत तुम्ही ? "

त्याचं कारण असं–

मी आणि माझे एक मित्र गतवर्षीं अजिंठा पहायला गेलों होतों. तेथील प्राचीन कलावैभव पहात असतांना माझे मित्र म्हणाले, किती अपव्यय आहे हा अर्थ व श्रमाचा ! अहो ही चित्रें, ह्या लेण्या, ह्या मूर्ति म्हणजे काय आमची संस्कृति ? जग चन्द्रावर चाललंय आणि आम्ही गतप्राण झालेल्या संस्कृतीला कवटाळून बसलों आहोंत. मला नाहीं वाटत यामुळें आम्ही कांहीं प्रगति करूं. इतक्या मोठमोठ्या गुहा आणि लेणी यांत हॉस्पिटलस् चांगली चालतील. शिवाय मोकळी हवा, रम्य वातावरण ! इ. इ.

मी म्हणालों– ' कल्पना छान आहे तुमची ! पण मीं एक विचारूं कां ? '

ते म्हणाले–, ' विचारा, अवश्य विचारा ! '

मी म्हणालों, ' केवळ भौतिक प्रगति म्हणजेच कां संस्कृति ? निसर्ग, नद्या, सौन्दर्यपूर्ण बागा, कलात्मक वस्तू, रम्य वातावरण, यांना जीवनांत कांहीं स्थान आहे कीं नाहीं ? जीवन म्हणजे उपभोग हाच दृष्टिकोण केवळ संपूर्ण नाहीं. जीवनांचा उपभोग धर्मेण, अर्थेण, कामेण घ्यावा हें भारतीय जीवनाचं महान् तत्व आहे. जीवन केवळ पैशांनीं मोजायचं नाही. केवळ धर्मानेंहि तें मोजायचं नाहीं. जीवनासंबंधींची कविवर्य बेंद्रे यांची एक कविता फारच मार्मिक आहे.

ते म्हणतात– ' रसानें जीवन उमलतें, वि–रसानें तें कोमेजतें व समरसतेनें तें दिव्य व रमणीय होतें. '

वरील त्यांचे वाक्य म्हणजे विविधप्रकारच्या जीवनांवर लिहिलेलें सूत्रकाव्य आहे.

आपण एखाद्या ' वादा 'नें ( ism ) पछाडले जातों व त्यामुळें विकृति म्हणजेच जीवन अशी चुकीची समजूत करून घेतली आहे आपण !

उद्यां कोणी चन्द्रावर जाऊन राहिला तर अज्ञ लोक त्याला 'देव' मानून पूजा करतील; पण भारतीय संस्कृति विमानचर रावणापेक्षां पादचारी रामाला जवळ करते. कां ? संस्कृतिसाठीं. आमच्या ग्रंथांत जटायु अमर ठरतो. कां तर तो भारतीय संस्कृतीचें प्रतीक आहे म्हणून !

वरील प्रसंगानेच जटायूचा उल्लेख मी त्यांच्याजवळ केला होता. त्यावेळीं मी त्यांना म्हणालो होतो कीं, जटायु ही भारतीय संस्कृतीची प्रेरणा आहे. जटायु हा भारतीय संस्कृतीचा अन्तश्चर प्राण आहे. जेव्हां विज्ञानवादी रावण एखाद्या स्त्रीच्या भक्तीचा फायदा घेतो तेव्हां जटायु तेथें उपस्थित होतो. भक्तिभावानें एखाद्या साधूला पाचारण करावं व तो साधू न निघतां सैतान निघावा हें जटायूला सहन होत नाहीं. जटायु त्या वेळीं खोटा अहिंसक बनत नाहीं. धर्माचं वेड पांघरून तो मौन धारण करीत नाहीं, किंवा विज्ञानवादी रावणाची स्तुतिस्तोत्रें गात नाहीं. जेव्हां सारी मानवजात पैशानें, अज्ञानानें अगर विज्ञानानें गुंगते, अकर्तव्यमूढ किंवा किंकर्तव्यमूढ बनते, तेव्हां जटायु मात्र जागा होतो. अन्याय, अधर्म सहन न करण्याची प्रवृत्ति जणूं जटायुचं रूप घेते. अत्यंत बलवान अशा भोगवादी रावणाला दंश करून तो हें दाखवून देतो कीं, तो जें करतो तें साध्या पक्षाला देखील पसंत नाहीं. त्याने तो विरोध नोंदविला याला मी फार महत्व देतों. आणि याच कारणामुळें जटायूची मूर्ति साकार होऊन माझ्या मनांत दडून बसली असावी.

भारतीय संस्कृति ही अनेक धर्मविचारांची बनलेली असली तरी तिच्यांत एकात्मप्रवृत्ति आहे. या संस्कृतीचा मूळ आधार माझ्यामतें दोन शिलांवर आधारित आहे. एक आमची अध्यात्मनिष्ठा व दुसरी स्त्री-प्रतिष्ठा. आमचें सर्व विचार आत्म्याप्रत पोंहोंचणारे म्हणून सामान्य अर्थानें आम्ही अध्यात्मनिष्ठ आहोंत. 'मेलें म्हणजे झालें' अशी विचार-सरणी आपल्याकडे पहिल्यापासूनच नाही. मेल्यानें संपेल तर मग मरा-यला अडचण असूं नये. पण तसें नाहीं. खरें पाहतां जीवन विशाल आहे. विकासाची मर्यादा अनंत आहे. जीवनाचा विनाश होत नाहीं. जीवन हें चिरकाल टिकणारें अमृततत्व आहे. संबंधपरत्वें, वयपरत्वें त्याला वियोग-

विनाशाचें लेबल डकविलें जातें; पण तें तसेंच आहे हें मात्र भारतीय संस्कृतीने कदापि मान्य केलें नाहीं.

आमच्या संस्कृतीचा दुसरा आधार आहे स्त्री-प्रतिष्ठा. भारतीय जीवन स्त्री-प्रतिष्ठेवर उभें आहे. गृहधर्म आणि गृहदाह याला स्त्रीच साक्षी आहे. आमच्या धार्मिक क्रिया, आमचीं व्रतें-वैकल्यें धर्मोपासना यांत स्त्रीला फार महत्व आहे. भारतीय स्त्री धर्मशील आहे. म्हणून भारतीय संस्कृति थोर आहे. हें जसजसें आपण विसरूं तसतसा विनाश जवळ आहे. स्त्री केवळ उपभोग्य वस्तु आहे अशी कल्पना घेऊन येणारे राजे या देशांत आले. अशी संस्कृति इथें कांहीं काळ नांदली, पण ते राजे व ती संस्कृति आपला प्रभाव पाडूं शकली नाहीं. याचा अर्थच हा आहे कीं, आमच्यांतील संस्कृतीचीं बीजें अद्यापहि जिवंत आहेत. तीं बीजें जर आपण जोपासलीं, तर विनाशक विज्ञानाच्या आहारीं मुळींच न जातां स्वतःचें सत्व सांभाळतां येईच. हें केव्हा घडणार आहे, हें जरी आज सांगतां येत नसले, तरी जोंपर्यंत रामायणांतील जटायु स्त्री-प्रतिष्ठेसाठीं स्वतःच्या सामर्थ्यानिशीं विरोधी-शक्तींशी लढावयास सिद्ध आहे, तोंपर्यंत मात्र भारतीय संस्कृतीला धोका नाही.

परकीय सत्ता ज्या वेळीं आक्रमण करते त्या वेळीं ती दोन गोष्टीवर हल्ला करते. पहिली गोष्ट म्हणजे आमचीं पूज्य श्रद्धास्थानें-देवळें, मंदिरें व दुसरी स्त्री. स्त्री, ही भारतीय संस्कृतींत महत्वाची वस्तु आहे. संस्कृतीचे महत् चक्र सुरळीत चालविण्याचें कार्य स्त्रीकडे असते. म्हणून एखादी संस्कृति वा एखादा समाज रसातळाला न्यायचा म्हणजे स्त्रीची अस्मिता, तिचें शील, तिचें पावित्र्य यांचें विडंबन करायचें. एकदां ती विडंबित झाली कीं ती गप्प बसत नाहीं. अनेक घरें ती नष्ट करतें. म्हणूनच भारतीय स्त्रीची प्रतिष्ठा अगदीं भगवान् ऋषभनाथांच्या कालापासून उच्च प्रतीची राखण्यांत आली आहे. भ. वृषभनाथ जेव्हां राजे म्हणून भारताचा कारभार पहात होते तेव्हां त्यांनीं आपल्या ब्राह्मी व सुन्दरी या दोन कन्यारत्नांना अनेक विद्या व कला स्वतः शिकविल्या. याचें कारणहि हेंच होय.

स्त्री ज्या वेळीं सुबुद्ध, जाणती, सोशिक राहिली त्यावेळीं भारतीयांचें घर हें स्वर्गस्थान बनले होतें. मंडनमिश्राची पत्नी वादस्पर्धेत मध्यस्त होत होती. भरतेश्वर आपल्या स्त्रियांच्या मेळाव्यांत अध्यात्माचें पाठ देत होते. सती सावित्री प्रत्यक्ष यमाला दटावीत होती. तारामती दास्य स्वीकारतांना देखील पतीला ' दुःख करूं नका ' म्हणून सांगत होती. रामाबरोबर सीता अनंत यातना सहन करीत होती. याचे कारण हेंच कीं या स्त्रिया भारताच्या संस्कृतीशीं एकरूप झाल्या होत्या, समरस झाल्या होत्या.

हेंच आज कमी पडत आहे. स्त्रिया शिकत आहेत हें खरें. पण स्त्री आणि पुरुष यांचें संबंध बिघडत आहेत. झपाट्यानें त्यांच्यांतील अंतर वाढत आहे. अनेक वर्षें संसार करूनहि, एकत्र राहूनहि एकमेकांशी ते एकरूप होत नाहीत. पतींचीं व्यंगें त्यांना दुःखदायक वाटत आहेत. इतरांच्या तुलनेने त्यांचा पति त्यांना अगदींच ' हा ' वाटत आहे. इथेंच धोक्याचा लाल कंदील आहे. पति आणि पत्नी यांच्या स्नेहावरच, त्यांच्या एकरूपतेवरच भावी पिढीचें भवितव्य अवलंबून आहे. असें माहीत असूनहि पाश्चात्य विचारांचें चुकीचें अनुकरण करणाऱ्यांना ही एकरूपता, हें भारतीयत्व पसंत नाहीं. स्त्रीला पुरुष उपभोग्य वस्तु वाटत आहे व स्त्रीहि स्वतःला तेंच समजत आहे. मानवाची जंगलीं वासना अशा संस्कृतीच्या सोंगाने जर पुनः फोफावली तर आमची स्थिति अगदीं हलाखीची होणार आहे.

लग्नानंतर इतरत्र प्रेमसंबंध चालविणें हा पहिला प्रमुख धोका आहे. हा धोका टाळण्यासाठीं भारतीय संस्कृतीने वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न केले. प्रथम तिने धर्माचा आधार घेतला. स्वदारसंतोष, स्वपति–संतोष हीं व्रतें घालून जणुं एक लक्ष्मण-रेषाच आखून दिली आहे; परंतु एवढ्यानें भागलें नाहीं म्हणून भोगांच्या पाठीमागें असलेली वासना ही कशी आहे व ती वारंवार भोगूनहि न संपणारी कशी आहे याचे जागोजाग दिग्दर्शन केलें आहे. स्त्रीला विषवल्ली म्हणूनहि तिनें संबोधिलें. याचें कारण स्त्रीचा तिरस्कार नसून मानवाचें मन भोगांपासून पराङ्मुख करावें हें आहे.

पण एवढ्यानें आज भागलें नाहीं. भागत नाहीं. अमेरिकन नग्न –सभ्यता अनेक साधनां आमच्यावर आक्रमण–आघात करीत आहे. आमच्यांतील अमृततत्व या विषानें मूर्च्छित होत आहे. स्त्रीपिशाच्च मनें तयार करून माथेफिरूंचें जग उदयाला आणण्याचा अट्टाहास अमेरिकेंत चालू आहे. स्त्रीचें समाजीकरण मोठ्याप्रकारें होत आहे. लोक बुवाबाजीला नांवें ठेवतात. बंड करतात. पण पाश्चात्य संस्कृति अगदीं प्रचण्ड साधनांनीं आमच्यांतील जटायु प्रवृत्ति मारूं पहात आहे. आपणांपुढें प्रश्न आहे की आम्ही उघड्या डोळ्यांनीं हे होऊं द्यायचें काय ?

मला हें माहीत आहे कीं वासनेला शारीरिक भूकेचें योग्य स्थान दिलें पाहिजे. पण भूक म्हणजे अघोरीवृत्ति नाहीं. आपल्याकडे भोजनाला यज्ञकर्म म्हटलें आहे. तसेच विषय–वासनेलाहि यज्ञ म्हटलें आहे. त्या वासनेला धर्मावगुंठित केलें असल्यामुळें तींतील हीनपणा कमी झाला आहे. पण धर्माचें कवचच भेदून काढल्यावर ती वासना मोकाट सुटली असल्यास नवल तें काय ? पुस्तकें, मासिकें, जाहिराती, गाणीं इत्यादि विविध रूपांनीं अहर्निश वासनाचें पोषण चालू आहे. यांतून दिसून येणारे धोके टाळले नाहींत तर गृहधर्म, गृहस्थ, गृहरत्न, गृहिणी या शब्दांना अर्थच उरणार नाहीं.

म्हणूनच मला आज प्रकर्षानें आठवण झाली ती जटायूची. त्याला ही शिकवण कुणी दिली नव्हती. रामाचा तो नोकर नव्हता. सीता त्याच्या नात्यांतली नव्हती. असें असतां देखील तो तिच्या रक्षणार्थ धांवून गेला होता. जटायूनें जें केलें तें काय केलें ? चांगल्या गोष्टीचा तो पाठीराखा होता. भारतीय अन्न त्यानें खाल्लें होतें. त्या संस्कारांत तो वाढला होता.

पण हें आज कुठें आहे ? म्हणूनच आज मला जटायु आवडतो. तें चित्र आवडतं. तें रंगविणारा रविवर्मा आवडतो.

●●●

# थोरपणाचा शोध

इसाप आणि सिकंदर या दोन शब्दांत दोन संस्कृति सामावल्या आहेत, असें कुणी म्हटलें असतें तरी विश्वास बसला नसता माझा. इसाप एक अत्यंत कुरूप गुलाम. अगदींच असंस्कृत ! आणि सिकंदर ? जगश्रेष्ठ अशा गुरूकडून विद्यासंपन्न झालेला ! साऱ्या जगाला आपल्या पराक्रमानें, प्रतिभेने आणि पौरुषाने जिंकून घेणारा महापुरुष ! असें असतां माझ्या या समजुतीला अगदीं खो देणारा प्रसंग आला माझ्यावरच !

कालचीच गोष्ट ! एका शिक्षकाने इतिहासाची प्रश्नपत्रिका काढली होती. मी सहज ती पाहात होतों. इतिहासांतील अनेक गोष्टींतील आपणांस बरेंच गम्य आहे असा माझा विश्वास होता. कदाचित् वाचनाने तो वाढला असेल किंवा माझ्या ‘ अहं ’ साठीं तें विश्वासाचें वलय मी निर्माण करून घेतलें असेल. जणुं असला रेशमी कोश भोंवती असल्याशिवाय आपलें

वैशिष्ठ्य आणि वैदग्ध्य उठून दिसणार नाहीं. अशी भावना या माझ्या ' अहंते'च्या भोंवतीं होती.

गोष्ट अशी घडली. ती प्रश्नपत्रिका चाळतांना माझी नजर एका प्रश्नावर खिळली. माझ्या भुंवईवर आंठी पडली. मी म्हटलें—' काय मूर्ख आहे हा माणूस ? इसाप आणि अलेक्झांडरची तुलना करा. असा प्रश्न विचारण्यांत शहाणपणा तरी काय ? कुठे इंद्राचा ऐरावत आणि कुठे शाम भटाची तट्टाणी ! मी लगेच चपराशाला चिठ्ठी दिली. शिक्षकाला माझ्या खोलींत बोलावून घेतलें. आल्यानंतर त्यानें माझ्या चेहऱ्याकडे पाहिलें. माझ्या चेहऱ्यावरील संताप त्याला चटकन ओळखतां आला. घरांतील मुलां–बाळांचें किंवा खास आपल्या सुशील पत्नीच्या अशा सूक्ष्म विकारी भावना ओळखण्याची कधींच खटपट न करणारा माणूस आपल्या दप्तरांतील अधिकाऱ्याच्या आवडी–निवडी, चेहरे–मोहरे, शेरे–ताशेरे अधिक जवळून अभ्यासतो. कदाचित् यंत्रयुगाबरोबर उद्‌भवलेलें हें मानसशास्त्र असेल.

मी त्या शिक्षकाला किंचित वाढलेल्या स्वरांत विचारलें—' आपण या मुलांना असा कसा प्रश्न विचारला. इतिहासाचा त्याचा काय संबंध ? '

' कोणता प्रश्न ?' शिक्षक कांहींसे चांचरत पण निश्चियानें म्हणाले. ' हाच. तुम्ही ही जी इसापची आणि सिकंदरची तुलना विचारली आहे, ती कोणत्या आधारावर ?

इसापने पांचपंचवीस गोष्टी लोकांना सांगितल्या असतील परंतु त्याला सिकंदराच्या तुलनेला बसवावें हें मला नाहीं पटलें. जगज्जेता सिकंदराचा गुरु विश्वविख्यात अरिस्टॉटल ! आणि त्याचा महान् शिष्य सिकंदर ! त्याचं आणि इसापाचं काय नातं ? तुम्ही प्रश्नपत्रिका मला आगाऊ कां नाहीं दाखविली ? प्रश्न विचारतांना देखील आपण काय विचारतो यांचा विचार नको कां करायला ? ' इ. अनेक गोष्टी मीं त्यांना सांगत गेलों. ' परीक्षेचा मुलांच्या जीवनावर परिणाम होतो. असले अवघड प्रश्न किंवा विचित्र प्रश्न विचारून तुम्ही परीक्षेचे मूळ हेतूच नष्ट करीत आहांत.'

अशा रीतीनें तत्त्वोपदेश, जो सर्वांनाच सुखी अवस्थेंत करतां येतो, तो मी करीत होतो.

त्यानंतर मी शिक्षकांच्या चर्येकडे पाहिलें. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान होतें. मला वाटलें माझ्या सदुपदेशाचाच हा परिणाम असावा. परंतु ते शिक्षक म्हणाले, ' आपलीं कांहीं आडकाठी नसेल तर मला कांहीं सांगावयाचें आहे.'

' अवश्य, तुम्हाला तुमची बाजू मी मांडूं दिलीच पाहिजे. लोकशाही आहे ! लोकशाहीच्या या मौलिक युगांत सर्वांना तो अधिकार आहे. सांगा तुम्हांला काय सांगायचें आहे तें ?'

' अधिकार म्हणून मी कांहीं सांगणार नाहीं. तशी माझी पात्रता नाहीं. इसाप बंधीं तुमची कल्पना माझ्याहून फार भिन्न आहे. ती अधिक कंझर्व्हेटिव् आहे. माझी इसापची कल्पना फारच वेगळी आहे. इसाप शरीराने गुलाम होता. त्याचे पूर्वजहि गुलाम होते. परंतु माणूस हा प्राणीच गुलाम नाहीं का ? आपण सारे गुलाम ! कल्पनेचीं वस्त्रें वेगळीं वेगळीं ! कुणी पुस्तकी ज्ञानाचे गुलाम, तत्त्वज्ञानाचें गुलाम, देहाचे गुलाम, मनाचे गुलाम, गुलाम नाहींत कोण ? सुख आणि भोग यांचें आपण गुलाम नाहीं का ? म्हणूनच इसापची गुलाम म्हणून केलेली निंदा मला पसंत नाहीं.'

शिक्षक जरा भावनेच्या आवेशांत बोलत होते.

ते म्हणाले-' इसाप हा केवळ माणूस नाहीं. त्याची एक संस्कृति आहे. इसाप शब्दांत एक संस्कृति आहे. त्यानें जगाला दिलेला गोष्टींचा सांठा हा अमृत-कलश आहे. इसाप मरून हजारों वर्षे झालीं. परंतु त्यानें मानवाला दिलेली ही देणगी जगांतील सर्व भाषांत भाषांतरित झाली. इसाप तत्वज्ञानी नव्हता. ऋषि-मुनी नव्हता, मोक्ष-स्वर्ग-नरकाची चर्चा त्याला करतां आली नाहीं हें कबूल. परंतु त्याने सामान्य जीवनांत कसें वागावें याचें नीट दर्शन मानवाला घडविलें आहे. आणि तेहि पशुपक्ष्यांच्या तोंडांतून !

सिकंदर हा सुशिक्षित खरा ! पण युद्धपिपासू होता. मानवाने मानवाला जिंकून गुलाम करावें कीं त्याला गुलामगिरींतून मुक्त करावें ? अरिस्टॉटलने

त्याला हें खासच शिकविलें नसावें. युद्धपिपासू वृत्तिपेक्षां गुलाम राहून मानवाला हंसत खेळत सन्मार्ग दर्शन करणें हें मी अधिक श्रेष्ठ समजतो. खरा गुलाम इसाप नाहीं. तो असूंच शकत नाहीं. खरा गुलाम सिकंदर ! मरतांना त्याला शोकानें मरावें लागलें. ज्याला आपले मनोविकार जिंकता आले नाहीं. तो योद्धा कसला? असह्य पीडेंतहि ज्यानें मनाला ताजेतवानें ठेवलें, वाळवंटातहि ओएसेसचें नंदनवन फुलविलें असा इसाप म्हणजे एक मानवी संस्कृतीचा नंदादीप आहे. त्याची उंची खुजी होती, तो कुरूप होता. पण आमच्या आत्म्याची उंची खुजी नाहीं का ? आमचा आत्मा विकारानं कुरूप झाला नाहीं कां ? म्हणूनच मला वाटतें सिकंदरापेक्षां इसाप श्रेष्ठ आहे. इसापच्या जगण्यांत अर्थ होता. त्याच्या त्या ' अर्थानेंच ' तो समृद्ध होता. तीन्ही विश्वांतील चराचर धनसंपत्ति आणि वैभव त्याच्या समृद्धीपेक्षां तुच्छ होती. विश्वविजेत्या सिकंदराला हा प्रश्न विचारला तर तोहि म्हणेल कीं–" इसाप म्हणजे सौंदर्य, सत्य आणि शिवाचें माहेर. त्याच्या जीवनांतील गोडी विश्वविजेत्याला यायची नाहीं. विश्वाच्या सीमारेषा, भौगोलिक मर्यादा नित्य बदलतात. तेव्हां कालचा विश्वविजेता हा आजच्या विश्वविजेत्यापेक्षां तुच्छ वाटतो.

आणि हें खरेंच नाहीं का ? चंद्र, मंगळ, बुध यांना बगलेंत मारणारे उद्यांचे संशोधक सिकंदरापेक्षां श्रेष्ठ नाहीं कां ठरणार ? म्हणून विश्व–विजेत्याचें यथार्थपण हें क्षणिक आहे. नाशवंत आहे. पण इसापचें वैभव नेहमींच जगापुढें मांडलें जाईल. माणूस चन्द्रावर, मंगळावर कुठेंहि गेला तर तो माणूस म्हणूनच राहील, माणूस म्हणूनच जगेल. तेथेंहि माझा इसाप जाईल. तेथेंहि तो ' गोष्टी सांगेन युक्तिच्या चार ' असें वागेल.

शिक्षकाचें डोळे तेजानें चमकत होते.

खरोखरच सिकंदराचें महान् यश इसपापुढें फिकें पडलें होतें. जग–ज्जेत्यापेक्षां हृदयजेता हाच प्रभावी ठरला होता. माझें मन म्हणत होतें इतिहासांत सिकंदराचें स्तोम फाजील आहे, नाटकी आहे. पाशविकतेचें बळ पाठीशी घालून मानवतेचें प्रदर्शन करणें हें लांछनास्पद नाहीं का ? इति–

हासांतील हे शूर योद्धे आजच्या मानवतेच्या प्रकाशांत किती खुजें दिसतात याचें मला आश्चर्य वाटलें.'

इसापाचें बळ शरिरांत नव्हतें. त्याच्या गुलाम अवस्थेंत नव्हते. तें होतें त्याच्या विचार–शुद्धींत–विवेकांत. 'भिंतिच्या उंचींत आत्मा राहतो कां कोंडूनी, मुक्त तो रात्रंदिनी।' ह्या ओळी इसापने जणुं सिद्ध केल्या होत्या. देहामुळें तो गुलाम होता पण विवेकानें तो मुक्त झाला. उंचीनें तो खुजा पण विवेकाने त्यानें इतरांनाहि खुजे ठरविलें होतें.

इसापचें चरित्र म्हणजे एक चमत्कारिक कोडें – एक रहस्य वाटलें मला !

मी त्या दिवसापासून इसापला गुरू केला. इसापने माझ्या मनांत नवीन विचार अंकुरित केला होता. मी अद्यापिहि विचार करीत होतों कीं अशा थोर माणसांचीं चरित्रें इतिहासांत कां नाहींत ? की अद्यापि माणूस तितकाच रानटी आहे जितके हे युद्धपिपासू लोक ! मी त्या शिक्षकांचे विचार ऐकून चकित झालों होतों. माझ्या शाळेंतील शिक्षक देखील इतका खोलवर विचार करूं शकतात याचा मला अभिमान वाटला. त्या वेळीं उगीचच वाटलें--

मानवी बंधनें ही स्वतःच्याच उन्नतीला काळ बनतात हेंच खरें !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 3५५५e....... दि: ..........
क्रमांक .................. नों. दि: २२-११-६८

# भक्ति

‘ आणि भक्ति म्हणजे काय ? ’ मी विचारलें.

आणि खरेंच काय उत्तर द्यावें, या विचारांत अण्णा होते. इतक्यांत मीच म्हटलें, ‘ भजणें म्हणजे भक्ति ! पण भजणें म्हणजे नेमके काय करणें ?’

अण्णा म्हणाले,– ‘ तुमचा प्रश्न दिसतो तितका सरळ नाहीं. तो बहुमुखी आहे. ऑक्टोपस ( अष्टपाद ) प्राण्याला विचारले कीं तुझे हात म्हणजेच तुझे पाय आहेत काय ? आणि तुझे पाय म्हणजे तुझे हात आहेत काय ? तसा तुमचा प्रश्न ! त्या प्रश्नाचें उत्तर मलाहि बहुमुखी म्हणा किंवा बहुपदीं म्हणा देणें भाग आहे.

मी म्हटलें, ‘ असा कोणता प्रश्न बहुमुखी नाहीं ? सारे प्रश्न आणि साऱ्या समस्या अशाच बहुमुखी (**many sided**) आहेत. परंतु मुखें अनेक असलीं तरी पोट एक आहे. मुख हा मार्ग आहे. ध्येय नव्हे. प्रश्नाचें स्वरूप अवघड किंवा बहुमुखी असलें तरी मूळ हेतु मानवी-हित हेंच आहे. ‘ प्रश्नासाठीं प्रश्न ’ इथे संभवत नाहीं.

अण्णा म्हणाले, ‘ खरें आहे ! भक्ति बहुमुखी आहे. कुणी शंकराची, कुणी शिवाची, कुणी विष्णूची, कुणी अल्लाची भक्ति करतात. देशभक्ति करणाऱ्यांची जातहि वाढली आहे, पण कितीहि झाले तरी हे सारे भक्तच ! पूर्वीं तुळशीची माळा, टिळा, टाळ, भगवी वस्त्रें हीं भक्त ओळखण्याची (बाहेरून) साधनें होतीं.

‘ आणि आतां ?’ – मी विचारलें.

‘ आणि आतां टोप्या-पांढऱ्या, काळ्या-पिवळ्या ! बाह्य आणि अभ्यंतर अशा दोन कसोटचा भक्ताला व भक्तीला लागूं केल्या तर त्यांत वावगे कांहीं नाहीं. कारण धर्म-धर्मी हें संबंधच त्या वावगेपणाचा परिहार करतील. ’

‘ अहो, पण भक्ति म्हणजे काय हें राहिलेंच कीं !’ –मी.

‘ भक्ति ’ ही व्याख्येची वस्तु नाहीं. व्याकरणानें फारतर थोडीशी अर्थनिश्चिति होईल; पण व्याकरण म्हणजे जीवन नाहीं. जीवनाच्या सौष्ठवाचा तो एक भाग. भक्ति ही आंतरिक समस्या आहे. भूक जशी जाणवते, ती जशी लागते तशी भक्ति जाणवली पाहिजे.

‘ भक्ति ही सात्त्विक असावी लागतें. कारण तिचें सामर्थ्य आंधळे आहे. भक्त जर सात्त्विक असेल तर भक्ति देखील सात्त्विक असेल. भक्त जर तामसी-क्रोधी असेल, पापी असेल, तर भक्ति ही देखील तामसी होते. राजावरील भक्ति, देशावरील भक्ति, धर्मावरील भक्ति यांचा अन्तर्भाव विशिष्ठ निष्ठेंत करावा लागेल.

भक्ति आणि निष्ठा यामध्ये अन्तर मानावे लागेल. त्यांचा क्रम निष्ठा अगोदर व भक्ति नंतर. निष्ठेशिवाय भक्ति व्यर्थ आहे. निष्ठा हा

भक्तीचा प्राणसंचारी भाव आहे. तुमची निष्ठा भौतिक जीवनावर असेल तर राष्ट्र व समाजाच्या केवळ भौतिक जीवनाकडेच तुम्ही आकर्षित व्हाल. अमेरिकेंतील लोकांचें जीवन समृद्ध वाटतें, रशियनाचें जीवन विकासी वाटतें. याचें कारण आपला दृष्टिकोण हा भौतिक आहे. एक व्यक्ति व त्या व्यक्तीची इच्छा-विचार यांना तिथें थारा नाहीं. याचा परिणाम कधीं कधीं व्यक्तिगत जीवन उध्वस्त होण्यांत होतो. एकांत जग पाहण्यापेक्षां जगांत सामावून जाण्याची पाळी त्याच्यावर येतें. ही पाळी अमेरिकेंतील लोकशाहींत व रशियांतील समाजशाहींतहि येतें. चीनच्या भौतिक विकासाच्या पायऱ्या जशा मोठ्या तशा नीतिहीनतेच्याहि मोठ्या.

' यासाठीं काय केलें पाहिजे ?' –मी.

" भक्ति म्हणजे काय ? हे नीट जाणून घेतलें पाहिजे. भक्ति ही सूर्यविकासी कमळासारखी आहे. आत्मज्ञानाचा सूर्य केव्हां उगवतो इकडे तिचें लक्ष असतें. जलांत उठणारा तरंग जसा हळूहळू संपूर्णांत सामावून जातो, त्याप्रमाणें माझें ' मीपण ' परमात्मपदांत सामावलें पाहिजे. भक्ति ही भक्तापेक्षां किंवा भक्त हा भक्तीपेक्षां वेगळा दिसतां कामा नये.

भक्ति हा शब्द दिसायला एक असला तरी तो त्रयात्मक आहे. एकात्मक नाहीं. ज्याची भक्ति करायची तो, जो करतो तो, व स्वतः भक्ति असे तीन घटक आहेत. प्रेमांत जसा त्रिकोण असतों तसा भक्तींतहि असतो. भज् याचा दुसरा अर्थ फारच ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. भज्-भागणें-दुभागणे-वेगळे करणें. भक्तींत नेमकें हेंच होतें. जडत्वाला चैतन्ययुक्त आत्मतत्वापासून वेगळे करणें हीच भक्ति खरी मानणें सयुक्तिक आहे.

" भक्ति आणि निष्ठेंतील फरक स्पष्ट करून सांगाल कां ? " मी.

" मी सांगायला बसलों आहे. निष्ठा हा जीवनाचा आधार आहे तर भक्ति आपलें ध्येय गांठून देणारे अमोघ अस्त्र आहे. जितकी निष्ठा दृढमूल तितकीच भक्तीची इमारत भरभक्कम होते. आचार्यश्री समंतभद्रांनीं एके ठिकाणीं म्हटले आहे तें अगदीं याच निष्ठेला उद्देशून. ज्या दैवतांची आराधना-पूजा-भक्ति आपण करतों त्याबद्दलची श्रद्धा कशी असावी-तर ' इदं एव , ईदृशं एव, अन्यत् न, च अन्यथा न ' अशी ' माझी

आराध्य दैवत हेच, असेंच, दुसरें नाहीं, दुसरें असूं शकत नाहीं. म्हणजेच श्रद्धेचें हें चतुष्टय तेथें असलें पाहिजे. खरी श्रद्धा निर्माण झाली नाहीं तर भक्ति ही विकृत होते. 'अमुक एक वस्तु देवाजवळ मागणारे व ती न मिळाल्यास देवाला शिव्या-शाप देणारे भक्त चुकलेल्या वाटेनं जात आहेत असें तुम्हास नाहीं कां वाटत ?'

'आत्मदर्शन ही भिकेची बाब नाहीं ती पुरुषार्थाची वस्तु आहे. आत्मदर्शनाची अभिलाषा भेकड मनुष्य बाळगूं शकत नाहीं. वज्रासारखें काठिण्य असल्याशिवाय आत्मदर्शन सुलभ नाहीं. 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास' हें त्या भक्ताच्या कारुण्याचें वर्णन आहे. त्याच्या हृदयाचें वर्णन आहे. पण पुढें 'वज्रासहि भेदूं' असें म्हटलें आहे तें वर्णन मात्र श्रद्धेचें आहे. भय, आशा, स्नेह आणि लोभ यापुढें श्रद्धा नम्र होत नाहीं. म्हणूनच जितकी श्रद्धा बलवान् तितकी साधनाहि बलवान !

'दुर्दैवानें आज अशी बलवती श्रद्धा दिसून येत नाहीं. संधिसाधूपणाच फार. पण यांत 'स्वार्थ साधतो' असें मानणें व समजणें भ्रामक असून अधोगतीचेंहि तें द्योतक आहे. तुमच्या समाजांत देखील अतिशय क्षेत्र, जागृत दैवत यांना महत्व कांहीं भक्त देतात. इथें देखील श्रद्धा चांगली असली तरी ती मुळांत विकृत होत आहे. केवळ महावीरांना आराध्य समजून त्यांची उपासनाहि मुळांत अशीच विकृत मानली गेली आहे. जिथें श्रद्धा गढूळ आणि लोभावर आधारलेली तिथें भक्तिदेखील विकृत मानावी लागते. याच तर्काचा आधार घेऊन जैन संस्कृतीनें वैदिक यज्ञ-यागाचें बंड मोडून काढलें. वेदांतील अनेक गोष्टी, ज्या उपासनीय गणल्या गेल्या होत्या त्याहि याचमुळें मागे पडल्या. उपनिषदकारांनीं 'आत्मा हाच उपास्य' आहे हें अत्यंत निक्षून सांगायला सुरुवात केली. हा सारा इतिहास मी वर सांगितलेली खरी निष्ठाच चिरस्थायी कशी होते हें सांगत आहे.

'मग भक्ति कुणाची करावयाची ?' मी विचारलें.

'भक्ति मूलतः आपण आपल्यांतील दिव्य जें परमात्मतत्त्व त्याची भक्ति केली पाहिजे. सध्या आपल्या आचार-विचारांत देहापलीकडील

विचार नसतात. आपली राष्ट्र–समृद्धीची कल्पना देखील आपल्या देहबुद्धीं–तून उगवलेली असते. पण गांधीजी सारख्यांनीं जेव्हां राष्ट्रसमृद्धीची कल्पना मांडली त्यांत मात्र त्यांची देहबुद्धि नव्हती. स्वतः इंद्रिय संयमी, आत्यंतिक त्यागी आणि अकिंचन होऊन त्यांनीं देशसमृद्धीचें तत्त्व सांगितलें. दिगंबर मुनि देखील राजांना राज्य कसें करावें हें सांगतात. त्यांत त्यांची स्वतःची देहबुद्धि नसतें. सर्व थरांतील लोकांच्या योगक्षेमाची निर्धास्ती झाली तर त्यांना धर्म सांगतां येईल, खरी श्रद्धा व निष्ठा त्यांच्यांत निर्माण करतां येईल अशी त्यांची भावना असतें. म्हणूनच खरा भक्त आपल्या भक्तीच्या मधुर सुवासाने साऱ्यांची पापें दूर करतो. स्वतः भगवंताच्या भक्तिरसांत तर डुंबतोच पण असंख्यांना देहभान विसरायला लावून कांहीं काळ पाप–मुक्त होतो.

‘ जे कार्य जगांतील कोणतेंहि पार्लमेंट करूं शकलें नाहीं तें कार्य एका एका भक्ताने केलेलें आहे. शासनसंस्थेनें कायदे करून हजारों वर्षांत जी नीति जनतेला शिकविली नसेल ती नीति भक्तांनीं आपल्या १०–१५ वर्षांच्या जीवन काळांत शिकविली. ती नीति आचरतांना कसल्याहि पोलिस दलाच्या देखरेखीची आवश्यकताहि जाणवली नाहीं. पूर्वीचें एक एक संत आणि भक्त म्हणजे जिवंत युनिव्हर्सिटी होती. श्रद्धेने अभिभूत झालेले शिष्य व ज्ञानी त्या भक्ताभोंवती गोळा होत. ज्ञानाच्या रसांत डुंबत. तेथें ज्ञान विक्रीला मांडलेलें नसे. लोभासाठीं ज्ञान, नोकरीसाठीं ज्ञान, अशी परंपरा नव्हती. आत्मानंदासाठीं ज्ञान असे. आत्म्याचे तमोगुण नष्ट व्हावेत असा तो सारा प्रयत्न असे.’

‘ आज तसें कां होत नाहीं.’–मी विचारलें.

‘ भक्ति नाहीं, श्रद्धा नाहीं. सारेच पैशाचे गुलाम. विद्वता ज्या राष्ट्रांत गुलाम बनते तें राष्ट्र कितीहि उन्नत झालें तर त्याचा टिकाव फार काळ लागत नाहीं. भारतांतील भक्तांनी राष्ट्राकरितां कांहीं केले नाहीं असा आक्षेप करण्यांत येतो. तेव्हां मी त्यांना म्हणतो की राष्ट्र ही कल्पना क्षुद्र आहे. आत्मा व आत्मविकासी तत्त्वज्ञान हेंच जगांतील अक्षय टिकणारें अमृत–तत्त्व आहे. त्यासाठी त्यांनीं झगडा दिला आहे. दानवी वृत्तीशी

झगडण्याचें सामर्थ्य दिलें आहे त्या संतपुरुषांनीं. त्याचाच परिणाम असा झाला आहे कीं अनेक आक्रमणांतूनहि आम्ही भारतीय राहिलों. युरोपांत हें होऊं शकले नाहीं, होणारहि नाहीं. त्यांची जीवन-निष्ठा रंग, वंश, भूमि व राष्ट्र यांवर आधारलेलीं आहे. आपली जीवननिष्ठा, 'सर्वांभूतीं परमेश्वर' पाहण्याची-म्हणजेच अहिंसात्मक आहे.

'अत्यंत परमोच्च भक्ति कोणती ?'-मी.

'परमोच्च भक्ति म्हणजे स्व-वश होणें. आत्मजित् होणें, भक्ति ही **objective** (परात्मक) नाहीं. भक्ति ही **subjective** ( स्वात्मक ) बाब आहे. ज्याला आपण देव समजतों, तो देव म्हणजे माझेंच परमोच्च असें तें दिव्य रूप आहे. तें मी शोधून काढावयाचें असतें. माझें मीपण अहंकारांत लोपलें असले म्हणजे तें गवसत नाहीं. सतत चिंतनानें, भजनाने, मननाने, स्वाध्यायाने तें 'स्वत्व' हुडकलें पाहिजे. अहंकार, अज्ञान लोपलें कीं तें 'मीपण' आपणाला गवसतें. स्व-आत्मदर्शनाची तीव्र ओढ लागली मात्र पाहिजे. अंतरात्म्याच्या दिव्य शोधांतून, प्रबोधांतून आपणास परमात्म-तत्त्व गवसलें कीं भक्ति संपते. भक्त-भाक्त आणि भक्ति यांची एकरूपता होतें. यालाच दुसऱ्या पद्धतीने 'सर्व-कर्म-विप्रमोक्ष' असें म्हटलें आहे. कारण कर्ममुक्त होणें हाच अंतिम शुद्धीचा खरा मार्ग आहे. भक्तीयोगांतून तें घडतें. ज्ञानयोगांतूनहि तेंच घडतें.

'सम्यक् दर्शन-ज्ञान व चारित्र्य यांची एकता म्हणजेहि भक्तीच काय ?'-मी.

'अर्थात्. मागे मी ज्या निष्ठेचें वर्णन केलें ती निष्ठा म्हणजेच अक्षय टिकणारें सम्यक्दर्शन. कोळशाचे कण न् कण अग्नीने पेटून निघाले तर त्याला लोक कोळसा म्हणत नाहींत. त्याला निखारा म्हणतात. तीच गोष्ट आपली आहे. आत्मनिष्ठा निर्माण झाली कीं सारें जगच पालटून जातें. दृष्टिकोणच बदलून जातो. ज्ञानहि सम्यक् होतें आणि चारित्र्यहि सम्यक् होतें. या तिहींची एकता म्हणजेच मुक्तीचा मार्ग. हीच गोष्ट भक्तींत घडतें. केवळ आत्मतत्त्वांत रस घेणारा सर्व-कर्म-निरपेक्ष होतो

व त्यांतच तो परमात्मतत्त्व पाहतो. जी गोष्ट भक्तींत घडतें तीच गोष्ट समाधींत घडतें. समाधींत तो सर्व आत्मशक्तींचा संकोच करून आत्मशोधन करतो. खरें जीवन त्याच्या दृष्टिपंथांत येतें. तेंच दिव्य जीवन जाणून घेण्याचा व तें जगण्याचा तो प्रयत्न करतो. अशा वेळी भक्ताची भक्ति परम सीमेला पोहोचतें.

' यालाच भगवान् आचार्य कुंदकुंद यांनी निव्वुदी भक्ति ( निवृत्ति भक्ति ) असें म्हटलें आहे. ज्या भक्तींत भक्त हा तृषार्त आहे, सतृष्ण आहे, भिकारी आहे, ती भक्ति भक्ति नाहीं. ती अरुण्यरुदनवत् आहे. ती भक्ति दीन आहे. '

' असें कसें म्हणतां ? भक्तानें मागावें व देवानें द्यावें, असें घडतें व तें आपण पाहतों ' –मी.

' छे छे ! भक्त मागतो एवढा भाग मी समजूं शकतो; पण त्याला जें जें मिळतें तें भक्तीने असें मात्र नाहीं. देव देत नाहीं. कारण देण्यासारखें त्याच्याजवळ कांहीं नाहींच. भौतिक सुखें जीं मिळतात त्याला कारण देव नाहीं, परमेश्वर नाहीं. '

' मग कोणतें कारण ?' –मी विचारलें.

' दानाच्या पाठीमागे जी कल्याणाची भावना मानवाच्या मनांत असते, त्या भावनेमुळे. माझ्या जवळ जें आहे तें ' अनंत हस्तां ' लुटलें जावें या मानवी भावनेनें. सूर्याच्या उष्णतेचा उपभोग, वाऱ्याच्या शीतलतेचा उपभोग, जलाचा उपभोग ज्याप्रमाणें लोक मुक्तपणें घेतात, त्याप्रमाणें पुण्यामुळें प्राप्त झालेल्या ऐश्वर्याचा उपभोग जो इतरांनाही उपलब्ध करून देतो त्यामुळें त्याला हें ऐश्वर्य बहरते–मरणांत अमरत्व बहरावें तसें !

" पण मला हें सांगायचें आहे कीं, कसल्याहि वासनेने तुमची भक्ति माखली जाऊं नये. भौतिकता तिला चिटकविली जाऊं नये, ' फक्त तव पादौ मम हृदये मम हृदयं तव पदद्वये लीनं ' हाच आदि अंतीं भक्तीचा हेतु असावा. परमात्मतत्त्वांत सामावून घेण्याच्या मंगल भावनेपलीकडे दुसरा हेतु नसावा.

'अर्थात् हें शक्य नाहीं, म्हणून फलाशापूर्ण भक्ति ग्राह्य मानूं नये. असमर्थतेमुळें उच्च ध्येय सोडून हीन भक्ति करावी हें तत्त्व मान्य होऊं नये. खरें म्हणजे असमर्थते ऐवजीं भक्तिसंबंधीं विकृत कल्पनाच याला अधिक कारणीभूत आहेत. म्हणूनच कोणतीहि भक्ति ही स्वयंपूर्ण हवी. भक्तीचें फळ आत्मप्राप्ति हेंच. त्यावेगळें फळ भक्तीला लागलें तर ती भक्ति परा-भक्ति नाहीं.'

त्यानंतर अण्णा हंसून म्हणाले-

'लक्ष्मीला लोक चंचल म्हणतात. पण मोक्ष-लक्ष्मी ही अचंचला आहे. तिथे कसलेंच चांचल्य नाहीं. चांचल्य वासनेंत असतें. वासना-क्षयांतून कैवल्य निर्माण झालें आहे. म्हणूनच जैन भक्तांनी 'मुक्ति-कन्या-कर-ग्रहणा'चा मार्ग आळविला आहे.

मुक्तिकन्येचे पाणिग्रहण याच भक्तिमार्गांतून होतें हें तत्त्व बिंबलें पाहिजे. तें झालें कीं भक्तीचा मार्ग विशुद्ध होतो. जप, तप, अनुष्ठान, यात्रा, पूजा हे सर्व या भक्तीसाठींच आहे. जिथें मुक्ति-कन्या-करग्रहण करण्याचा विचारच नाहीं तिथे वरील सारें व्यर्थ होय.

卐

∴

# मुक्ति

'मुक्तीची समस्या माझ्यामते सर्वांत मोठी समस्या आहे,' असें अण्णा म्हणाले. त्यांचें सांगणें असें–'मानवी जीवनाची सुरुवात शरीरानें होतें. शारीरिक गरजा भागवितांना त्याला अनेक श्रम पडले. अगदीं पाषाण युगांतील मानवापासून जरी आपण इतिहास पाहिला तरी 'अन्न-परब्रह्मासाठी' मानवाने अनेक प्रकारची तपश्चर्या केली. कच्या मांसाहारापासून तों सूक्ष्म जंतूंनीं युक्त अशा हरित–पीत–रक्त अशा वनस्पतीपर्यंत त्यानें मजल मारली. वनस्पतीचा आहार त्यानें शास्त्रशुद्ध मानला आणि अनेक प्रकारचीं औषधें, रसायनें, काढे तयार करुन त्याने आपली काया निरोगी ठेवली फुलांपासून अत्तरें मिळवून आपली सौंदर्यदृष्टिहि प्रकट केली.

अन्नाप्रमाणेच निवारा आरोग्य आणि वस्त्र यांची सोय करून तो निवांत झाला पण एवढ्यानेंच त्याचा प्रश्न संपला नाहीं. त्याला असें सारखें वाटत राहिलें कीं अद्याप कांही तरी अवशिष्ट आहे. देहाची भूक शमली तर मनाची भूक उद्‌भवली. मन जरी न दिसणारें इंद्रिय असलें तरी इतर इंद्रियाप्रमाणें तेंहि विशिष्ट घडणीचें बनत जातें. भारतीय मनाची रचना आणि फ्रेंच मनाची रचना यांत जमीन अस्मानचें अंतर आढळतें. हें मन म्हणजे मेंदू ( **Brain** ) असें मात्र माझें मत नाहीं. क्रोधादिक विकारांच्या निर्मितींत त्याचा बव्हंशी पुढाकार असतो. बव्हंशी म्हणण्याचा हेतु असा कीं हें मन तयार होतांना त्याच्या पाठीमागे गतजन्मीच्या संस्कारांचीं पूर्व-पीठिका आगाऊच तयार होते. आणि म्हणूनच आंतरिक संस्कारांचा हा एक गहन प्रश्न होऊन बसला आहे. मनाचे विश्लेषण फ्राईड कसेंहि करो त्यांत तथ्य नाहीं असें मी म्हणणार नाहीं. पण तें एकांगी असून केवळ प्रायोगिक मनाचें शास्त्रच त्यानें सांगितलें आहे. त्याहून मानसिक समस्या अत्यंत जटिल आहेत.

पण इंद्रियें आणि मन यांचे विषय सोडले तरी त्याच्या पलिकडे एक विश्व आहे. या विश्वाकडे पाहण्यासंबंधीचें औत्सुक्य दिवसेंदिवस कमी होत आहे. हे विश्व म्हणजे आत्म्याचे विश्व होय. आत्मा म्हटला म्हणजे प्रेतात्मा पाहिल्याचीं भीति कांहींच्या हृदयांत उत्पन्न होतें. आत्म्यावर श्रद्धा ठेवा अगर ठेवूं नका, परंतु त्याचें अस्तित्व त्रिकालाबाधित आहे. प्राणितत्त्वाचें प्रेरकत्त्व म्हणूनच नव्हे तर चिरकाल ज्याचें अधिष्ठान आहे असें आत्मतत्त्व हें प्राणितत्वाचें अविचल असें बीज आहे. या आत्मबीजापोटीं असलेल्या दिव्य गुणांची राजस–तामस रूपें म्हणजेच ही चमत्कारिक सृष्टि होय. नरक लोकापासून तो मानवलोकापर्यंत भिन्न भिन्न गुणांचें, अवस्थांचें मानस-दर्शन ही अत्यंत असाधारण गोष्ट आहे. कधी कधी आत्म–दर्शन झाल्याची ग्वाही देणारे महापुरुष आढळतात. असे पुरुष आपण वंदनीय मानतों. पण त्या–बरोबर हें विसरतों की केवळ वंदन केल्याने आत्म-दर्शनाचा लाभ आपणांस होणार नाही. आत्म–दर्शनाची अभिलाषा निर्माण होणें माझ्या मतें जीवनाचें

३६५४२ वि:
क्रमांक ........ नों दि: १६-११-६०



ध्येय असावें आणि हें ध्येय तेव्हांच असूं शकेल जेव्हां आपल्यापुढें मुक्तीची समस्या उभी राहील.

मी म्हणालों, "अहो अण्णा, तुमचे हे विचार बुरसट आहेत. मुक्तीची समस्या ही राष्ट्रीय समस्या असू शकत नाही. ती एका दोघींची वैयक्तिक समस्या असूं शकेल. संपूर्ण राष्ट्र मुक्ति-देवतेचें उपासक कसें असूं शकेल?'

त्यावर अण्णा म्हणाले, 'काय बुरसटलेलें आहे हें आताच सांगता येणार नाही. पण मानवाची सारी धडपड 'मोकळें होण्याची' दिसून येतें. रोग झाला की आपण रोग-मुक्तीसाठी किती धडपडतों? अज्ञानाचा नाश करण्यासाठी कोण आटापिटा चालू आहे! विश्वविद्यालयें, कॉलेजेस्, शाळा, शिबिरें, वर्तमानपत्रें, पुस्तकें, रेडिओ इत्यादि तवं साधनें तथाकथित अज्ञानाच्या मगरमिठींतून सुटण्यासाठीच आहेत ना! सुखासाठी धडपड म्हणजे दुःख-विमुक्तीसाठीच धडपड नाहीं कां? भ. महावीरांनी अहिंसेचा संदेश दिला तो हिंसेच्या कल्पनेंतून मुक्त होण्यासाठीच ना? आज पं. नेहरूसारख्या नेत्यांना आपण डोक्यावर घेऊन नाचतों. त्यांत देखील देशाच्या दास्यमुक्तीची कल्पनाच अंतर्भुत झालेली असते ना! इतकें दूर तरी कशाला जायचें? आपण कामांत आनंद मानीत नाही. काम करून मोकळे होण्यांत मानतों. यावरून मानसिक रचनाच जणु 'मोकळे होण्यांत' आनंद मानतें असा अर्थ नाही कां होत? एखादीं मोठी जबाबदारी तुम्ही स्वीकारतां व ती पार पाडून मोकळे होतांना तुम्ही आनंदित होता. म्हणूनच मला असें वाटतें की मुक्ति ही आमच्या जीवनाची चिरकांक्षित अशी अवस्था आहे. ही अवस्था आपण वेगवेगळ्या रीतीने अनुभवतों. मुक्ति ही केवळ कवि-कल्पना नाही.' – अण्णा.

'मग काय ती वस्तुस्थिति आहे?' मीं विचारलें.

अर्थात्. मुक्तीची कल्पना येणें ही मानवी संस्कृतीची परमोच्च अवस्था आहे. मानवाचा विकास भौतिक साधनांनी मोजणें ही पाश्चात्यांतील महान् घोडचूक आहे. त्यामुळे तिकडे आध्यात्मिक मूल्यांची किंमत नाही. ज्या वस्तूला किंमत नाही अशीं वस्तु त्या संस्कृतीला चालत नाही. साऱ्यांचा

'बाजार' भरविणें हें त्यांच्या संस्कृतीचें स्वरूप राजकारण, समाजकारण, नीतिमत्ता, प्रामाणिकपणा इत्यादि साऱ्या गोष्टी त्या बाजारापुरत्याच आहेत.

'तो बाजारीपणा हाच पाश्चात्यांचा महान् आजार आहे. आपल्याकडे तसें नाही. मानवी जीवन-तत्त्वांचा असा बाजार मांडणें हें आपल्याकडे धर्मविहित नाही. म्हणूनच 'आत्मा' हा आमच्या संस्कृतीचा आधार आहे. त्यासाठीच धर्म, त्यासाठीच देश व त्याचसाठी नीति वापरली गेली आहे. अशा आत्म्याच्या दिव्य शक्तीचा अंतिम विकास म्हणजे मुक्ति. म्हणूनच मीं तुम्हांला सांगितलें की मुक्ति हें ज्ञानाचें शिखर आहे. जेथें ज्ञानाची इंद्रियनिष्ठ मर्यादा संपून ती त्रैलोक्यव्यापी होते तेथेंच मुक्ति संभवते.

ज्ञान ही जर काल्पनिक वस्तु नसेल तर मुक्ति ही ज्ञानापासून वेगळी नाही. संपूर्ण आत्मव्यापी पदार्थ म्हणजेच ज्ञान. तें ज्ञान जेव्हा निष्कलंक होतें तेव्हाच माणुस खऱ्या अर्थानें मोकळा होतो.

आज ज्याच्याजवळ पैसा नाही तो मोकळा समजला जातो. म्हणजे पैसा हेंच जणुं जीवनाच्या मोजमापाचें साधन. पण हें अज्ञानमूलक आहे. विकार व वासना यांनी ज्ञान लिप्त झालें की ज्ञान अज्ञानाचें पांघरूण घेतें. त्याशिवाय ज्ञान जगूंच शकत नाही. अज्ञानाचें कवच हें भक्कम असलें तरी अभेद्य नव्हे. विवेकाने अज्ञानाचें दिखाऊ कवच भेदलें पाहिजे. पण हें कळण्याइतकें 'ज्ञान' तरी उरलें असलें पाहिजे. ज्ञानांतूनच आनंदाचा उगम होतो इकडे आपण सारे दुर्लक्ष करतों. सोनें, हिरे, माणकें, बाग, बंगले हीं साधनें आहेत हें कळणें हेंहि एक ज्ञानच आहे. ज्ञानांतूनच तीं आपणांस उपलब्ध झालीं आहेत. त्याचा उपभोग हाहि ज्ञानेंद्रियांमार्फत होतो हें शास्त्रज्ञहि कबूल करतात. सर्व प्रकारची जाणीव हा ज्ञानाचाच अविभाज्य अंश होय. एका पंडिताने म्हटलें आहे की आपणांस जें गम्य होत नाही त्यासंबंधी जाणीव ठेवणारा शहाणा होय.'

'तरी पण मला अद्याप हें समजत नाही की मुक्तीची समस्या ही जीवनप्रधान कशी आहे. कारण मुक्ति म्हणजे एक प्रकारचें मरण. मुक्ति म्हणजे या संसारांतील सुखापासून वंचित होणें.' – मी.

‘ मुक्तीची समस्या ही जीवनप्रधानच आहे. उलट ज्याला आज तुम्ही जीवन म्हणतां तें मात्र मरणाच्या भीतीने ग्रस्त आहे. त्या तुमच्या ‘ जीवनाला ’ आदि आहे, आणि शेंकडो अंत आहेत. तुमच्या साऱ्या समस्या मृत्यूच्या भीतीशी जोडल्या गेल्या आहेत. तुमच्या जीवनाचा सौदा होतो. तें जीवन तुच्छ पैशाच्या मोडक्या आधाराने जगतें. त्याच्या अभावी दीन होतें. सारें सामर्थ्य त्या दीनतेच्या – लाचारीच्या उशाशीं असतें. ’

‘ मग तुमच्या जीवनाच्या कल्पना कोणत्या ? ’ – मी.

‘ माझ्या जीवनासंबंधीच्या कल्पना ह्या अधिक वस्तुनिष्ठ आहेत. त्या कल्पना ज्ञानप्रधान आहेत म्हणून अधिक व्यापक व चिरंतन आहेत. सूर्याला जसें अन्धःकाराचें भय नाहीं तसें जीवनाला मरणाचें भय नसावें. जिथें तें भय आहे, तिथें मानवी गुणांचा नाश होतो. निर्भयता हा अत्यंत तेजस्वी असा जीवनाचा कणा आहे. जीवन निर्भयत्वाच्या सांवलींत वाढलें पाहिजे. पण असें घडत नाहीं. लोकशाही राज्यांतही तसें घडूं नये हें आश्चर्य आहे. जनता या नाहीं त्या भीतीनें ग्रासलेली दिसून येतें. त्या भीतींतून प्रथम तिची मुक्तता केली पाहिजे. निर्भय मनांतच सत्याचें व ज्ञानाचें बीज रुजतें. म्हणूनच माझी जीवनविषयक कल्पना अत्यंत वस्तुनिष्ठ आहे असें मी म्हणतो. जीवनाचा आत्मा आहे ‘ ज्ञान ’ ! तें ज्ञान मुक्तीसाठीं असावें अशी प्राचीन ऋषि–उक्ति आहे. उच्च वाङ्मय जसें ‘ परतत्त्वस्पर्शी ’ असतें तसें उच्च जीवन हेंही ‘ परतत्त्वस्पर्शी ’ असतें. जिथें जीवन तसा आकार घेऊं शकत नाहीं तिथें तें कृत्रिम बनतें. ‘ जीवन जगण्याची ’ अभिलाषा तेथें नसते. जीवन उपभोगण्याची कल्पना तिथें नसतें. पैसा जसा खर्चतात तसें जीवन खर्चलें जातें. उपभोगाची कल्पना ‘ जीवन जगण्यांत ’ नाहीं. जीवन म्हणजेच आनंद. तिथें जीवन खर्ची घालून आनंद मिळवण्याची कल्पनाच मूलतः दूषित आहे. उपभोगाच्या मुळाशी भीति आहे. मृत्यूची–नश्वरतेची. संपून जाईल म्हणून त्या जीवनाचा लवकरांत लवकर उपभोग घेण्याकडे कल असणें ही जीवनाची दूषित व्याख्या आहे. जीवन आणि ज्ञान वेगवेगळें नाहीं. ज्ञानच जीवनरूपानें

साकार झालेलें आहे हें उमजलें पाहिजे. असें ज्ञानमय जीवनच ' परतत्त्व-स्पर्शी ' असूं शकेल.

इतकेंच नव्हे तर भारतीय तत्त्वज्ञानी लोकांनीं मोक्ष हा सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ म्हणून सांगितला. पुरुषाकार आत्म्याचा अंतिम दिव्य अर्थ ( लक्ष्य, ध्येय ) म्हणजे मोक्ष. हा मोक्ष भारतीय जीवनाचा ध्येयबिंदू आहे. सारें जीवन त्या ध्येयाच्या साधनेंतच जगायचें असतें. त्या मोक्षाची साधना ही आंतरिक प्रेरणा आहे. ती जागृत झाल्यावर वखवखलेलीं इंद्रियें संयत होतात. देहाची भुरळ संपतें. ज्ञानाचीं किरणें मंगल आत्मसाधनेकडे वळ-तात. भीतीचीं वलयें अनंतांत विरतात. अज्ञान भूतकाळाच्या रूपांतच अवशिष्ट असतें. '

' पण ही मोक्षाची कल्पना आलीच कशी कुणाच्या डोक्यांत ? '–मी

' देहधारणेबरोबर खाण्यापिण्याच्या प्रेरणा जशा निर्माण होतात तशा. आपलें ज्ञान जीवनाभिमुख झालें कीं मोक्षाची प्रेरणा निर्माण होते. भ. बुद्धानें एक मोठी गमतीची उपमा दिली आहे. तें एकदां आनंद भिक्षूला म्हणाले––

' वासरूं एकदां बैल झालें कीं तें आईच्या दूधांसाठीं तडफडत नाहीं ते त्या अवस्थेंतून मुक्त होतें. तसाच माणूस ' ज्ञानी ' झाला तर तो वासनामुक्त होतो. ज्ञानाच्या अग्नींतून तावून–सुलाखून जें जें राहील तेंच खरें ' परतत्त्व '! त्या ' परतत्त्वाशी ' एकरूप होणें हीच मुक्ति. ज्ञानाच्या अग्नीनें वासनाक्षय व्हावा. कारण जें ज्ञान वासनेच्या रेशमी पाशांत रहातें तें ज्ञान असूनहि ' अ–ज्ञान 'च ठरतें. कारण आत्मपुष्टिपेक्षां देहपुष्टीला तें मदत करतें.

मुक्तीची कल्पना ही देहनिष्ठ असते तेव्हां तो बहिरात्मा समजला जातो. त्याच्या मुक्तीची कल्पना जड वस्तूशी संबंधित असते. कारण तो त्यापासून मोकळा होत नाहीं. या विकारांतून त्या विकारांतून प्रवेश करीत असतां आपण ' मुक्त ' झालों अशी त्याची कल्पना असते. पण ही अवस्था विवेकाच्या मदतीनें आपण संपवतो. भोगानें मुक्ति असा त्याचा अर्थ नाहीं

व त्यागानें मुक्ति असतांहि त्याचा अर्थ असूं नये. ‘ज्ञानानें मुक्ति’ ह त्याचा अर्थ असावा. बंधनें हीं देहाला बांधू शकतात, आत्म्याला नाहीं. म्हणून ‘मी मूलतःच बंधमुक्त’ आहे अशी कल्पना दृढमूल होणें हें तें ज्ञान होय. आणि अशा कल्पनेनें याचि देहीं ‘बंधमुक्त’ अवस्था अनुभवूं शकतो. मुक्तीची कल्पना बंधनाच्या विकृत कल्पनेला खो देण्यासाठींच जन्माला आली आहे. वास्तविक बंधावस्था हीच कल्पना आहे. मुक्तावस्था ही कल्पना नव्हे, ती चिरकाल अनुभवली जाणारी अशी ज्ञानमय अवस्था आहे. बंधाच्या कल्पनेवर ती आधारलेली असल्यानेंच मुक्ति ही कल्पना ठरली आहे. पण वास्तविक ती सूर्यप्रकाशाइतकी वस्तुस्थिति आहे. सूर्याची उष्णता एखादे वेळीं संपेल पण आत्मतत्त्वाचें ज्ञानमय-स्वरूप हें चिरअविनाशी होय.

मोक्ष हा धर्मकल्पनेप्रमाणे अफूची गोळी नाहीं. तिनें गुंगी येत नाहीं. उलट कसलीहि गुंगी किंवा धुंदी त्या गोळीनें उतरते. विदारक सत्याचें तें दिव्यरूप आहे. जिथें जन्म–मरणाच्या कल्पना फोल ठरतात. भय, अज्ञान व वासना यांचा पूर्णतः निःपात होती, तिथें परम तेजस्वी असें ज्ञान सूर्याप्रमाणें चकाकूं लागतें असें तें दिव्यरूप आहे.

वैदिकांत ज्याला ‘माया–निरास’ म्हणतात तो हाच. माया आणि अविद्या म्हणजेच बंधावस्था, त्यांचा नाश ही मुक्ति. अशी अवस्था ज्यांना अफूची गोळी वाटते त्यांच्या ज्ञानाबद्दल आपण तरी साशंक आहोंत.

अगदीं सायन्सची पूर्ण प्रगति झाली तरी आत्मतत्त्व जाणल्याखेरीज ती प्रगति अपूर्ण ठरणार आहे. सायन्सच्या दृष्टीनेंहि आत्मतत्त्व हें अनाकलनीय राहूं नये असें मला वाटते. कारण सायन्स हेंहि एक तऱ्हेचे ज्ञानच आहे. त्या ज्ञानानें आत्मदर्शन घडूच नये, असें कुठें आहे ? अज्ञानांतूनच आपणाला ज्ञानाकडे जावयाचें आहे. अविद्येंतून विद्येकडे जायचे आहे. बंधनांतूनच मुक्तीकडे जायचें आहे. जेव्हां हें घडेल तो मुक्ति–दिन !

* * *

## समता

'समत्व ही **Reality** आहे कां ?' हा आमच्या व अण्णांच्या चर्चेचा विषय होता. माझें म्हणणें असें होतें--(१) आपण अनेक सत्यें ( **Realities** ) मानतों. त्यामुळें अमुक एक सत्य म्हटलें कीं त्या विरहित असंख्य सत्यें अनवधामुळें दृष्टिआड होतात. तसें झालें तर जें सत्य म्हणून प्रतिपादलें तेंहि सत्य आहे कीं नाहीं याची विवंचना निर्माण होते. म्हणजेच सत्य हुडकणें दुरापास्त आहे.'

(२) समत्व ही भावना आहे की वस्तु, कल्पना आहे कीं वस्तुस्थिति ( **Reality** ), हेंहि निश्चित झालें पाहिजे. जोपर्यंत समत्व ही भावना आहे तोपर्यंत तिचा संबंध मनाशी आहे. तीच गोष्ट कल्पनेची आहे. कल्पना हाहि मनाचा एक विलास आहे.

त्यावर अण्णांचें कथन फारच मननीय होतें आणि विवेचकता तर अप्रतिम होती. त्यांचें म्हणणें असें--

'समत्व ही कल्पना किंवा भावना नव्हे. समत्व हा विकार नाहीं. समत्व ही मंगल दृष्टि आहे, तें सम्मक् दर्शन आहे. आणि म्हणूनच तो आत्मद्रव्याचा अविभाज्य असा गुण आहे.

समत्वाचें ज्ञान हेंच सम्यक्ज्ञान होय. जिथें असमत्व भावना किंवा विकल्प उठतो तिथे मुळाशी असतो विकार. असमत्वाची–विषमतेची भावना हा विकारप्रधान आहे कधीं भीतीने ती निर्माण होते, तर कधी आशेनें निर्माण होते. कधीं स्नेहानें ती निर्माण होते तर कधी लोभानें. समतेचें बाह्य आणि अभ्यंतर स्वरूप कारुण्यानें ओथंबलेलें असतें. तिथें आत्म्याच्या महत्मंगल, दिव्य परमात्मपदाच्या अस्तित्वापलिकडे अन्य कशाचाहि उल्लेख नसतो. 'सोऽहं..' हा अनादिकालीन महामंत्र त्याचाच निदर्शक आहे. महा-कारुण्यमूर्ति समता देवि ही आत्मसाधकांची कुलदेवता असते.

क्रोधादि विकारांच्या प्रचंड झंझावातांत किंवा हास्यादि सूक्ष्म कषा-योद्रेकांतहि स्वतःचें 'दिव्यपण' न हरवणाराच समत्वदर्शी म्हणविला जातो. समता ही कल्पना आहे. असेंच जर तुम्हाला वाटत असेल तर तुमचा आत्मा हींहि एक कल्पनाच ठरली म्हणून समजा, साखरेची गोडी ही जशी कल्पनारूप वस्तु नाहीं. तसेंच समत्व हीहि कल्पनारम्य वस्तु नाहीं. समत्व ही अनंत अशी चिर–अविनाशी वस्तु आहे.'

'आणि बरं कां, श्री. जैन, तुम्ही हेंहि लक्षांत ठेवा कीं समत्व हें महन्नुन्नायक असें दिव्य चारित्र्यहि आहे. आत्म्याच्या दिव्य स्वरूपाचाच विचार जिथें केला जातो तिथें आत्म्यांच्या अस्तित्वाचें प्रत्युत्तर आत्म्या-लाच समजतें. अशा प्रकारच्या उच्च चारित्र्याची परम सीमा म्हणजे तरी काय ? केवळ मी परमात्मा आहे हीच !

समतेची विकृति हा संसार आणि समतेची प्राप्ति हाच मोक्ष आहे. असें तुम्हास नाहीं कां वाटत ?

समतावादाचीं आजची ओरड मिथ्या ठरत आहे. याचें कारण किती

स्पष्ट आहे ! ज्या समतावादांत राष्ट्र ही कल्पना आहे, जात ही कल्पना आहे, धर्म ही कल्पना आहे, वंश ही कल्पना आहे, रंग ही कल्पना आहे तें ढ़ोंगाव्यक्तिरिक्त काय असूं शकेल ? समत्ववादी हाच खरा स्वातंत्र्य–प्रेमी असूं शकतो. स्वातंत्र्य ही देखील तुम्ही विद्वान् लोक ' भावना ' वा कल्पना ठरवाल. अरे, ती आत्म्याची चिर अविनाशी अशी अवस्था आहे.

ममत्वानें पारतंत्र्याचे पाश निर्माण होतात. ममत्व म्हणजेच मोठा पाश. ' हें माझें आहे, मी ह्याचा स्वामी, याचे कर्तेपण माझ्याकडे आहे, मीच केल्याने सारें होणार आहे. इ. भावना म्हणजे विषारी अहं-कारी सर्पांचे फूत्कार आहेत.' अशी जाणीव निर्माण झाली पाहिजे. ' स्व ' कोण व ' पर ' कोण हें कळालें पाहिजे.

आणि समाधि तरी काय आहे ? समाधीच्या वेळीं 'समता सर्वभूतेषु' असें कां आळविलें जातें ? याचें कारण समाधीचा कणा आहे समता. ही वस्तुस्वरूपाच्या नित्य, स्थिर आणि अविनाशी स्वरूपाचें दिग्दर्शन झाल्या-शिवाय होत नाहीं. ' मी अमक्यामुळें मरतो किंवा अमक्या जीवाला मारतो यांत वस्तु स्वरूपांचा विपर्यास आहे. म्हणूनच ' नाऽयं हन्ति न हन्यते ' असें अध्यात्मांत म्हटलें आहे. विपर्यस्त कल्पना ही हिंसक, भ्रममूलक म्हणून त्याज्य ! शांति, समाधि, परिमाणशुद्धि, बोधि, स्वात्मोपलब्धि इत्यादि सर्व शब्दांचा सारहि ' समता ' हाच आहे.

सामाजिक शब्दहि त्या समतेचाच वाचक आहे. समतेकडे जाण्या-साठींच सारी जीवनाची धडपड असली, तर जीवन सुखकर होतें. जीवन हा संघर्ष आहे. हा सिद्धान्त खोटा आहे. संघर्षानें प्रश्न सुटतील, झगडा करा म्हणजे मिळेल हें खोटें ठरत आहे व तें तसें ठरलेंच पाहिजे. झगडा ही विकृति आहे. शांति, समता हीच उन्नायक तत्त्वें आहेत. तो पेलणें सहज शक्य नाहीं हें तर खरेंच. पण पेलत नाहीं म्हणून तें हिणकस असें कसें म्हणतां येईल. घुबडाला सूर्यप्रकाश सहन होत नाहीं म्हणून कांहीं तो हिण-कस आहे असें कां आपण म्हणतों ?

‘ ही समतेची कल्पना व्यवहार्य आहे कां ?’ मी विचारलें.

‘ हो आहे. कारण समता ही कल्पना नाहीं हें नीट समजलें पाहिजे. मुळांतच तुम्ही ती अव्हेरता. समता हें चिर–अवाधित असें आत्मतत्व आहे. पूर्णत्व हा समतेचा कळस आहे. कुणी मला विचारील की पूर्णत्व म्हणजे काय ? तर मी सांगेन कीं आत्म्यांत सामावून जाणें हेंच समत्व. निर्विकल्प अशी समाधि म्हणजेच आत्मस्वरूपाशी एकरूप होणे. याचसाठीं मी नेहमीं सांगतो कीं, समतेचा वाद घालू नका. त्याची जाहिरातहि नको. त्या शब्दाचा फॅशनसाठीं उपयोग नको. मोठमोठी राष्ट्रें जेव्हां याचा उल्लेख करतात तेव्हां मीं म्हणतों, चला, शेवटीं जें सत्य आहे त्याचा उच्चार तरी करायला हे बेटे शिकलेंत. केवळ उच्चारानेहि समत्व त्यांच्यांत विवेक निर्माण करील. समताबुद्धि ही अमृतवल्ली आहे. तिच्या स्पर्शानें दीर्घायुष्य मिळालें तर सेवनाने अमरत्व नाहीं का मिळणार ?

स्वामी कुंदकुंदाचार्यांनी आपल्या नियमसाराच्या १०५, १०६ या गाथांतून हेंच बिंबवण्याचा प्रयत्न इसवी सनाच्या पहिल्या शतकांत केला. मी देखील म्हणेन कीं केवळ वर्गरहित (**Classless**) समाज करून भागणार नाहीं. सर्व बाजूंनीं समतेचा पुरस्कार करणारी मंडळी शिक्षणानें तयार झाली पाहिजे. मारक वैषम्याला पूरक बनवून घेणारें समत्व निर्माण केलें पाहिजे प्राचीन ऋषींनीं तें केलें म्हणून आज आपली संस्कृति दिसते.

कैवल्याची जी महती गाईली आहे ती कां ? ज्ञानाचा परमोच्च बिंदू म्हणजे कैवल्य ! कैवल्य म्हणजे आत्मस्थितीचें मंगल स्वरूप ! समतेचें बाह्य कवच म्हणजे कैवल्य ! जीवनाचें कोडें हें वैषम्यानें बनतें व समतेनें तें उलगडतें. मोहानें, अज्ञानानें व अविवेकानें वैषम्य भावना निर्माण होते. हा माझा, हा परका अशी भावना देखील मिथ्या. ती केवळ मोहानें होते. अहंकार हा वैषम्याचा बंधूच. त्यामुळें सत्य परिस्थिति डोळ्याआड होते. मानसिक शुचिताहि आपण गमावून बसतो. क्रोधादि विकार म्हणजेच वैषम्य. यांतून सारा संसार निर्माण होतो. संसार म्हणजे विषमता !

'विषमता ही कल्पना नाहीं. विषमता समतेची विकृत अवस्था आहे. अज्ञान जशी ज्ञानाची विकृति किंवा मिथ्यात्व ही सम्यक्त्वाची विकृति आहे. विकृति ही अवस्था आहे, कल्पना नाहीं.

म्हणूनच साम्य भावनेला जपायला सांगितलें जातें. ही साम्यभावना निर्माण व्हायला मानवी मन अहिंसक व्हावें लागतें, सत्यप्रिय व्हावें लागतें. अपरिग्रही व्हावें लागतें. आत्ममग्न अवस्थेंत रमणारे मन तयार करावें लागतें.

आपलें मन आहे चंचल. तें अविवेकी आहे, अज्ञानी आहे. त्या मनाचें व्यापार व्यामोहामुळे असल्यास रमतात. ही रमणूक प्रिय असतें आपणाला. भौतिकता ती हीच. त्याज्य वस्तूंत रममाण होणें ही झाली भौतिकता; आत्मद्रव्याशी एकरूप होणें ही आहे आध्यात्मिकता. अरविंदांच्या भाषेंत सांगायचें तर भौतिकता ही पशुता **Animality** आहे. पशुप्रवृत्तींचा मानवानें जर त्याग केला तर खरें, सुंदर जग निर्माण होईल. कारखान्यांची निर्मिति, देशाची समृद्धि आवश्यक आहे यांत वाद नाहीं. पण संस्कृति म्हणजे तेवढीच गोष्ट नाहीं. म्हणूनच समतावादाची जोपासना हा संस्कृतीचा पाया असला पाहिजे. पैसा हा समाजाचा आज पाया झाला आहे. हीच खरी चूक आहे. पैशानें केवळ भौतिक गरजा भागाव्यात, पण सांस्कृतिक मूल्य मात्र त्या मापानें मोजलें जाऊं नये. 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते' हा उक्ति संस्कृति–नाशाची सूचक आहे.

सहजीवनाची तयारी दर्शविणें हेंहि आज प्रगतीचे लक्षण समजलें जातें. कम्युनिझम आणि भांडवलशाही यांचें अस्तित्व एकत्र असूं शकतें. केवळ कांहीं दुर्गुणांमुळें एखादीं वस्तु त्याज्य ठरविली तर ही आपत्ति सर्वांना लागू होईल. म्हणून 'वाद' ( **Ism** ) महत्त्वाचा नसून संवाद ( **Harmony** ) महत्त्वाचा आहे. त्यासाठींच समतावाद हवा आहे. विकृतावस्था टाळण्याचा हाच एक उपाय आहे व समतावाद क्रूरतेनें अमलांत आणणें म्हणजे अहिंसेची प्रतिष्ठापना हिंसेनें करण्यासारखें आहे.

जगांतील उपकारक तत्त्व आहे ' सम्मं मे सव्वभूदेसु । ' समतेनें मी जग जिंकीन असा बाणा हृदयांत निर्माण झाला पाहिजे. नव्या जगाला समता ही अमृतासारखी उपकारक ठरणार आहे. तिच्याच चिंतनानें नवें जीवन बहरणार आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३०५५६........ वि: ..........
क्रमांक .......................... नों. दि. २८-११-६८

# पुरुषार्थ

इतिहासांतील भाग्यशाली व वैभवशाली व्यक्तींचा जेव्हां आपण विचार करतों तेव्हां नेपोलियन भाग्यशालीं की दुर्दैवी ? अकबर भाग्यशाली की दुर्दैवी ? म. गांधी, लोकमान्य टिळक या आधुनिक थोर पुरुषांचेहि भाग्य थोर की दुर्दैव थोर ? अशी प्रश्न मालिका उभी राहते. आजूबाजूच्या वातावरणामुळें या व्यक्ति जन्माला आल्या. गरजेप्रमाणें पुरवठा झाला असें म्हणणारा एक पक्ष आहे. भारत पारतंत्र्यांत होता म्हणूनच हे स्वातंत्र्यनिर्माते थोर वाटतात. पण स्वतंत्र भारतांत या नेत्यांना एवढी प्रतिष्ठा, एवढा लौकिक लाभला असता कां ? महात्माजी केंवळ बॅरिस्टर किंवा पत्रपंडित असते तर ते एवढे वंद्य ठरले असते कां ? हे प्रश्न जेव्हां मनांत उद्भवतात तेव्हा दुसरा एक असें उत्तर देतो की या

...२

नेत्यांची थोरवी त्यांनी केलेल्या अलौकिक पुरुषार्थांत आहे. त्यांनी सहन केलेल्या यातनेंत आहे. प्रयत्नांची शिकस्त करून जीवन घालविणाऱ्यांच्या डोक्यावर यशाचा सोनेरी मुकुट असतो, हें सत्य असल्याचें सांगितलें जातें. पण हे प्रयत्न म्हणजे काय ? या प्रयत्नांचा यशाशीं संबंध कसा पोंचतो ? किंवा पोंचतो की नाहीं याचा आपण विचार करीत नाहीं.

मानसशास्त्रीयांची चिकित्सा वेगळी आहे . त्यांनीं मानवी प्रवृत्तींचा विचार व विश्लेषण करून असें मत प्रतिपादिलें की रक्तांतच अशा प्रकारची शक्ति असते की कांहीं माणसें स्वस्थ बसूं शकत नाहींत. कसलें तरी कार्य निर्माण करून सतत उद्योगांत रमणें हाच त्यांचा पिंड असतो. हा पिंड कसा निर्माण होतो हें त्यांनाहि कोडें आहे. कांहींचा पिंड हा शांत असून फारशी दगदग, त्रास, आटापिटा, पायपीट न करतां जें, जेव्हां, जसें होईल, मिळेल, तें, तेव्हां, तसें स्वीकारणें हें त्यांच्या प्रवृत्तीत असतें. यांतील तात्कालिक मीमांसा तेवढ्यापुरती पटते. पण ती मूलगामी नाहीं. ती मूलगामी नाहीं याचें कारण त्यांच्या धर्मविषयक तत्त्वज्ञानांत आहे. ते सारे ख्रिश्चन असून त्यांच्या तत्त्वज्ञानांत अद्यापि पुनर्जन्म नाहीं. पूर्वजन्महि नाहीं. तेव्हा पूर्व किंवा पुनर्जन्म न मानणाऱ्यांना केवळ वर्तमानकाळच उरला. केवळ वर्तमान अशी अवस्था या जगांतील एकहि पदार्थाची असूं शकत नाहीं. म्हणून पाश्चिमात्यांच्या तत्त्वज्ञानांत या जन्मांतील पराक्रमाबद्दल व पुरुषार्थ गाजविल्याबद्दल बरेंचसें लिहिलें गेले. त्यांनीं आकाश-पाताळ एक करून सोडण्याचा चंग बांधला आहे. त्यांच्या धर्मांतहि स्वर्ग-नरकांच्या कल्पना आहेत पण त्या तेवढ्या पुरत्याच. त्या त्यांच्याच शोधांनी खोट्या ठरत आहेत. पण त्यांनीं धर्म सोडला नाहीं किंवा त्या धर्माची निंदा केली नाहीं. उलट युद्धोत्तर काळांत त्यांची धर्मप्रीति बळावली आहे.

भारतांतील धर्मपुरुषांनी देखील भिन्न भिन्न उपपत्त्या लावल्या आहेत. वैदिकांतील जुन्या लोकांना तर देव माहीत नव्हता. नंतरच्या वैदिकांना जैनधर्माच्या संबंधामुळें आत्मा, पुनर्जन्म, मोक्ष इत्यादि गोष्टीं कळाल्या. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य इत्यादि चिरकाल आवश्यक असणारीं तत्त्वें वैदिकांनी स्वीकारली. असें असलें तरी गीतेंत जो कर्मयोग

सांगण्याचा प्रयत्न आहे तो देखील याच पुरुषार्थाचा भाग आहे. कृष्ण हाच सर्व करणारा आहे. फक्त माध्यम म्हणून आपला तो उपयोग करतो. आम्ही सारे निमित्तमात्र असून तो आमचेकडून सर्व करून घेतो. तो आम्हांस पापमुक्ति देतो इत्यादि तत्त्वज्ञान अपुरें आहे. कारण पुरुषार्थ नांवाची वस्तु मग भोंगळ वाटतें. कर्ता-अकर्ता ईश्वर असल्यानें होणारें पाप-पुण्यहि ईश्वराधीन ठरतें, पुरुषार्थावर नाहीं. वैदिक कल्पनेंत किंवा आजच्या हिंदू कल्पनेंत पुरुषार्थाला जागा नाहीं. सारी प्रभूची लीला असल्यानें खेळण्या-पलिकडे मानवाला तेथें किंमत नाहीं. नाहींतर कौरवांच्या नाशाला प्रभूपेक्षां अर्जुनाचा पराक्रमच अधिक श्रेष्ठ ठरला असता. पण त्याचा पराक्रम हा प्रभूच्या इच्छेंत बंदिस्त आहे. तेव्हां या धर्मांतील कल्पनेंत व्यक्तिगत स्वतंत्र पराक्रम अशी वस्तु नाहीं. म्हणूनच कांहीं हिंदू टीकाकारांनीं वैदिक धर्मानें देश दुर्बल झाला, संतांनीं देश नामर्द केला अशीं विधानें केलीं आहेत. या विधानांतहि चूक आहे. सारें विश्व प्रभूचेंच असल्यामुळे परचक्रहि पर्यायानें प्रभूचेंच व तेंहि प्रभूवरच. तेव्हा जर कांहीं लढाई झालीच तर ती प्रभूच्या एका सैन्याची दुसऱ्या बरोबरच होईल. तिथें भेदभाव नाहीं. तीहि प्रभूचीच लीला ठरणार ! तेव्हा पुरुषार्थाला हिंदु-कल्पनेंतहि मुळींच वाव नाहीं.

'जैन कल्पनेंत पुरुषार्थाला वाव आहे का ?'

'जैन परंपरेंत पुरुषार्थाच्या मर्यादा अत्यंत काटेकोरपणें सांगण्यांत आल्या आहेत. खऱ्या पुरुषार्थाची त्यायोगें निश्चित साधना होऊ शकते. पहिल्यांदा असें कीं जैन कल्पनेंत प्रत्येक जीवमात्राच्या ठिकाणी वसत असलेल्या ज्ञानशक्तीचें पृथःकरण करण्यांत आलें. तेव्हां असें आढळले कीं प्रत्येक जीवमात्र चैतन्ययुक्त असून जगांतील यच्चावत् पदार्थ एकसमया-वच्छेदेकरून जाणून घेण्याचें दिव्य सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं असतें. या ज्ञानसामर्थ्याचा शोध घेतल्यावर हें सामर्थ्य प्रत्येकानें आपल्या पराक्रमानें मिळवावयाचें आहे. असा दुसरा शोध लावला. परमेश्वराला या कामीं आयास करावे लागत नाहींत. जीवनाच्या घडवणींत तिऱ्हाईत परमेश्वराला कसलीहि लुडबुड करतां येत नाहीं. नरक किंवा स्वर्ग ज्याचा त्यानेंच प्राप्त करा-

यचा आहे. न्याय निवाडा कुणाच्याहि कोटींत नाहीं. सारी जबाबदारी प्रत्येक जीवमात्रावर अशा प्रकारें येऊन पडली. उन्नति आणि पतन या दोन्हींची जबाबदारी एकट्या जीवावर आली. या जीवाला स्वतः केलेल्या कर्मांमुळे वेगवेगळीं जीवनें घालवावीं लागतात. संपूर्ण ज्ञानमय जीवन घालविण्याच्या अवस्थेपर्यंत यायला असंख्य जीवनें खर्ची घालावीं लागतात. या जीवनांतून उत्क्रांत व्हावें लागतें. हे उत्क्रांत जीवन जगण्याचा प्रयत्न ज्याचा त्यानेंच करावयाचा असतो.

जीवनाचा प्रवाह तर अखंड आहे. मनुष्य जन्मादि रूपानें उत्पत्ति, स्थिति आणि नाश नित्य-नूतन आहे. असें असतांनां या जीवनासंबंधीच्या गैरकल्पना कधी पूर्वोपार्जित तर कधी याच जन्मांत उपार्जित असतात. स्वतःच्या वर्तमान-भूत-भविष्य कालीन जीवन प्रवाहासंबंधानें गैरकल्पना असतात. याचा अर्थ काय ? तर या जड विश्वाशीं आपलें नातें हें सख्या भावासारखें मानणें. देह मातीचा तर आत्माहि मातीचाच मानणें. देहाच्या समाप्तीबरोबर आत्म्याचीहि समाप्ति मानणें. देहावरच जीवनाची इमारत उभी करणें, हे सारे मिथ्या कल्पनेचे प्रकार आहेत. या मिथ्या कल्पनांमुळें उत्क्रांत जीवनाला खीळ बसते.

तेव्हा अज्ञान व अज्ञानजन्य कल्पना या जीवनप्रेरक नाहीत हें अगोदर कळलें पाहिजे. इथें अज्ञान याचा अर्थ खोटें ज्ञान असाहि घेतला पाहिजे. हें खोटें ज्ञान आत्मप्रेरक नसतें म्हणूनच त्याला खोटें म्हणावयाचें. आत्मप्रेरक ज्ञानच 'खरें ज्ञान' होय. सूर्याचें चित्र जसें अंधाराचा नाश करूं शकत नाहीं तसेंच आत्मप्रेरक नसलेले ज्ञानहि अज्ञान-अंधःकाराचा नाश करूं शकत नाहीं. हें कळलें कीं साऱ्या गोष्टी आत्मकेंद्रित व आत्मशासित सुरू होतात. धनाचा विचार असो किंवा वनितेचा विचार असो. संसाराचा विचार असो किंवा मोक्षाचा विचार असो, त्या सर्वांचा विचार-मंथनदंड हा आत्माच पाहिजे. जिथें आत्मा नाहीं तिथें तो विचार संपला पाहिजे. अशी आत्मनिष्ठ विचारपद्धति उद्भवली की उत्क्रांत जीवनाला सुरुवात होते.

अर्थात् आत्मसाधनेसाठींच जैनधर्मानें पुरूषार्थ कल्पिला. कारण

धनाची प्राप्ति किंवा भोगोपभोगांची लयलूट यासाठीं वेगळा पुरुषार्थ करण्याचें कारणच जैन कल्पनेंत नाहीं. धन, भोगोपभोग, सत्ता इत्यादि गोष्टी उपादेय मानलेल्या नाहींत, कारण ज्यानें आत्म्याचा आश्रय घेतला, ज्यानें आत्मनिष्ठा स्वीकारली तो धन, वैभव, सत्ता यांच्या आहारी जाणार नाहीं. त्यांचें विनाशित्व त्याला कळालेलें असतें.

धनोपार्जन हा जैनधर्मीयांचा मूळ धर्म नाहीं. क्षत्रियोचित विजिगिषु असा जैनांचा मूलधर्म आहे. व्यापार ही त्यांचीं प्रवृत्ति नाहीं. आत्मजितपणा हाच त्यांचा 'मूळगुण'. काळांच्या ओघांत व इतिहासाच्या चक्रांत व्यापारीपणा लादला गेला आहे. मुळांतच त्यागाची प्रतिष्ठा व त्यागीजनांची पूजा हीच त्यांना आदरणीय आहे, जैन कल्पनेंत सम्राट्-राजे महाराजे आहेत. कारण जे आत्मजित् असूं शकतात तेंच सर्वजित् असूं शकतात. तेव्हां हा विषयांतराचा भाग सोडला तरी पुरुषार्थ आहे तो आत्मजित होण्यामध्ये. धनाच्या आहारीं जाणाऱ्याला लोभी म्हणतात. कां तर तो 'जित' आहे 'जेता' नाहीं. स्त्रीच्या आहारीं जाणाऱ्याला लंपट, कामुक म्हणतात. कां तर मूलतः तेथें पुरुषार्थ नाहीं, पुरुषार्थ आहे. तो जिंकण्याच्या प्रवृत्तींत. जिथें जिंकण्याचें काम आहे तिथेंच पुरुषार्थ संभवतो. धनामुळें माणसांचे मन उन्मत्त किंवा लोभी किंवा भित्रें बनतें. तीच गोष्ट स्त्रीच्या बाबतींतील. म्हणूनच 'काम' किंवा 'अर्थ' हा खऱ्या अर्थानें पुरुषार्थ नाहीं.

व्यवहारतः त्यांना पुरुषार्थ म्हणून जरी म्हटलें असलें तथापि जिथें आत्मनिष्ठ अवस्था संभवत नाहीं. तिथें धन किंवा स्त्री त्या व्यक्तींवर मात करतें व त्यांचा तो गुलाम होतो. धनानें सुख मिळतें किंवा स्त्रीनें सुख मिळतें अशा कल्पनेंत मुळांतच विसंगति आहे. खोटेपणा आहे. म्हणून तुच्छ सुखासाठीं केलेला पुरुषार्थ हाहि अनाठायी केलेल्या प्रयत्नासारखा आहे. केवळ राजवट बदलली तर घरांतील धनाचें रूपांतर कागदी चिटोऱ्यांत होतें; स्त्री परपुरुषगामी झाली तर स्त्रीचें सुख जळून खाक होतें. तेव्हां माझ्या मतें धन आणि काम यांची साधना धर्ममूलक नाहीं. कारण देहाच्या सार्थकतेसाठीं त्या गोष्टी आहेत. आत्मनिष्ठतेसाठीं त्या हेय आहेत.

पिकलेलीं पानें जशीं तोडावीं लागत नाहींत त्याचप्रमाणें आत्मप्रवणता अंगीं बाणल्यावर या गोष्टी आपोआप गळतील. जर गळाल्या नाहींत तर आत्मनिष्ठता अंगीं नाही यांचें तें स्पष्ट निदर्शक आहे.

' तुमच्यामतें पुरुषार्थ म्हणजे आत्मजित होणें हेंच ना ? '

होय ! खरा पुरुषार्थ तोच आहे. कारण, आपले खरे शत्रू म्हणविले जाणारे क्रोधादि विकार आहेत. त्यांनाच जिंकावयाचें आहे हें प्रथम कळलें पाहिजे. आपण सुधारलों, प्रगत झालों, हें मोजण्याचें माप काय ? भोगादिक सामुग्री ? विमानें, मोटारगाड्या, आगगाड्या ? छे ! ही तर शरीराच्या आरामाची, सुखाचीं साधनें आहेत. तें साध्य नाहीं. या साधनांना साध्य समजणें हें ज्ञानाचें केवढें विडंनन ! पण हें लक्षांत कोण घेणार ? सारें जग त्याच्यापाठीं लागले आहे; पण हा विकास नाही, प्रगति नाहीं. हीं साधनें आपण बुद्धीनें उत्पन्न केलींत; पण सारी बुद्धी आणि पराक्रम याचसाठीं आहे काय ? तें अन्तिमच काय, पण प्राथमिक ध्येय देखील नाहीं. ध्येय आहे आत्मिक आनंद. हीं सारीं साधने पैशानें मिळतात म्हणून आपण पैसा गोळा करतो. पण कमविण्यांत जीवन निघून जातें. जीवन हें इतकें तुच्छ नाहीं कीं तें यासाठीं संपूर्ण वेंचावे. म्हणून आत्मरति हीच आदि-अंतीं साध्य आहे.

पुरुषार्थ म्हणजे सत्ता संपादन करणें नाहीं. अनेक सत्ता गाजवणारे याच मातीच्या थडग्यांत झोपी गेलें नाहींत काय ? कुठे आहेत त्या राजांचीं सैन्यें ? कुठें गेलें त्यांचे तुरुंग ? कुठें आहेत त्यांचे खजीनें ? जर तेवढीच ' ध्येयें ' आम्ही बाळगलीं तर उत्क्रांति संपेल. भ. महावीरांनीं जो धर्म सांगितला त्यांत धन-संचयाला कुठेंहि जागा नाहीं. स्त्री-रतीला पुरुषार्थ म्हटलें नाहीं. या उलट त्यांनी स्वतः राज्याचा मोह टाळला, भोगांना दूर सारले व आत्मजित होण्याचा मार्ग अनुसरला. कारण तोच पुरुषार्थ आहे. हें त्यांना पटलें होतें. साऱ्या जगाचा भाकरीचा प्रश्न सोडवण्याच्या मागे तें लागले नाहींत. जग जिंकण्याच्या मागे तें लागले नाहींत. याचा अर्थ जीवनांतील महत्त्वाची बाब त्यांना आत्मरति वाटली. स्वतःचा विकास महत्वाचा वाटला. जगाचा विचार प्रथम नाहीं. स्वतःचा विचार प्रथम. सूर्य

स्वतः तेजस्वी असला तर इतर पदार्थ अन्धारांत रहातच नाहींत. तसेंच आपलें असावें.

तुम्हांला असें वाटतें कीं हा मार्ग मोठ्यांचा आहे, थोरांचा आहे. पण हें म्हणणें खोटें आहे. महाराष्ट्रांतील संत परंपरा पहा. किती सामान्य माणसें ! कोणी माळी, कोणी वाणी ! त्यांनीं भक्तिमार्गाची साधना केली, सामान्य लोकांच्या जीवनांत क्रांति केली. तेव्हां असें म्हणणें कीं, आत्मसाधनेचा मार्ग आपला नाहीं, हा अविचार आहे. जगासाठीं हा मार्ग स्वीकारा असें मी म्हणत नाहीं. प्रत्येकाच्या पुढें कोणत्या पौरुषाला आव्हान केलें पाहिजे असा सवाल उभा आहे. कुणा दुसऱ्यासाठीं नव्हे तर स्वतः-साठींच हा आत्मरतीचा मार्ग आहे. स्वर्गाच्या मोहानें किंवा नरकाच्या भीतीनें हा आचरावयाचा नाहीं. या मार्गात पराभव नाहीं, मानहानी नाहीं. आहे तो आनंदच. पैसा कमावला व तो गेला तर सारा पुरुषार्थ धुळीस जातो. पूर्वजांची संपत्ति मुलें लिलांव करतांना आपण पहात नाहीं काय ? ' एकच प्याल्यां ' त सुधाकर वडिलांचा फोटो चार आण्यास विकण्याची भाषा वापरतो. त्या वेळीं तो फार महत्वाचें तत्त्व बोलून गेला आहे. संपत्ति, स्त्री व मानमरातब या तिन्ही पुरुषार्थांचा घोर उपमर्द खऱ्या अर्थानें ' एकच प्याल्यांत ' त दर्शविला आहे, पण त्यांत तो प्रश्न तिथेंच सोडून दिला गेला. त्याचा शेवट जैनांनी वेगळा केला असा असतां. सुधा-कराची दु:खांतिका जैनांनीं सुखांतिका केली असती. पण तें धैर्य सुधाकरा-कडे नाहीं. तें एक ट्रॅजिक पात्र आहे. त्याचा घोर अन्त तसाच होणार आहे, असें धरूनच लेखक चालला आहे.

धर्म याचा अर्थ आहे आत्मधर्म. धर्म या कल्पनेवरून संकुचितपणा कसा शिरला हें सांगणें कठीण; पण ज्यानें जीवन सांवरलें जातें. विकसित होतें तो धर्म. असा धर्म मागें सांगितलेला आत्मधर्म आहे, जीवनाचा आदि-अन्ती हेतु आत्मशुद्धि हाच मानला तर जीवन शांत व आनंदमय बनेल. जीवनाचा आधार आत्मनिष्ठा व त्या निष्ठेच्या बळावर आत्म्यां-तील महन्मंगल ज्ञानशक्तीचा आविष्कार हेंच चारित्र्य आहे.

आत्म्याला ज्ञानाशिवाय अन्य उपाधि जोडणें अयोग्य आहे. ज्ञानाच्या अग्नीनें मोहादिकांची बळकट बंधनें जाळून टाकणें याशिवाय दुसरा पुरुषार्थ आहे असें वाटत नाहीं. धर्म शब्दानें स्वतःची फसवणूक करून घेणारे लोक आहेत. दानाला धर्म समजलें जातें. पण केवळ दानामुळें चित्तशुद्धि होत नाहीं. दानानें आपण पैसा सोडला, पण त्यावरील आसक्ति–मोह जोपर्यंत सोडला नाहीं तोपर्यंत तें खरें दान नव्हे. दान ही घडणारी गोष्ट असावी. घडवून आणलेली गोष्ट नसावी. हीच गोष्ट पूजा, होम–हवन, यात्रा इत्यादि प्रकारांना लागू आहे. आत्मनिष्ठ राहून ह्या सर्व क्रिया घडाव्यात.

'पण हें सारें उच्च पातळीवरून विचार केला तरच समजतें. सामान्यांना तें समजत नाहीं.' –प्रश्न.

आपण जर विचार करूं तरच समजणार आहे. त्यामार्गानें जायचेंच नसेल तर समजणार नाहीं. विकासाची वाटचाल करण्याचें पौरुष जागें केलें पाहिजे. तोच तो विनाशांचा पाठ शिकणें, गिरविणें बंद केलें पाहिजे. हें होणार नसेल तर आणखी एक मानवी जीवन व्यर्थ गेलें असा नाहीं का याचा अर्थ ? आपणाला प्राप्त झालेली ज्ञानशक्ति विकसित करून पहायला काय हरकत आहे ? पैसा जसा वाढवावासा वाटतो, बंगले–इमलें उभे करावेसे वाटतात, तसेंच हाहि मार्ग चोखाळतां येतो कां हें पाहिलें पाहिजे.

सामान्य सामान्य म्हणून आत्मप्रतारणा तर आपण करीत नाहीं ना ? स्पष्टपणें असें म्हणतां आलें पाहिजे कीं, आत्मरतीचा मार्ग त्याज्य आहे, भोग व देहरति हाच आमच्या जीवनाचा मार्ग आहे. पण भ्रमांत राहून अज्ञानांतच राहून जें सत्य आहे त्याकडे दुर्लक्ष होतां कामा नये. सामर्थ्य नसेल तर तें निर्माण केलें पाहिजे. सिंहाचा छावा लहान असला तरी त्याचें मानसिक सामर्थ्य गजेंद्राचें गंडस्थळ फोडण्याचें असतें. तसेंच ज्याला आत्मनिष्ठा आहे, ज्याला सम्यक्दर्शनाचा प्रकाश लाभला आहे, हेयोपादेय कळालें आहे असा लहान वीरहि जगांत क्रांति घडवून आणतो. स्वामी समंतभद्रांनीं एके ठिकाणीं मोठें मार्मिकपणें सांगितलें आहे—

'आत्मनिष्ठेने, सम्यक्‌दर्शनाने संपन्न, आत्मदर्शनाच्या लालसेनें पेटलेली मांग जातीतली व्यक्ति ही देखील श्रेष्ठ आहे. तो राखेंतील निखारा आहे.' जातींत जन्म होणें हा पुरुषार्थ नाहीं; देश जिंकणें हा पुरुषार्थ नव्हे. आत्मनिष्ठ होऊन जर यां गोष्टी घडल्या तर दुधांत साखर पडते. याच अर्थानें सॉक्रेटीस असें म्हणत असे की राज्याचे चालक तत्त्वज्ञानी असावेत. हेतु हाच कीं त्या तत्त्वज्ञान्यांच्या हृदयांत निष्ठा पेटलेली असते. तिथें आत्मजित्‌पणा असतो. क्रोधादि विकारांचें नियमन ते करूं शकतात. पण हें उदात्तपणे सांगितलें जाते. नेहमी घडतें तें मात्र उलटच.

दैवाचा व पुरुषार्थाचा काय संबंध ? असा प्रश्न नेहमी येतो. दैववादी माणूस प्रयत्नाला अगदी सोडून असतो असें नाहीं. या बाबतींत त्याला असें आढळतें कीं आपण कुठें तरी असमर्थ आहोंत. ही असमर्थता तो दैव शब्दानें प्रकट करतो. ही असमर्थता प्रत्येकाचीच असते. सर्व समर्थ कोण म्हणुन देवाकडे–परमेश्वराकडे बोट दाखविले जातें. या दैववादाची चिकित्सा मी इथें आज करीत नाहीं. पण दैव म्हणजे आपलाच पूर्व जन्मीचा पुरुषार्थ आहे. त्यावेळीं केलेल्या मानसिक, वाचिक व कायिक पापपुण्यात्मक कर्मांचीं फळे या जन्मी भोगावीं लागतात. म्हणून अज्ञात कर्मविपाकालाच 'दैव' अशीं संज्ञा आहे. दैव हा देखील आज अज्ञात असलेला पूर्व जन्मीचा पुरुषार्थच होय.

दैव हें पूर्वकर्मच असल्यानें उत्कृष्ट विचारानें, तपानें, संयमाने, विवेकाने तें बदलता येतें. तें न जमलें तर त्यांची तीव्रता कमी करतां येते. पण असें कांहीं कर्म असतें कीं जें भोगल्यानेंच संपतें. म्हणूनच दैव हें प्रधान नसून मानवी निष्ठा मोठी आहे. जितका माणूस आत्मनिष्ठ तितकें दैवाचें बंधन शिथिल. रामाला सीता–त्यागाचे दुःख टाळतां आलें असतें; पण त्याहून अधिक तीव्र दुःख त्याने सीतात्यागानें सहन केले हें रामाशिवाय कुणाला कळणार ? म्हणूनच दैववादाला मुळींच थारा नाहीं. अत्यंत बलशाली आत्म्याला काय अशक्य आहे ? जें आहे तें माझेंच. मलाच तें भोगलें पाहिजे. कारण सर्व कर्मांचें अधिष्ठान माझें मीच नाहीं काय ?

यावरून सरळ निष्कर्ष निघतो की पुरुषार्थाच्या खोटचा कल्पना टाकून देऊन खऱ्या जीवनमूल्यांशी प्रामाणिक झालें पाहिजे. जीवनाची सार्थकता केवळ दानाने, यात्रेनें, तपानें होणार नाहीं. प्रथम ज्यासाठीं हें करावयाचें त्या आत्मतत्त्वावर आपली निष्ठा कायम केलीं पाहिजे. ही निष्ठा कायम झाली कीं मग जीवनाची आगगाडी त्यावर सरळ व बिनधोक धावूं लागेल.

पुरुषार्थ श्रेष्ठ कीं दैव श्रेष्ठ, कर्म योग्य कीं ज्ञान योग्य, आत्मवाद खरा की अनात्मवाद इत्यादि अकारण विकल्प टाळून जीवनाची शाश्वत मुल्यें ठरवून तसें जीवन प्रामाणिकपणे जगण्याची हरवलेली कला पुनः हस्तगत केली पाहिजे. हीच पुरुषार्थाची–आत्मविकासाच्या सोपानाची पहिली पायरी आहे असें वाटतें.

●●

# पुण्य

सकाळचे सात वाजले असतील. मी नुकतांच ‘ पहिला ’ चहा घेऊन कांहीं लिहावं म्हणून बसणार इतक्यांत माझे एक सुधारक मित्र आंत शिरते झाले. अलिकडे ते आले नव्हते. माझ्या चिंतन-शीलतेचा त्यांना राग होता. त्यांचा राग अनाठायीं नव्हता. कारण माझ्या चिंतन-शीलतेचें व माझ्या वचन-शीलतेचें पहिल्यापासून वाकडें आहे. माझी (कु) वचन-शीलता (सु) प्रसिद्ध आहे. त्यामुळें माझ्या जवळपास न फिरकणारे कांहीं मित्रहि मला लाभले आहेत. तेव्हा हे मित्रवर्य घरांत आले तोंच मला वाटलें, की आज आपला घातवार तर नाहींना !

मी त्यांचं स्वागत केलं. चहा दिला. ते विचारणार होते तसले कांहीं प्रश्न चहाबरोबर पोटांत जातील असा माझा कयास होता; पण त्यांनीं प्रश्नांची सरबत्ती केलीच.

अनुक्रम ३७५५८ दि: ..................
क्रमांक .................. नों दि ..................


त्यांचा प्रश्न असा होता कीं पुण्य ही वस्तु खरी आहे काय ? पुण्याच्या मर्यादा अगदी काटेकोर आहेत कां ? पुण्य हें सब्जेक्टिव्ह आहे का ऑब्जेक्टिव्ह आहे ? ( वस्तुनिष्ठ की व्यक्तिनिष्ठ ? ) पुण्याचे मोजमाप करणार (वि) चित्रगुप्त का कोणी तरी आहे का ? की पुण्य ही केवळ एक झकास गुंगी आणणारी तत्त्वावगुंठित अफू आहे ?

मी म्हटलें–' अहो, तुम्ही प्रश्न विचारतां हें खरें ! पण उत्तरें मी द्यावींच असें तुमचें म्हणणें आहे कां ? शिवाय आजच व आताच हा प्रश्न तुमचा मनांत कां आला ? '

तो म्हणाला––' उत्तर देतां येत नसेल तर तसं स्पष्ट सांगा. मला वाटलंच होतं की तुम्ही याचं उत्तर टाळणार.'

मी म्हणालों–– ' छे ! छे ! हें मात्र मी ऐकून घेणार नाहीं. मी कांहींच टाळणार नाहीं. कांहीं गोष्टी अटळ आहेत. त्यांतलीच आजची गोष्ट आहे. उलट या बाबतींत तर मी तुम्हांला चांगलंच सुनवणार आहे.'

मी पुढें म्हणालों, ' पुण्य याचा अर्थ 'पवित्र ' असा आहे. या पवित्रतेचा जीवनाशीं संबंध काय व तो कसा पोचतो हें पाहिलें पाहिजे. पुण्याचा प्रश्न मानवी जीवनाच्या केवळ याच जन्माशीं जोडून भागेल असें वाटत नाहीं. आज जें शरीर, जे भोग, जें सौख्य व दुःख जें आम्ही अनुभवतों त्याची कारण––मीमांसा याहि जन्माच्या मागें शेंकडों जन्मापर्यंत पोंचलेली असते.

जगांतील प्रत्येक जाती–जमातींत, देश–विदेशांत सहज डोकावून पाहिलें तर चांगलें काय व वाईट काय याची कांहीं निश्चित मापें आढळतात. हीं मापें मानवांतील कांहीं श्रेष्ठ पुरुषांनीं ठरवलेलीं असावीत. अशीं मापें ठरविण्यांत त्यांचा हेतु काय होता हें आपणांस सहज कळतें. मानवी जीवन जसें व्यक्तिगत आहे तसेंच ते सामाजिकहि आहे. व्यक्तीचें शारीरिक सौख्य, मानसिक सौख्य व आत्मिक सौख्य निरोगी असावें हा हेतु असावा. दुसरें, सामाजिक सौख्य हाहि हेतु त्यांत असावाच. समाज जितका पुण्य–प्रवृत्तीचा तितका त्या समाजाचा अधिक उत्कर्ष असें मानलें जातें. ज्या समाजांतील व्यक्ति खून, दरोडे, चोऱ्या करणाऱ्या असतील त्या समाजाला आपण पतित

समाज म्हणतों. कारण मानवी जीवनाच्या कांहीं भौतिक, कांहीं मानसिक व कांहीं अध्यात्मिक गरजा आहेत. त्या गरजा त्यांना कुणाच्याहि आडकाठी-शिवाय व परस्परांना सुखदायक ठरतील अशा रीतीनें भागविण्याची संधि या समष्टि जीवनांत आपण उपलब्ध करून देतों. ही संधि कुणी दांडगाईनें घेईल करील तर मानवी जीवन उध्वस्त होईल. याचे दाखले इतिहासांत इतस्ततः विखुरलेले आढळतात.

या इतिहासाच्या दाखल्यांवरून मानवाने पुण्यमय समाज–निर्मिती-साठीं गेलीं अनेक सहस्र वर्षे अहोरात्र खटपट केली. ती खटपट करतांना विचारवंतांनीं मानवी जीवनांचे कांहीं आराखडे मनाशी आंखले होते. पुढेंहि ते आंखले जातील व सर्वस्वाचा होम करून नवीन पुण्यमय समाज–घडणीचे काम ते करीत राहतील. असें हें जें कार्य आहे, तें कार्य म्हणजे काय हें आपण पाहिलें पाहिजे.

याचा अर्थ व्यक्तिविकास व समाजविकास हातांत हात घालून वाट-चाल करीत आले आहेत. या विकासक्रमालाच इतिहासानें उत्क्रांति–क्रांति किंवा संस्कृतीची वाटचाल असें नांव दिलें. संस्कृति हें समाजविकास मोज-ण्याचें माप धरलें गेलें. आतां ‘ संस्कृति ’ म्हणतात ती कशावर उभी आहे हें जाणून घेतलें तर ‘ पुण्य ’ शब्दाची कल्पना अधिक स्पष्ट होईल. संस्कृ-तीचा केंद्रबिंदु आहे व्यक्ति आणि तिच्या भोंवती असलेला मानव समाज. ही संस्कृति एखाद्या विशिष्ट तत्त्वनिष्ठेवर उभी असते. भारतीय संस्कृति अशी समतेवर, एकात्मतेवर, अहिंसक विचारप्रमाणालीवर उभी आहे. रामकाळांत जसा राक्षसी प्रवृत्तींचा विनाश आवश्यक मानला गेला, वेद-काळांत ‘ असुर ’ प्रवृत्तींचा विनाश अनिवार्य कल्पिला गेला. तसाच विनाश आजहि आपण अनिवार्य कल्पितों. विसाव्या शतकांत ‘ लाल ’ राष्ट्रांशी लोकशाहीचें भांडणहि याच तत्त्वप्रणालीवर उभे आहे. अहिंसक व विवेकी पद्धतीनें प्रत्येकाला जगण्यांस संधि दिली गेली पाहिजे. भावनात्मक ऐक्य असो, नाहीं तर एक जगाची कल्पना असो, त्यांत मानव संस्कृतीचीं मूल्यें जगविण्याचांच मुख्य हेतु दिसून येतो.

आतां ही मानवी संस्कृतीचीं मूल्यें तरी काय आहेत ? मानवानें

अनेक भौतिक शास्त्रें जशीं जाणून घेतलीं तशीं कांहीं अध्यात्मिक शास्त्रेंहि त्यानें जाणलीं. हें अध्यात्म काय आहे, याचा त्यानें खोलवर विचार केला. तेव्हां त्याला असें आढळलें की मानवाचें जीवन अनेक पूर्वजीवनांशीं संबंधित आहे. त्या त्या जीवनाचे भलेबुरे परिणाम ( **Results** ) तो बरोबर घेऊन आलेला आहे. तसेंच ज्या भूमींत, घरांत, समाजांत तो जन्मतो, वाढतो त्याचाहि परिणाम ( **Effect** ) त्यावर होतो. इतकेंच नव्हे तर त्या त्या व्यक्तीवर प्रत्येक गोष्टीची बरी वाईट प्रतिक्रियाहि होते. त्यांतूनच तो वाढत असतो.

पण त्याच्या हृदयांत कुठेतरी 'महान्' बनविणारें तत्त्व लपून असतें. ही 'महान्' बनण्याची इच्छा कधी अंकुरते, तर कधी सुकून-करपून जातें हें ' महान् ' बनावयाचें म्हणजे काय ?

मानवाला असा प्रत्यय येतो की त्याचें ज्ञान हें निमित्त आहे. स्मृति कमी आहे. बुद्धीची झेप पुरेशी नाहीं. कधी त्याला असेंहि वाटतें कीं जें आपण करतों तें भाडोत्रीपणें-अनिर्वायपणें ! मग तो विचार करतो जीवनाचा ! जीवन हें श्रद्धाहीन असेल तर तें त्याला रुचकर लागत नाहीं. जीवनांत स्वत:भोवतालचीं अज्ञानकवचें तो फोडण्याचा प्रयत्न करतो. ज्ञानार्थी बनून सत्य समजून घेण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नांतून त्याला हें आढळते की मोह आणि अज्ञान यामुळें जें असत्य होतें तें सत्य वाटत आलें. जें जीवन वाटत होते तें केवळ मृगजळ होतें. मग त्याची श्रद्धा वळकट होतें. मोहांत न सांपडतां अनासक्तपणें सर्व कामें पार पाडण्याचा तो निर्णय घेतो. कारण खरें जीवन म्हणजे आत्मविकास हें त्याला कळतें. नित्याच्या सर्वव्यापांतहि तो ' मी यांपासून वेगळा ' असाच विचार करतो' ही त्याची स्थितप्रज्ञ अवस्था होते. ज्ञानाचा प्रकाश तीव्रतर होत जातो तसें त्याचें ममत्वकवच ढिलें होतें पण दुनियेवर अपार प्रेम करूं शकणारें. दिव्य हृदयहि तो प्राप्त करून घेतो. त्या हृदयानें तो जिथें जिथें जातो तिथें तिथें आनंद आणि प्रकाश यांनीं वातावरण विलोभनीय होतें. हें दिव्य हृदय प्राप्त व्हायला त्यानें जें केलेलें असतें तेंच ' पुण्यकर्म ' होय.

त्यानें काय केलें तें पाहूं. त्यानें अहिंसक बनायचा निर्णय घेतला.

कुणाचेंहि जीवन हिरावून घेणें ही हिंसा. जें मला रुचत नाहीं, तेंच दुसऱ्याच्या बाबतींत करायचें ही हिंसा. सगळ्यांना समान हक्क देण्याची आपण भाषा वापरतों पण जगाची व समाजाची रचना अशी करतो कीं जुथें गरीब-श्रीमंत, नोकर-मालक, दीन-दुर्बल हे सांपडावेत. अशानें समान जीवनाची संधि मिळणार नाहीं. तेव्हां त्या माणसानें हिंसक बनण्याचें टाळलें.

सारेच आपले मित्र आहेत असे मानून अगदीं गोळ्या झाडणाऱ्या माणसावर देखील त्यानें प्रेम केलेलें असतें. सिलोनचें पंतप्रधान बंदरनायकें यांच्यावर गोळ्या झाडणाऱ्या माणसाला उद्देशून त्यांनीं स्वतःच काय म्हटले हें जगजाहीर आहे. 'त्याला सतावूं नका, त्याला छळूं नका' हें त्यांचें वाक्य! श्री. बंदरनायके महात्मा नव्हते; पण त्यांचें हृदय विशाल होतें. 'नाऽयं हस्ति न हन्यते' हें तत्त्व तिथें रूजलें होतें. या उलट आम्ही भारतीयांनी काय केलें? महात्मा गांधींचा खून झाल्यावर निरपराध ब्राह्मण वर्गांवर केवढा गहजब केला! संस्कृति कुठें रुजते, कशी रूजतें हें सांगतां येणार नाहीं. अहिंसा ही जीवनपोषक व जीवनसंवर्धक वस्तु आहे इकडे साऱ्यांचे दुर्लक्ष आहे. जीवनविकासाचा महान पाया 'अहिंसा' आहे कधीं कधीं अहिंसेच्या वस्तुनिष्ठ बाजूनें तिथें टिंगल केली जाते; पण भावनिष्ठ बाजूनें तिचा विचारच केला जात नाहीं.

जीवनाची अन्तश्चेतना अहिंसक आहे. हा अन्तश्चेतनेचा दिव्य प्रवाह हृदयांतून वाहात नसता तर मानवजातच काय पण एकहि प्राणी दृष्टीस पडला नसता. जीवन-प्रवाहाची एवढी आस्था आहे म्हणूनच हा प्रवाह अखंडपणें वाहात आला आहे. पुण्यमय समाजाचा कणा म्हणजे अहिंसा. म्हणूनच जें जें 'अहिंसात्मक' तें तें कर्म 'पुण्यात्मक'. यांतच पुण्य म्हणजे काय या प्रश्नाचें उत्तर येते. कसोटी सोपी आहे. पुण्यात्मक क्रिया किंवा पुण्यमय विचार कसा ओळखावा तर तो आंत-बाहेर अहिंसात्मक आहे कां? ढोंगदम्भ-दिखावा-फॅशन इथें मान्य नाहीं. अहिंसा ही अग्नीसारखी आहे. खोटी अहिंसा कोंडाप्रमाणें चटकन मानवी जीवनावर स्पष्ट

दिसते. म्हणून पुण्यात्मक क्रियेची पहिली कसोटी ही कीं तीं अहिंसात्मक असली पाहिजे. तसेंच ती परपीडात्मक नको. ज्या कार्यांमुळें स्वसंतोष व परपीडा होत असेल अशी कार्यें अहिंसात्मक भासली तरी ती अहिंसात्मक नाहींत.

पुण्यकार्याची दुसरी कसोटी आहे–सत्य ! जीवनांत ज्या कांहीं लहान मोठ्या गोष्टी आपण करतों, त्यांतील सत्याचें प्रमाण हें अधिक पाहिजे. हें सत्य काय आहे हें तुमचें मन तुम्हांला वेळोवेळीं सांगेलच. शिवाय तत्कालीन सामाजिक व राजकीय कायदे हे त्या सत्याला प्रगट करीत राहतील. कायदे जुलमीं असतील तर आपणांस जें सत्य वाटते तें करण्यास व सांगण्यास तुमचीं तत्त्वनिष्ठा तुम्हांला कार्यप्रवण करील. सत्य काय असतें हे तुम्ही ज्या तत्त्वावर निष्ठा ठेवतां त्यानें ओळखलें जातें. चार्वाकांची निष्ठा देहावर व पंचमहाभूतावर. तेव्हां त्यांचे ' सत्य ' वेगळें. वैदिकांनीं यज्ञ–संस्थेवर विश्वास केला तेव्हां त्याचें ' सत्य ' वेगळें. श्रमण संस्कृतीनें आत्मज्ञान, आत्मविकासावर विश्वास ठेवला म्हणून त्यांचें सत्य वेगळें. पाश्चात्यांचा विश्वास ' आकाशांतील बापावर ' आहे. तेव्हां पापपुण्याचे गाठोडें त्या बापाच्या खुंटीवर अडकून ते मोकळे आहेत. त्यांचें सत्यहि वेगळें. शास्त्रज्ञांची निष्ठा द्रव्य–गुणांवर, तेव्हां त्यांचें सत्य वेगळे. अशी सत्याची वेगवेगळीं रूपें दिसलीं तरी जोपर्यंत आत्म्याकडे दुर्लक्ष आहे, आत्म्याच्या गुणांचें विश्लेषण झालेलें नाहीं, जीव–पदार्थाचा अभ्यास झाला नाहीं तोंपर्यंत सारी द्रव्य–गुण मीमांसा हीं अपुरी आहे. म्हणूनच पुण्य–पापाच्या कल्पनाहि भिन्न आहेत.

' मग तुम्ही लक्ष्मणरेषा आंखणार कुठें ? ' माझा मित्र म्हणाला.

' लक्ष्मण–रेषा कुठें आखायची हे मी सांगणार नाहीं. ज्याची त्याने आंखायची आहे. पुण्यात्मक कार्याची ओढ ज्याची त्यानें निर्माण करायची असते. पण मागे सांगितल्याप्रमाणें तिथें स्व–कल्याण व परसंतोष असावा. सामाजिक स्वास्थ्य राहील हेंहि पाहिलें पाहिजे. पुण्याची कल्पना केवळ व्यक्तिनिष्ठ नाहीं. ती समाजनिष्ठहि आहे. पण त्यांतून असा निष्कर्ष

काढला जावूं नये कीं पुण्य ही काल्पनिक वस्तु आहे. ती कल्पना–रम्य वस्तु नसून ती अनुभूतिगम्य आहे.

'पुण्याला दुसरी बाजू आहे. ती पाप कल्पनेची विरोधक आहे. आपलें जीवन हे कमी–अधिक प्रमाणांत हिंसामय असते. त्याचें एक कारण म्हणजे आपला मोह.

स्वामित्वाची भावना, संग्रह करण्याची भावना, भीतीची भावना, उपभोगाची भावना, मानवी मनांतील अदृश्य अशा अन्य अनेक भावना आहेत. त्यांच्याआहारी जाऊन अनेक स्व–पर–हितनाशक गोष्टी आपण करतों प्राण्या बद्दल आदर असेल, सहिष्णुता असेल, दयार्द्रता असेल तर हिंसेची भावना कमी होते. ही हिंसेचीं कार्यें जर बंद झालीं तर मन शांत होतें.हिंसाच मनांत अशांतता निर्माण करतें. भीति निर्माण करते. स्वतःचा जीव बचावण्या–साठीं दुसऱ्याच्या जीवनाची आपण राखरांगोळी करतो. ही संकुचित स्वार्थाची कल्पना अज्ञानांतून उगम पावते. अहिंसेवर निष्ठा ठेवणारा अशा अज्ञानांत राहात नाहीं. अहिंसेंत निष्ठा निर्माण झाली कीं ती मृत्यूची देखील पर्वा करीत नाहीं. निष्ठेने दुःख देखील सुख होतें.

गांधीजींची निष्ठा मानवी हृदयांतील प्रेमावर होती. हिंदु–मुसलमान हे वेगवेगळे नाहींत. हें सांगण्यासाठीं त्यांनीं बलिदान केलें. भ. पार्श्वनाथांनीं यज्ञ करणाऱ्यांच्या अज्ञाननाशासाठीं जीवनपणाला लावलें होतें. भ. महावीरांनी राज्य सोडून याच अहिंसेच्या साधनेसाठीं जीवन वेंचलें. जीवनांतील मांगल्य हें अहिंसेने प्रगट होते; म्हणूनच माझें म्हणणें आहे कीं, जीवनांत अगोदर पहिली गोष्ट घडावी. ती म्हणजे अहिंसेवर श्रद्धा. हिंस्य–हिंसक भावना हीच पापाची जननी आहे. पुण्य ही एक नौका असून ती या पापांतून आपणाला व्यक्तिगत व सामाजिक सौख्यतीराला नेवून पोंचविते. यासाठीं आपला श्रद्धास्त्रोत अहिंसेकडे वळविला पाहिजे. जोंपर्यंत हे होत नाहीं तोंपर्यंत जीवनांत पावित्र्य येत नाहीं.

शिवाय मी हिंसा करतो, मी राज्य करतों, मी श्रीमंत होतो, माझें प्रभुत्व आहे.–ही सारी विचारसरणी अज्ञानांतूनच उगम पावलेली आहे.

'मी' हा अज्ञानांतून जन्मतो, म्हणून अज्ञान हें फार मोठें विनाशक तत्त्व आपण जवळ बाळगतो. या अज्ञानाच्या बाहेर पडायचें म्हणजे या 'मी' चा आपण त्याग करायला पाहिजे, त्यांत अहंकार आहे, मोह आणि अविवेक या जोडगोळीमुळे जग घायाळ आहे. जेव्हां विवेकाचा सूर्य उदित होतो तेव्हांच हें कळतें, कीं सारी संपत्ति, सारे वैभव हे वेश्येप्रमाणें असून त्यांचा उपभोग अनेकदा, अनेकांनीं घेतला आहे. आपण सारे उष्टया पत्रावळींत जेवत आहोंत. जिथें स्मशानें होतीं तिथें शहरें गजबजली. जिथें शहरें होती तिथें स्मशानें. हें लाखदां घडलें आहे. साम्राज्यें कोसळलीं राज्य घराणीं मातीमोल झालो. पण अखंड काय टिकलें असेल तर तें ज्ञान याच ज्ञानाच्या बळावर मानवी मन पुढें होते. त्या ज्ञानाचा शोध आपण कधी घेतो कां ? म्हणूनच पुण्य याची कसोटी आहे तुमची आत्मनिष्ठा किती बलवती आहे यावर.

लौकिकांत पुण्य शब्दाचें अर्थ बदललें आहेत. यात्रेला जाणें, पूजा करणें, दानधर्म करणें, मुंग्यांना साखर घालणे, पाण्याचीं व्यवस्था करणें, धर्मशाळा बांधणें इत्यादि कार्य मानवी हिताच्या दृष्टीने अत्यंत हितकारक आहेत. परंतु त्यामागे पापमुक्तीचा–मोक्षाचा हेतू असेल तर तो तेवढाच साध्य होईल असें मानतां येत नाहीं.

मानवी हिताकडे पाहण्यानें दयाबुद्धी निर्माण होतें. जनकल्याणाची भावना पैदा होणें आवश्यक तर खरेंच; पण जनकल्याण हेंच जीवनाचें इतिकर्तव्य आहे असें मानणें योग्य नाहीं. स्वत:चा विकास व आत्मप्रवणता किंवा आत्मरति हाच जीवनाचा हेतु असावा. तो साध्य करतांना 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' कांहीं करतां आलें तर तें अवश्य करावें.

पुण्य कार्यामुळेंहि कर्मबंधनच होतें. पुण्य ही एक सोन्याची बेडी आहे. पुण्यकर्मानें मुक्ति होत नाहीं. सोन्याच्या बेडींत समाधान मानायचें असेल तर तें अवश्य मानावें; पण बेडी पडणारच असेल तर ती मग सोन्याची कां असू नये एवढाच विचार योग्य. पुण्य–कार्यांनी बाह्य जीवन बहरलेलें दिसतें, परंतु आत्मनिष्ठांचे जीवन आंतून बहरलेलें असतें. आत्मनिष्ठावान हा दु:खाला सुखांत बदलतो, तपाचरणांत तो आत्मानंद उप–

१३८७८

भोगतो. स्थितप्रज्ञ जसा नेहमींच आनंदी तसा आत्मनिष्ठावान सदा आनंदी. पुण्यवानांचें तसें नाहीं. ज्यानें कोट्यवधि रुपयांचें दान केलें व कालांतरानें तो दरिद्री झाला आणि एकादा याचक त्याच्याकडें मागावयास गेला तर त्यास दुःख होते कीं यास आपणांस कांही देतां येत नाहीं. पुण्यकृत्यें करणाऱ्यांना हें तरी दुःख आहेच. पण जो पुण्य कर्म विरहित आहे तो याहि दुःखापासून मोकळा असतो. म्हणून पुण्यकर्मापेक्षाहि ज्ञान-मय नैष्कर्म्य हेंच श्रेष्ठ मानलें आहे.

पुण्यकर्माला आचार्य शुभाचार म्हणतात. जेव्हां खऱ्या धर्मानें आपले हृदय रसपूर्ण होत नाहीं, श्रद्धेचे दिव्य कवच आपण लेत नाहीं, सारासार विवेकाचा उदय होत नाहीं तोपर्यंत याच धर्माचें पालन करावयाचें असतें. डॉक्टर येईपर्यंत जसा प्राथमिक उपचार करायचा तसा. अनेक लोक पूजा, प्रतिष्ठा, मूर्ति उभी करणें, मंदिरें बांधणें, मुनींनी नग्न हिंडणें इत्यादि गोष्टींना विरोध करतात. माझ्यामतें हा विरोध कधींच टिकत नाहीं. कांहीं अविचारी शुभाचार (?) हळूहळू कमी होतात. तेथें विवेक येतो. उत्तरेकडे दह्यादुधानें मूर्तीचा अभिषेक करणें त्याज्य समजलें जातें, पण गोमटेशांचा अभिषेक पाहायला लाखोंनी जमतात. देश-कालपरत्वें कांहीं आचार शुभाचार वाटले तरी ते म्हणजे धर्म नव्हे. कांहीं रूढ आचार म्हणजे चारित्र्य नव्हे ! गफलत होते ती बाह्य आचारांची व चारित्र्याची. जैनधर्मांत जें चारित्र्य म्हणून सांगितलें आहे ते या शुभाचार धर्माहूनहि वेगळें व वरचें आहे. शुभाचाराची रचना ही सामान्यासाठी आहे; ती जर तुम्ही नाकारली तर समाजनीति भ्रष्ट होईल.

‘ हं, म्हणजे नीति हाच शुभाचार असें तुम्ही समजतां की काय ?’

कांही अंशानें तें खरें आहे. समाजजीवनाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. शुभाचाराच्या साऱ्या गोष्टी जशा धर्म (धर्म्यहि) नाहींत तसेंच सर्व नीतिमत्ता म्हणजेहि कांहीं धर्म नाहीं. धर्म मोजण्याचें माप याहून वेगळें आहे. नीतिमत्ता देशकालपरत्वें बदलतें, पण धर्माचीं शाश्वत मूल्यें हीं मात्र कधींच बदलत नाहीत. नीतिमत्तेनें सामाजिक स्वास्थ्य ठीक राहत असेल तर धर्मानें आत्मिकच नव्हे तर सर्वच प्रकारचें स्वास्थ्य लाभतें.

नीतिचा बाजार मांडता येतो. शुभाचाराचाहि देखावा करतां येतो. पण धर्माची गोष्ट वेगळी आहे. सूर्यासारखी बाब आहे. धर्माचा तिथें देखावा नाही. धर्म आणि शुभाचार व चारित्र्य याची गफलत झालेली दिसते ती टाळली पाहिजे.

शुभाचार रूप धर्म ही समाज-नियमनाची व समाजाला सत्प्रवृत्त ठेवावयाची गुरुकिल्ली आहे. दिसायला हे सामाजिक आचार लहान दिसतात पण सारा भारत देश याने बांधला जातो. भक्तामरस्तोत्र तें काय ? पण त्या स्तोत्रानें काश्मिरांतील जैन व कन्याकुमारीचा जैन एकसंघ झाला आहे लहानशा जानव्यानें जसा सारा ब्राह्मण समाज एक झाला आहे त्याप्रमाणें. म्हणूनच मी शुभाचार धर्माला कमी लेखत नाहीं. जे त्याच्यापुढें जातील त्यांनी उच्च आत्मिक साधना करावी, पण या शुभाचार धर्माला नांवें ठेवूं नयेत.

पुण्य ही केवळ कल्पना आहे असें म्हणणें [वितंडावादाचें लक्षण आहे चांगले विचार मनांत आले की वाईट विचार तेथें ठरत नाहींत. अंधाराचीं जागा उजेडानें घेतली तर जसें घडतें तसेंच पुण्यपूत विचारानें घडतें. म्हणून पुण्य हा विचार आहे. त्याचा संबंध मनाशीं असल्यामुळें केवळ कल्पना म्हणून थांबतां येत नाहीं. पुण्य ही दृश्य अवस्था आहे. स्थिति आहे. हवा जशी दिसत नाहीं पण ओळखली जाते, जाणली जाते. त्याप्रमाणें पुण्याचें अस्तित्व दृष्टिगोचर आहे. असें पहा-एकाच आईच्या पोटीं येणारे दोन भाऊ; पण एखादा दरिद्री व दुसरा श्रीमंत. एखादा प्राणी केवळ राजकुलांत जन्मला कीं राजपुत्र ! जणुं जन्म हाच त्याचा पराक्रम ! याच्या मागील मीमांसा म्हणजे त्याचें पुण्य. पण अशी मीमांसा तर्कशुद्ध वाटत नाहीं. पण सध्या दुसरीं मीमांसा तरी सांगितली पाहिजे. शिवाय मागें सांगितल्याप्रमाणें एखाद्या जन्मांतील चांगल्या कृत्यांची प्रतिक्रिया किंवा फळें यांचा विचार सर्वस्वी सोडून देतां येणार आहे का ? कृति म्हटली की त्यावरील प्रतिक्रिया आली. तिची फळें आली. तसें जर झालें नाहीं तर विचारच संपेल. म्हणूनच पुण्य ओळखण्याचे साधन म्हणजेच आज प्राप्त झालेले वैभव, भोग, सत्ता-सामर्थ्य आणि संपत्ति यावरून पुण्यात्मक विचारांच्या

परिणामांचा ( **Results** ) शोध घेतां येतो. पण या वस्तु म्हणजेच पुण्य असें मात्र समजूं नये.

'अनेक वैभवसंपन्न ? लोक तर आचारहीन असतात.'

'खरें आहे. पूर्वीच्या पुण्यकर्मामुळें हें वैभव प्राप्त झालें आहे. याचा विसर पडून जर असा ग्रह झाला कीं, याच देहींचीं फळें आहेत तर असें घडतें. पण असा समज खात्रीने खोटा आहे. मागील जन्मीच्या सत्कृत्यांनी आज वैभव मिळालें आहे. संपत्ति मिळाली ती ब्लॅकमार्केटने मिळाली नाहीं. तशी तीं मिळत नाहीं. अशा प्रसंगीं फक्त आपण आजचाच विचार करतों. केवळ वर्तमान हें आमच्या जीवन-विचारांच्या दिशेच्या विरुद्ध आहे. भूत-भविष्य-वर्तमान असा विचार केला नाहीं तर तो विचार अपूर्ण आहे. आज घडतें तें हेंच. अमक्यानें खून करून पैसा मिळविला. तमक्याने दरोडे घातले व तो राजा झाला. ही कारणमीमांसा विवेकाची नाहीं. विवेचकाची नाहीं आहे वंचकाची. विवेकाचीं द्वारें बंद करून धुळफेकच होऊं द्यावयाची असेल तर हा खेळ चालू ठेवायला कुणाची हरकत नाहीं. म्हणून कर्मामुळें 'असत्' च घडतें हें अगोदर मनांत बिंबलें पाहिजे.

आजची मानसिक विकृति हीच आहे. लोकांना कसा पैसा मिळतो याचा विचार उथळपणें केला जातो. व पैसा कमविण्याच्या घाईत अनेक सूक्तासूक्त मार्ग अवलंबिले जातात. अशा मार्गांचा अवलंब करून जगणाऱ्याकडे बोट दाखविले जातें. पण हा विवेक नाहीं. तुम्हाला पैसा मिळाला तरी जीवनाचें जें ध्येय-आनंद-तो मात्र मिळणार नाहीं. पैसा व चिंता, पैसा व अहंकार, पैसा व मानवहीनता या गोष्टी मिळतील, म्हणूनच विवेकानें पुण्य म्हणजे काय हें जाणून घेतलें पाहिजे. पुण्यानें सुग्रास अन्न प्राप्त झालें तर तें आपण अपचन होईपर्यंत खातो काय ? नाहीं. जिथें हा विवेक नाहीं तिथें तें पुण्य पुनश्च पाप-प्रवृत्त होते. आंब्याचा उपभोग घेतांना रसाचा उपभोग घेतला पाहिजे व कोय पुनश्च पेरून पुढील उपभोगाचा पाया घातला तरच त्याला व्यावहारिक शहाणपणा म्हणतां येईल. तें होणार नसेल तर सारेंच मुसळ केरांत जाईल., जीवन विनाशक तत्त्वांना अंशत: प्रतिबंध कोण करीत असेल तर पुण्य. पुण्य हें **First Aid** आहे.

पुण्य हें वृक्षाच्या सावलीसारखें आहे. 'सूर्य असेपर्यंत त्या सावलीचा आनंद. जीवनांत पुण्याचें तेवढेंच स्थान आहे., जीवन उन्नत करण्याचा मार्ग

वेगळा आहे. जीवनांत ज्ञान व तेंहि आत्मनिष्ठ ज्ञान महत्त्वाचें आहे. हें कळलें तर पुण्याची गरज वाटत नाहीं. झाडें लावतांना ती जशी सावलीसाठीं नसून फलप्राप्तीसाठी. तसेंच जीवन जगावयाचें तें आत्मोन्नतीसाठी. जीवनांत खऱ्या अर्थानें वसंत फुलावा म्हणून पुण्यासाठी जगणें म्हणजे सावलीसाठी वृक्ष लावणें होय. सावली हा हेतु नाहीं. म्हणून ज्यांना आत्मनिष्ठेचा दीप पेटवावयाच्या असेल त्यांनीं या पुण्योपार्जनाच्या मार्गें लागू नये. आत्मनिष्ठा ही वृक्षासारखी असून पुण्य हें स्वयं सावलीसारखे आहे. तें आपोआप प्राप्त होतें. जशा प्रकारची निष्ठा तशा प्रकारची सावली. नारळीच्या झाडाच्या सावलीने कुणाला सुख मिळणार ? म्हणून आत्मनिष्ठ होऊन जीवनाचा साकल्यानें जो विचार करील तोंच खऱ्या अर्थानें श्रेष्ठ ठरणार आहे व खरा सुखी होणार आहे.

कांहींना संपत्ति प्राप्त झाली आहे. त्यांची भावना असते की ती त्यांच्या पौरुषानें मिळाली. ती दान दिली तर परत येणार नाहीं. पण इथे हा विचार अपूर्ण आहे. जर त्याचें पुण्य असेल तर त्यानें दोन्ही हातांनीं दौलत उधळली तरी ती संपत नाहीं. पुण्य म्हणावे तरी कशाला ? आणि पुण्याचा उदय संपला तर साम्राज्याचें अवशेष देखील सांपडत नाहींत. वंशाला दिवाहि उरत नाहीं. कुठें आहे भरत चक्रवर्तीचा वंशज ? कुठें आहे चन्द्रगुप्ताचा वंशज ? संपलें आहे सारे ! म्हणून माझें म्हणणें असें कीं, ज्याचें जवळ जे वैभव आहे, त्यांना तें पुण्यानें मिळालें आहे. त्यांना ते त्यांच्या पुण्योदयापर्यंत मिळतच रहाणार आहे. म्हणूनच दानानें संपत्ति कमी होत नाही असे म्हटलेले आहे. कमी होणार असेल तर न दान करतांहि जेथल्या तेथेंच ती संपत्ति कमी होतें. वैभव संपतें. याचसाठीं पुण्योदय असेपर्यंत दानानें हात पवित्र करावेत, मन पवित्र करावे. वैभव असेल तर त्याचा हाच खर उपयोग आहे.

पुण्य कमी महत्त्वाचें मी मानीत नाहीं; परंतु पुण्यानें जीवनाचा प्रश्न सुटत नाहीं. भोगांचा प्रश्न सुटतो. तथापि भोग सुटत नाहींत. म्हणूनच आचार्य समंतभद्रांनी धर्माची व्याख्या करतांना एक भली मोठी मेख मारली आहे, ते म्हणतात--

अनुक्रम ३८५५१ ...... दि: ........



क्रमांक ........................ नों. दि. १२-११-८

आत्मनिष्ठा नसतांना श्रद्धा, ज्ञान व चारित्र्य यामुळें संसाराची परिपाटी थांबत नाहीं. मूळ हेतू आहे संसाराची परंपरा कमी करणें. पण पुण्यामुळें ती कमी न होता उलट भरधांव धाव तें मूळ हेतुच तेथें विसरला जातो. म्हणून पुण्यफल न मिळालें तरी चालेल तें पण आत्म्याच्या विरागतत्त्वावर, सर्वज्ञत्वावर, अमरत्त्वावर, निरामयतेवर नित्यनूतनतेवर, शिवस्वरूपावर श्रद्धा ठेवीन असा विचार मनांत रूजला पाहिजे.

याशिवाय ज्याचा आपण आज उपभोग घेतो त्याचा उपभोग आपण पूर्वीं कधींच घेतला नाहीं काय ? त्यापेक्षां कांहीं वेगळा अनुभव या वेळीं येणार आहे काय ? कालचीं दुःखें आज सुख बनून येणार आहेत काय ? अविचारीं माणसें पुण्याच्या मागे लागतील तें क्षम्य ठरतें. परंतु जीवनांतील परम मांगल्य ज्यांना कळालें आहे, जें परमोच्च जीवनाचा विचार करतात, त्यांना हें खासच क्षम्य नाहीं.

पुण्य हें असें विलक्षण अमृत आहे कीं त्यायोगे मानव धड मरतहि नाही व धड जगतहि नाहीं पापें करणारा एखादे वेळीं मुक्त होण्याची इच्छा करील, त्याला पापांचा वीट येईल व तो संन्यस्त होईल. परंतु पुण्याची चटक लागलेल्यांचे काय सांगावे ? त्यांच्या मुक्तीचा प्रश्न हें गहन कोडें ठरणार आहे.

‘ तुम्ही अगदीं अतिरेकी दृष्टिकोण मांडतां ? ’

‘ नाहीं. शास्त्रोक्त आहे हा दृष्टिकोणच. पुण्यानें कर्माचा आश्रव होतो. पुण्यात्मक क्रियेंत हिंसा टळतेच असें नाहीं. असत्यहि तेथें दडून असते. कारण पुण्य हें स्वतः फसवें आहे. एखाद्या नोकरानें तुम्हांला तुमचे कपडे दिलें तर नोकरावें दानधर्म केला असें होते काय ? जीं कर्में आत्मतत्वांचा विसर पाडतात. त्यांनीं आणखी दारू पाजली तर ती कर्में आदरणीय ठरतील काय ? जिथें तुमचें अन्तःकरण वासनेमध्यें अडकलेलें आहे, तिथें ते मुक्तीची वासनाच करूं शकत नाहीं. म्हणूनच माझ्यामतें पुण्य म्हणून जें व्यवहारांत मानलें जातें तें जीवन-विकासीतत्त्व नाहीं. आत्म्याची ओळख पटणें, स्वतःला जाणणें. स्वतःच्या आनंदांत रमून जाणें हेंच खरें श्रेयसतत्त्व आहे.

* * *

# चेतना

मानवजात अनेकदा उत्क्रांत झाली. अनेक वेळां तिचें अनेक स्थानीं पतनहि झाले. ग्रीकांची संस्कृति उदयास आली आणि अनेक शास्त्रांची वाढ त्यांनी केली. रोमनें जगाला धर्म आणि संस्कृति दिली. भारतांतहि अनेक जागीं सदृश–तोंडावळ्याच्या संस्कृति निर्माण झाल्या आणि त्या अस्तहि पावल्या. या गोष्टीसंबंधीं मनांत कुतूहल निर्माण होतें आणि संस्कृति शब्दासंबंधींहि घोटाळा होतो. अशा वेळीं अण्णांकडे जाणें हा एक मार्ग होता.

रविवारचा पदार्थ करणें आणि वाचणें जसें अंगवळणी पडतें तसा रविवार अण्णांच्या सहवासांत घालवावा हेंहि आतां आमच्या अंगवळणी पडत चाललें होतें,

'या' हें अण्णांचें दोन मात्रिक स्वागत परिचयाचें असलें तरी त्यांत 'अतिपरिचयांत अवज्ञा' असा कालरूढ झालेला प्रकार नव्हता. अण्णांच्या उच्चारांतहि मार्दव आहे. मार्दवानें हृदय दुखत नाहीं. हृदय द्रवविण्याचें सामर्थ्य मार्दवांत मात्र शंभर टक्के असते. त्यांच्या याच मार्दवामुळे अण्णांचे हजारों मित्र झालें आहेत. त्या मित्रांची वयाची मर्यादा २५ पासून तो ८० पर्यंतची आहे, आणि तिथें जात-पात-धर्म तर मुळींच नाहीं.

आम्ही गेलों इतक्यांत तेथे एक माणूस आला. चेहरा रडका, दीनवाणा ! कांहीं तरी हवें होतें त्याला.

अण्णांनीं बाहेर जाऊन त्याला आंत बोलाविले. त्यांनी घरांत 'याला कांहीं तरी द्या' असा निरोप दिला. आमचें बोलणें चालू होतें. अनेक विषय अण्णा रंगदेवतेप्रमाणें रंगवीत होते. ते स्वतः हंसत होते, इतरांना हंसवत होते. त्या आनंदाला सीमा नव्हती. मी म्हटलें--

'अण्णा, संस्कृति म्हणजे काय ?'

'हीच संस्कृति ! आपण इथें जमलों आहोंत, चर्चा रंगत आहे. पलिकडचा 'माणूस' घरांतून आलेल्या 'पदार्थांवर' ताव मारीत आहे. त्या खुर्चीवर शांतपणें ती मांजर पहुडली आहे. बाहेर पाऊस रिमझिमतो आहे.

याहून संस्कृति काय वेगळी असणार ? मानवानें चेतनेचा विकास केला. हीच चेतनाशक्ति म्हणजे संस्कृति.

आपणास ज्या विविध संस्कृति पाहावयास मिळतात त्या विविध नाहींत. त्या एकविध आहेत. त्यांचें रंग वेगवेगळें आहेत. पदार्थ एक आहे. सर्वांच्या मुळाशीं 'चित्' आहे. त्यालाच मी चेतना म्हणतो. काम-भोगांतीं वर वर चढत गेली तर ती 'साधुसंस्कृति' होते. काम-भोगांतचतून रमली तर 'देव-संस्कृति' होतें. आणि कामभोगानें ती पतित झाली तर ती 'नारकी संस्कृति' होते. स्वतःच्या भोगासाठी इतरांचा विनाश करणारी संस्कृति 'राक्षसी' बनतें व तिचा कालांतरानें नाश होतो.

'आणि मानवी संस्कृति ?'

' मानवी संस्कृति काम–भोगांत रमते. पण तिची ओढ वेगळी असतें विश्वाला गवसणी घालण्याची, तिचीं रूपें पाहण्याची दुर्दम्य मनीषा तिच्यांत वास करतें. तुम्हीच पहा, हे शास्त्रज्ञ वीस–तीस वर्षे एखाद्या प्रयोगासाठीं घालवितात. त्यांना कसलेंच भान रहात नाहीं, पण काम–भोगांचें सुख नाहीं म्हणून ते कधींच दुःखी नसतात. हें मानव संस्कृतीचें भौतिक रूप आहे. दुसरे रूप आहे आध्यात्मिक !

भ. महावीराची तुम्ही पूजा करतां ! त्यांतून तुम्ही जर काम–भोगाची इच्छा केली तर ती झाली भौतिक संस्कृति ! परंतु भ. महा-वीरासारखे तीर्थंकर ' चेतनेचा ' उगम जाणण्याची इच्छा करतात. चेतना काय आहे ? तिचा विकास केला तर अनंत शक्तीचा केवळ पुंज असलेला हा आत्मा लोक–त्रिलोकालाहि कसा व्यापूं शकतो याचें मर्म त्यांच्या हृद-यांत उमलतें. ही चित् शक्ति काय आहे, हें जें तत्त्वज्ञान हुडकतें तेंच उच्च तत्त्वज्ञान ठरतें. हें चेतनेचें कोडे उलगडण्यासाठीं गृहत्याग, संन्यास, व्रतें, दीक्षा, उपवास, वनवास इत्यादि उपाय करण्यांत येतात. काम–भोगांचा त्याग केला जातो. चेतनेशीं एकरूप होण्याची महान् धडपड करणारी अशी ही सर्वश्रेष्ठ ' आध्यात्मिक संस्कृति ' आहे.

' चेतना म्हणजेच ' स्व ' काय ? –मी.

' होय. आध्यात्मिक शास्त्रांत या ' स्व 'ला उच्च अर्थ दिला आहे व्यवहारांत आपण स्वार्थी नसतो. ' स्व ' काय याचा अर्थच त्याला कळत नाहीं. कामभोगांची तीव्र लालसा चेतना स्वरूपाचें विकृत रूप आहे.

' चेतनेचें सु–स्वरूप कोणतें ?'

' चेतनेचें चांगलें व अक्षय टिकणारें स्वरूप आहे आत्मज्ञान. आपण सर्व जें जाणतो तें विश्वबाह्य आहे. पण आत्मविश्वहि जाणण्यासारखें आहे–नव्हे तें जाणल्याशिवाय खरें ज्ञान झालें असें म्हणतां येणार नाहीं. हें आत्मज्ञान म्हणजेच ' स्व–ज्ञान ' आरण ' स्वतंत्र ' शब्द वापरतों तोहि असाच सदोष आहे. इतरांच्या तंत्रानें वागूनहि आपण ' स्व ' तंत्र म्हणवितो. तीच गोष्ट स्वार्थाची आहे. आपल्या जीवनाचा महान् अर्थ आहे. चेतना शक्तीचा विकास. सुजणें जसा शरीरदोष तसा विकार व

विलास हाहि चेतनेचा दोष होय. अशी सदोष चेतनाशक्तिदेखील किती प्रचंड काम करते हे पहावयाचें असेल तर हिटलर, ख्रुश्चेव यांच्यांतील शक्ति पहा ! तीच चेतनाशक्ति किंचित् शुद्ध झाली तर गांधीजींनी काय चमत्कार करून दाखविला हेंहि पहा. म्हणूनच मूळ ' स्व ' हा अणुहून प्रचंड शक्तिमान आहे. परंतु आपण ' स्व ' कडे जाणूनबुजून दुर्लक्ष करतो. भ. महावीरांनीं एके ठिकाणीं उक्ति दिलीं आहे. ' जो एगं जाणइ सो सव्वं जाणइ ' यांतील ' एगं ' म्हणजे ' स्व ' या ' स्व ' चें ज्ञान झालें कीं जगांतील यच्चयावत् वस्तूंचे संबंध लक्षांत येतात. ' स्व '–ज्ञान चेतनेची अभिव्यक्ति होय.

' असा चेतन-विकास कशाने होतो ?' मी विचारलें.

' चेतन विकासाच्या निश्चित अशा पायऱ्या नाहींत. परंतु कल्पनेनें कांहीं अवस्था गणल्या जातात. चेतनेच्या विकासाची पहिली पायरी अंतर्मुख होणें ही आहे पण आजच्या धावपळीच्या जगांत अंतर्मुखतेचा केवळ आभास आहे. त्यामुळें माणुस किती दुबळा बनत चालला आहे याचे प्रत्यंतर लवकर येत नाहीं हें दुबळेपण घालविण्यासाठीं कुणी जीवित–मान ( **Standard of life** ) वाढविण्याचा प्रयत्न करतात, कुणी सिनेमा–नाटकें, सहली, नृत्य, गायन यांत वेळ घालवून, मनाला शांति देण्याचा प्रयत्न करतात. अशानें मनाला शांति तर मिळत नाहीं. उलट मनदेखील दमून जातें. साहित्यदेखील विरंगुळा म्हणून लिहिलें जातें. सारेजण विरंगुळा, श्रमपरिहार यासाठी नित्याच्या चाकोरीबाहेर जाण्याचा प्रयत्न करतात. परंतु याने त्याचें मन अधिक ' उघडें ' पडतें. भोगानें मन प्रफुल्लित होण्याऐवजी क्षयी बनतें. अंतर्मुखतेने भोगलेला भोग हा मनाला शक्ति देतो. पण बहिर्मुखतेनें त्याचा शक्तिपात होतो. आजची अमेरिकन संस्कृति या अवस्थेला आलेली आहे. तिथें माणूस व माणुसकी दोन्ही महाग स्वस्त असें कांहीं नाहीं. भोगाला जबर किंमत द्यावी लागते म्हणून ' अर्थाच्या ' मागे लागलेलें जग म्हणजे अमेरिका व तिची संस्कृति. मोहक पण दाहक आहे ती.

यांतून सुटायचें म्हणजे एक बाजू आहे विनाशाची व दुसरी आहे आत्म-संशोधनाची ! अत्यंत बिकट समस्या जगांत कोणती असेल तर ती

या आत्म्याची होय. त्याच्या अनुभवाला पारखें होण्यासारखें आहे. कोण– त्याहि संस्कृतीचे तेज कसें ओळखावें त्याचें माप आहे एक ? जिथें मानवी चिरंतन मूल्यांची ( आर्थिक किंवा सामाजिक मूल्याची नव्हें ) किंमत केली जाते, जोपासना केली जाते ती संस्कृति तेजस्वी ठरते. भारतीय संस्कृतीचें तसें स्वरूप आहे. संसार, शरीर आणि भोग या त्रिविध मोहकवस्तूपेक्षां मानवीमूल्य-जीवितमूल्य अधिक आहे.

सारा संसाराचा पसारा एकीकडे व भ. महावीर, महात्मा बुद्ध किंवा येशू ख्रिस्त एकीकडे ! यांत एकाद्या व्यक्तीच्या महनीयतेलाच महत्त्व देण्यांत येतें कां ? तर अंतर्मुख होऊन चिरंतन सत्यें, ही माणसें निर्लोभतेनें मांडतात. त्यांचें सत्यदर्शन पैशाच्या किंवा अधिकाराच्या अपक्व पायावर आधारलेलें नसते. म्हणूनच अनंत वेदना सोसून संस्कृतीला जिवंत ठेवण्याचें कार्य ही अंतर्मुख मंडळी करतात. अशा व्यक्तींची चेतना–शक्ति हीच जगांतील महान् शक्ति होय. ही महान् चेतना–शक्ति विवेकाने प्राप्त होते. प्रचंड जलाशयांतील विद्युतशक्ति जशी भौतिक दृष्टीच्या नजरेंत आली तशी आत्म्याची प्रचंड ज्ञानशक्ति केवळ विवेकानें प्राप्त होते. आत्मसंशो– धनानें ती प्राप्त होते. '

' आत्म–संशोधन म्हणजे तरी काय ?' मी.

' शब्द जरा मोठा वाटतो. भावहि मोठा आहे व कार्यहि कांहीं सुलभ नाहीं; पण फार अवघडहि नाहीं. असें पहा. तुम्ही एखादे वेळीं रात्री जागे होता. झोप येत नाहीं. अशावेळीं तुमच्या मनांत असा विचार डोका- वतो. खरेंच मी माझ्या आयुष्यांत काय कमाई केली ? ही सारी संपत्ति, हीं मुलें–बाळें, हा मान मरातब खरोखरच मला मरतांना सुखी करूं शकतो कां? याचसाठी मी राबलों कां? मग तुमच्या मनांतूनच उत्तरें येऊं लागतील. तुमची तुम्हांला गम्मत वाटेल. अशावेळीं सुखानें हुरळून नजातां व दुःखानें मरगळून न जातां स्थिर राहण्यांत पौरुष आहे, असें तुमचें तुम्हांला वाटतें. हीच चेतनेची जागृति होय. मग तुम्ही सुखदुःखें जिंकतां हंसत हंसत सर्व सहन करण्याचा कणखरपणा तयार होतो. कर्तव्य म्हणून कांहीं कटु गोष्टी-

ही तुम्ही करतां. पण त्या कटु गोष्टीमुळें मनाला कटुत्व येत नाहीं. स्वभावांत कटुपणा शिरूं देत नाहीं. पूर्वी तपस्वी हेच करीत. इंद्रियांचें दमन म्हणजे गुलामीचा त्याग. पण बहिर्मुख अवस्थेंत हें खोटें वाटतें. कारण गुलामी ही त्यांची फॅशन असते. त्याचे सुंदर सुंदर कपडे ही गिरणीकामगार, शिपी, धोबी या त्रयींच्या गुलामीतून त्याला मिळाले असतात. पण ते कपडे त्याच्या शरिराला, मनाला गुलाम करतात. हें तो विसरतो. ज्या वस्तूशीं आपला संबंध येतो ती वस्तू आपणाला गुलाम बनविण्याचा प्रयत्न करते. आपलें विवेकाशीं–अंतर्मुखतेशीं वाकडें असल्यामुळें आपण गुलाम झालों आहोंत हें आपणांस कळत नाहीं. आरसे महालांतील कुत्र्याप्रमाणे आपण आपल्यावरच भुंकतो हें आपणांस कळत नाहीं. गुलामीचें विष नयनरम्य असतें. पण त्यामुळें चेतनेला विकृति येतें. श्रीमंताचा विश्वास स्वत:पेक्षां पैशावर बळावतो. बलिष्ठाचा विश्वास शस्त्रास्त्रावर बळावतो. पण हा व्यभिचार आहे. आत्म्यावरील श्रद्धा अशारीतीने पैशासाठीं, सत्तेसाठीं आणि भोग लालसेसाठी विकायला मांडायची बुद्धि (?) माणसाला होते. कारण विकणें आणि विकत घेणें या दोन शब्दांतच त्याचें जीवन घडत गेलें असतें. नफा आणि तोटा हेंच उद्दिष्ट त्याच्या नजरेसमोर असतात. याच व्यापारी गणितामुळें आत्म्याचें त्रैराशिक व्यस्त होतें. अगणित आत्म्याला गणितांत गोवलें कीं आत्मतत्त्व बद्ध होतें.'

'मेल्यानंतर चेतनेचे अस्तित्व जाणवत नाही, मग चेतनेची जागृति वगैरे गोष्टी कल्पित नव्हेत का?' मी म्हणालों.

'खरें आहे. मृत्यु हेंच ज्या व्यक्तीचें ध्येय असेल त्याला हवी कशाला संस्कृति? मरणानंतर कांहीं नाहीं असा विचार करणारी चेतना विकार व मोह यामुळें निश्चेष्ट झाली असते. त्यांतून हाच नेमका प्रश्न बाहेर पडणार! परंतु मरण्यापूर्वीपर्यंत तर चेतनेचें अस्तित्व तुम्ही का मान्य करतां? जिथे चेतनाच नाहीं तिथें जन्म कसला आणि मृत्यु कसला? आणि खरेंच आहे जे लोक अशा कल्पनेने संस्कृति उभारतील ते जिवंत असूनहि जीवनाचा मनसोक्त आनंद उपभोगूं शकणार नाहींत. जिवंत असून नित्य मृताचें जीवन जगतील. हाच शाप आहे अशा जीवनाला. जंगलांत जें

पूर्वी घडत होतें तेंच आज शहरी संस्कृतींत घडत आहे. जागा व साधनें बदलली पण मनें तींच रानटी आहेत. जोपर्यंत चेतनेची जागृति होत नाहीं तोंपर्यंत संस्कृतीला उजाळा येत नाहीं. धुंदी येईल. माज येईल. पण क्षमाशीलता येणार नाहीं. क्षमा, मृदुता, ऋजुता, व शुचिता या चार मानव संस्कृतीच्या दिव्य-देवता आहेत. चेतना जागृतीच्या नंदादीपानें याच देवता उजळून दिसतात.'

'पण हें सर्वांना शक्य आहे का ?' मी.

'सूर्य प्रत्येकासाठीं असतों की नाहीं ? पण कुणी हा सूर्य माझा म्हणतो का ? सत्य साऱ्यासाठी आहे. जो हें अमृत प्राशन करील तो स्वतःच नव्हे तर इतरांना जगवील. कांहींजण जरी जागे झाले तर ते इतरांनाहि जागे करतील. तुम्ही स्वतःपुरता विचार करा. तुम्हांला जागे व्हायचें कां ? इतरांचा विचार तुम्ही करूं नका. ही पळून जाण्याची वाट आहे, हिंमतीनें लढण्याची नव्हे.'

* * *

# तत्त्वज्ञान

एकदां सहज मित्रांशी बोलत बसलों असतां एकजण म्हणाला ' तत्त्वज्ञान साऱ्यांना सांगतां येतं. प्रत्यक्ष भोग नशीबीं आला तर मग त्याचीहि वाचा बंद होते. '

मनाला एकदम असं वाटलं की या माणसाच्या म्हणण्यांतील सत्य तपासून पहावं. त्याच्या म्हणण्यांत दोन प्रक्रिया होत्या. त्यांतील पहिला भाग खरा नव्हता. तत्त्वज्ञान सर्वांना सांगतां येतं, हें म्हणणं खरं नाहीं. तत्त्वज्ञान दुसऱ्यांसाठींच असतं हेंहि खरं नाहीं. तत्त्वज्ञान पुस्तकांतच राहतं, त्याचा जीवनाशी संबंध पोंचत नाहीं हेंहि खरं नाहीं. तत्त्वज्ञान म्हणजे अजागल-स्तनासारखा एक प्रकार आहे हेंहि आमूलाग्र चूक आहे.

तत्त्व हें जीवनव्यापी असतें. तें सहजासहजी दिसत नाहीं. एखाद्या वृक्षांत अग्नि आहे असें म्हणणें एकदम कळत नाहीं; तसेंच जीवन कुणाचेंहि असलें तरी तो कांहीं निष्ठा बाळगून असतो. गरीब माणूस सत्त्वशील असतो. त्याचें स्वतःच्या जीवनासंबंधीं एक तत्त्वज्ञान असतें. त्याला विचाराल की तुझ्या बाजूचें लोक ऐटींत, श्रीमंतींत लोळत आहेत. तुला त्याचें सुख हिरावून घेतां येतें. तसा तूं प्रयत्न कां करीत नाहींस ? तर तो उत्तर देतो-- ' त्याच्या नशिबाने त्यांना मिळालें, माझ्या नशिबांत हेंच आहे. ' दुसरा एखादा म्हणेल--' मी मागील जन्मांत पाप केलें, दैवानें या जन्मांत मला गरीब केलें. '

तिसरा एखादा म्हणेल--' हें सारें राजकीय दारिद्रय आहे. विषमतेमुळें हें दारिद्रय आलें. समाज व राज्यव्यवस्था बदलली कीं दारिद्रय दूर जातें. '

या तिन्ही माणसांच्या विचारांत भिन्न भिन्न तत्त्वज्ञानाची बैठक असल्याशिवाय तो जगत नाहीं. याच अर्थानें माणूस हा माणूसकीला पात्र होतो असें म्हणणें चुकीचें नाहीं. वेगवेगळी तत्त्वज्ञानें ही दिसायला जरी भिन्न वाटलीं तरी त्या सर्वांचा आधार दुःख-विरोध, दुःख-विनाश किंव दुःखाची तीव्रता कमी करणें हा असतो. याचाच अर्थ तो आधार धर्ममूलक आहे. चार्वाकाचें तत्त्वज्ञान हेंहि तत्त्वज्ञान असतें. तो देहाला देह समजून वागत असला व त्याच्या सुखदुःखाचा व आत्म्याचा संबंध नाहीं असें समजत असला तर तेंहि तत्त्वज्ञान पूरकच ठरेल. याचा अर्थ विरोधी वाटणारी तत्त्वज्ञानें विरोधी कां वाटतात तर त्याचा अर्थ वेगळा लावला जातो म्हणून. पण मूलतः दुःख-विनाशी तत्त्वज्ञान हें कितीहि पोरकें वाटलें तरी तें जीवनाभिमुख असतें.

एकदां असें घडलें कीं, एका माणसाचा मुलगा घरांतून पळून गेला होता. पहिलाच मुलगा आणि तोहि हाताशीं आलेला. तो फार दुःखी झाला. दिवस कसा तरी घालवायचा तो. पण रात्रीं त्याला घर भेसूर वाटूं लागलें. एकदां तो मला भेटला. मी त्याचें परोपरीनें सांत्वन केलें. थोडेसें

त्याला बरें वाटले; पण दुःख पुनः उसळून येई व तो वेड लागल्यागत होई. कधीं बायकोला दोष देऊन तिला मारहाण करूं लागला. कधीं शाळेला शिव्याशाप देऊं लागला. पुनः जेव्हां मी समजूत काढण्याचा प्रयत्न केला तेव्हां तो म्हणाला,--

' तुमचें सारें पुस्तकी तत्त्वज्ञान आंहे. व्यवहार कांहीं नाहीं. पुराणातलीं वांगी पुराणांतच बरी असतात. '

माझं मन खिन्न झालं. तत्त्वज्ञानानें त्याचें मन शांत होत नव्हतें. प्रयत्न काय करावा, हरपलेलें सुख कसें परत आणावें हेंच त्याला कळत नव्हतें. मी काय सांगणार ? संसारांतील कांहीं घटनाच अशा असतात कीं, त्यावर इलाज नसतो. अविवेकाला अशा वेळीं फावतें. कधीं माणूस तें दुःख विसरण्यासाठीं दारूचा आश्रय करतो तर कधीं जीवाला बरे-वाईट करून घेतो. पण ही दुःख विसरण्याची मानवी पध्दत असतें कां ? मला नेहमीं वाटत आ लेंआहे कीं ही सारी दुःखपरंपरा कां निर्माण होतें हें आपण समजून घेत नाहीं. म्हणूनच दुःख तीव्र वाटतें. आपल्या वाट्याला दुःख येणारच नाहीं असा अमरपट्टा कोणी कोणाला लिहून दिला आहे कां ? दुःख नाहीं अशी सांसाराची मुळी रचनाच नाहीं. मग या दुःखाचीच मीमांसा करायची पाळी येत नाहीं का ? संसार, शरीर व भोग यांच्या बाबतींत आपलें मन अत्यन्त आसक्त असतें. संसारांत दुःख नाहीं. शरीर नेहमींच तरुण, निरोगी व सौंदर्यसंपन्न राहतें व जे कांहीं भोगोपभोग उपभोगाला मिळतात तें सारे परिमाणतः सुखान्त असतात अशी भोळी समजूत आपण करून घेतों. या समजूतींतच दुःखाचे बीजाणु असतात.

वास्तविक वर सांगितलेले त्रिदोष हेंच संसारिक दुःखाचें निर्मातें आहेत. म्हणूनच रत्नकरण्डक ग्रंथांत ' संसार-शरीर-भोग ' यापासून निर्विण्ण ( उदासीन-अनासक्त ) होणाऱ्यालाच ' साधक ' म्हटलें आहे. हें म्हणतांना स्वामी समंतभद्राचार्यांनीं सूक्ष्मतेनें दुःखाची कारणपरंपरा शोधून काढली आहे असें दिसून येईल. ज्या ज्या अंशानें आपण स्वामींच्या उपपत्तीशीं सहमत होऊं त्या त्या अंशानें दुःख जिंकण्याचें सामर्थ्य आपल्या

अनुक्र. ३८५५९ वि: ........ नों दि: २८-११-६०

अंगीं येतें. दु:खें येणारच हें मनांत धरलें पाहिजे. दु:खाचा विचार न करतां मला नेहमीं सुखच मिळेल अशा गफलतींत रहाणें म्हणजे केवळ तर्काशी केलेला व्यभिचार होय.

म्हणूनच तत्त्वज्ञानाची आवश्यकता भासते. तत्त्वज्ञानाचा पगडा इतका असतो की जगाला त्यापुढें मान तुकवावी लागते. भ. महावीरांच्या अहिंसातत्त्वाचा एवढा प्रभाव पडला कीं ज्या वैदिकांना पुरोडाश झोडल्या-शिवाय चैन पडत नव्हती व यज्ञसंस्थेवर ज्यांचा अपार विश्वास होता त्यांना ते पूर्णत: बंद करावें लागले.

शंकराचार्यांना तात्त्विक पराभव मान्य करावा लागून त्यांनीं अहि-सकतेची उपासना अंगिकारली. अहिंसेची कोणी कितीहि कुचाळी केली तरी तिनें निर्माण केलेली परंपरा पाहिली तर मति आश्चर्यानें थक्क होते. पाश्चिमात्यावर हेगेल, कान्ट, डार्विन यांचा एवढा पगडा आहे कीं त्यांची संस्कृति त्या तत्त्वज्ञानाला सोडत नाहीं.

आपल्याकडे वरील लोकांचा अभ्यास करणारे कितीहि होऊन गेले तरी महात्मा गांधीच्या तत्त्वांचा जो पगडा जनमनावर बसला तो इत-रांचा बसला नाहीं. मार्क्स नांवाच्या साध्या माणसाचा सर्व जगावर जो प्रभाव आहे तो आपण पहातोंच. साऱ्या मजूरवर्गाला त्याने अहिंसक पण अत्यंत प्रभावी शस्त्र (संप) हातीं दिलें. जिथे जिथें उद्योग, कारखाने तिथे तिथे मार्क्स जिवंत आहे. त्याचें तेथें राज्य आहे. माझ्यामतें इतका मोठा भौतिक तत्त्वज्ञानी झालाच नाहीं.

मूळांत तत्त्वज्ञान दिसायला दुबळें दिसतें; पण एखादा माणूस त्याने पेटतो व तो आपल्या प्रभावानें तें अमलांत आणतो. इतिहासाच्या दृष्टीने आपल्या मतावर भिन्न तत्त्वज्ञानाचा प्रभाव आढळून येतो. भ. महावीरां-च्या निर्वाणानंतर ज्या भिन्न संस्कृति देशांत आल्या त्यांनीं आमच्या तत्त्व-ज्ञानाला थोडेसें वेगळें वळण लावलेंच. मुसलमानांनीं जेव्हां देवळे भ्रष्ट केली तेव्हां बिनमूर्तींचीं प्रार्थनागृहें व आराधनागृहें अंमलांत आलीं. जैन-समाजांत केवळ ग्रंथपूजक असा एक पंथ आहे. काळ बदलला तरी ते जुन्या परंपरेला चिकटून आहेत. जेव्हां तत्त्वज्ञान जाणतेपणाने अमलांत येत

नाहीं तेव्हां त्याला परंपरा–रूढी याचें स्वरूप प्राप्त होतें. मूळतत्त्व मात्र तिथें असतें. तें सहजीं लक्षांत येत नाहीं. म्हणून कांहीं समाजतरुण त्यामध्यें कांहीं बदल सुचवितात. परंतु हें करतांना त्यांच्या लक्षांत येत नाहीं कीं ज्याचा ते विरोध करतात तीं तत्त्वें नसून रूढी व परंपरा आहेत. व्रण गेला तरी डाग कायम राहतो त्याचप्रमाणें तत्त्वज्ञान लोपलें व रूढी कायम राहिल्या. या सुधारकांनीं त्यास नुसता विरोध करून भागणार नाहीं. त्यासाठीं तत्त्वज्ञानाची पुनश्च उभारणी केंली पाहिजे. पण हें सामर्थ्य त्यांच्याजवळ नसतें. घरीं बसून केवळ मौजेखातर कांहीं ते सुचवीत असतात. अशानें सुधारणा होणार नाहीत, झालेल्या नाहींत. स्वतःच्याच जीवनांत तत्त्वज्ञान पेटलें असेल तर नवें जीवन अम्मलांत येतें; पण दुर्दैवानें असें घडत नाहीं.

'ज्याच्या जीवनांत तत्त्वज्ञान नाहीं, तो सुखी असूं शकत नाहीं काय ?' एक शंका.

'–नाहीं. जीवन म्हणजेच तत्त्वज्ञान. अगदीं भोगवाद किंवा शरीर–सुखवाद मानणारा व त्याचे प्रतिपादन करणारा हें जाणतो कीं भोग हवे तेंवढे मिळत नाहींत. ते तसे कां मिळत नाहींत ? भोग भोगून शांति कां मिळत नाहीं ? शरीर थकून कां जाते ? म्हातारपण कां येतें ? मृत्यु कां येतो ? या प्रश्नांचीं उत्तरें त्याला सांपडत नाहींत. त्यालाहि भीति आहेच. तेव्हां केवळ भोगवादी देखील भोगवादी रहात नाहीं. तो व्यवहारहि जाणतो. पत्नी–धर्मांचे पातिव्रत्यहि जाणतो. नीति मानतो. खरें म्हणजे भोगवादी माणसाला हीं तरी बंधनें कां असावीत ? तो निव्वळ शतप्रतिशत भोगवादी नसतो म्हणूनच.

'–साऱ्या तत्त्वज्ञानावर तुम्हांला एक छाप पडलेली दिसते. ती छाप आहे आत्मवादाची. मानवाने शरीर व मन यांच्या वर येऊन आत्म्याचा शोध घेतला. आत्म्याचें अस्तित्व मानलें कीं अनेक फडतूस तत्त्वज्ञानें पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे विरून जातात.

आत्मवादाची कांस ज्या दिवशीं मानवानें धरली तो दिवस फार

मोलाचा आहे. ख्रिस्त पुराणांत एक ईव्ह आणि अँडमची गोष्ट आहे. ईव्ह व अँडम जिथें ज्ञान नाहीं अशा वनांत केवळ भोगवादी जीवन जगत होते. परंतु यांना एका गोष्टींचे वैषम्य होतें. ज्या नन्दनवनांत ते विलास करीत होते, तिथं एक ज्ञानवृक्ष होता. त्याचीं फळें चाखायला त्यांना बंदी होती. एके दिवशीं ईव्हच्या सांगण्यावरून अँडमने त्या ज्ञानवृक्षाचीं फळें खाल्लीं. पण त्यामुळे त्याला नंदनवन सोडणें भाग पडलें. ही गोष्ट मोठी सूचक आहे. आत्मवादी होणाऱ्याला भोगवादी राहतां येत नाहीं. ज्ञान हें अग्नी-प्रमाणे स्वपरप्रकाश आहे. एकदां आत्मज्ञानानें जीवन उजळले तर मग भोगाचीं जळमटे तेथें राहत नाहींत. म्हणूनच आत्मवादी व्यक्तीला ज्ञान-वादी बनावेंच लागते. जर तसा तो बनत नसला तर त्याचें ज्ञान हें खरें ज्ञान नाहीं. म्हणून तत्त्वज्ञान हें आत्मजागृतीचें साधन आहे. आत्मजागृती-शिवाय केवळ तत्त्वज्ञान उपयोगी नाहीं. आत्मजागृति झाली की तत्त्वज्ञानाचें काम संपतें. याच अर्थाने 'पुराणांतील वांगी' या वाक्यप्रचाराचा अर्थ आहे. पण सुरुवाती सुरवातीला तत्वज्ञान दुःखाचा ताप व तीव्रता कमी करते. 'तत्त्वज्ञानं हि जागर्ति विदुषामार्तिसंभवे' असें जें म्हटलें जातें तें अगदीं खरें आहें. तत्त्वज्ञानाचा उपयोग दुःखविनाश किंवा दुःखविमुक्ति तर खराच, पण तो तेवढ्यापुरताच असतो. घरांत कुणी मेलें तर जें वैराग्य संभवतें तें जसें तकलुफी तसेंच केवळ दुःखाला सह्य बनविणारें तत्त्वज्ञान हेंही तकलूफी आहे. मूळ तत्त्वज्ञानाचा हेतु आत्मजागृति आहे. चेतन जागृत झालं कीं ते आत्मज्ञानाला जागृत करतं. तेव्हां मला सांगायचं हें आहे की तत्त्वज्ञान हें केवळ डोक्यांत शिरून भागत नाहीं; केवळ दुःखलेपासाठी वापरूनहि चालत नाहीं, तर तें हृदयांत आत्म्यांत उतरलं पाहिजे.

एका तत्त्वज्ञानी माणसाची गोष्ट सांगतो. आर्किमिडीज नांवाचा एक तत्त्ववेत्ता होता. पण तो भूमितिशास्त्रज्ञहि होता. तो आपल्या खोलींत बसला असतां जमिनीवर खडूनें त्रिकोण, चौकोन इत्यादि आकृति काढून त्यावर सारखा विचार करीत असे. ग्रीसवर कुणी तरी स्वारी केली होती. कांहीं सैनिक त्याच्याहि घरांत शिरले. पण हा शांत होता. अशांत माणसाला शांतता फारच बोचते. तशी त्यांनाहि ती बोचली. आर्किमिडीजनें त्या

शिपायांकडे पाहिले देखील नाहीं. शिपाई रागावले. त्यांनीं त्याच्यावर वार केला. मरतांना तो म्हणाला—' माझ्या त्रिकोणांना धक्का लावूं नका—' खरा आर्किमिडीज त्यांत आहे. शिपायांना त्यांतले काय कळणार ?

तत्त्वज्ञानी हा मृत्यूला भीत नाहीं. कारण त्याने मृत्यूचें तें भयाण खोपटें केव्हांच भस्म केलें असतें. तो जीवन जगत असतो. आपण सारे मृत्यु जगतो. क्षणोक्षणीं भीति, आशंका, विकार यांच्या चक्रांतून पिळवटून निघत असतों, पण ज्ञानीं माणसाचे तसें नाहीं. तो यांतून बाहेर पडलेला असतो. म्हणूनच आमच्या भोगवादाला, आमच्या दैववादाला, आमच्या अज्ञान-वादाला तो हंसत असतो, हें हसणें आम्हांला फार बोचतें.

आणखी एक प्रसंग सांगणार आहे. माझे एक वृद्ध मित्र आहेत. त्यां-च्याजवळ खूप पैसा आहे. घरी कुणीहि नाहीं. मूल नाहीं. बायको नाहीं. एकदां तें म्हणाले--

' मुनींना कांहीं व्यवहारज्ञान नसतें.'

मी हंसून म्हणालों--' बरोबर आहे ! '

' काय बरोबर आहे ? मी आज देवळांत गेलों होतो. तेथें एक मुनि आहेत. उगीच दर्शन घ्यावें म्हणून गेलों तर मला उपदेश करुन म्हणाले-- ' तुमचं वय झालं. आतां तरी कांहीं व्रत वगैरे घ्या. ही संपत्ति द्या सोडून. समाजांत अनेक लायक संस्था आहेत त्यांना द्या वाटून इ. इ.'

' मग तुम्ही काय म्हणालांत ?' मी.

' काय म्हणणार ? मी म्हणालों कीं तें सारें मला कळतें. पुस्तकांत रोज आम्हीं वाचतों की संपत्ति चंचल आहे. बरोबर कुणी नेत नाहीं. हें तुम्ही मला सांगायला नको.'

मी म्हणालों-'तुम्ही असें उत्तर द्यायला नको होतें. मुनि आणखी काय सांगणार ? पण तुम्ही जें म्हणतां कीं तुम्हाला सर्व कळते हें मात्र खोटं. लक्ष्मी चंचल आहे, हें तुम्हांला कसं कळलं ? तें कळलं कीं तुम्ही तिचा नाद सोडाल. पण नेहमी असंहोत की जें कळलं असं वाटतं ते मुळांत

कळत नाहीं. आपण आपल्या विचारांशी झोपेंत वागल्याप्रमाणें वागतों. मला तर वाटतं की हें सारं तपासून घेऊनच वागलं पाहिजे. तपासायला वेळ नाहीं हें खरं, पण म्हणून जें आम्ही गृहीत धरतों तें सारं खरं असा आग्रह तरी बरोबर कसा ?

' तत्त्वज्ञान आणखी एका प्रसंगीं विनाशक असतं '--मी

' तें कसें ? '

' तें असं की माणूस पाप लपविण्यासाठीं तत्त्वज्ञानाचा आश्रय घेतो. एखादी स्त्री व्यभिचार करीत असेल तर ती देखील एखाद्या तत्त्वज्ञानाचा रेशमी कोश तयार करून त्यांत राहते. तिचं--म्हणणं शरीर तर नाशवंत आहे. तिथं व्यभिचार काय अन् पातिव्रत्य काय ? चोराला विचारलं तर त्याचंहि तत्त्वज्ञान तयार ? तो म्हणतो-' चोर नाहीं कोण ? राजे-महाराजे तर मोठे चोर आहेत.

'-व्यापारी लहान चोर आहेत. ऑफिसांतील कारकून मंडळीहि (काम) चोर आहेत. सारा चोरांचाच बाजार आहे. हिंसक देखील असाच विचार करतो. मांसाहारी देखील आपलें तत्त्वज्ञान तयार करतो. शिकलेलीं माणसें दारू पितांना मी पाहिलीं आहेत. त्यांचेंहि तत्त्वज्ञान ठरलेलें,--' आम्ही आणखी पांच-पन्नास जन्म मोक्षाला जायचे नाहीं म्हणून ठरवलेलें आहे. शिवाय दारू नाहीं कुठें ? हें जीवन म्हणजेहि एक महादारूच आहे. प्रत्येक-जण कसल्यान कसल्या तरी गुंगींत आहे. ( आणि मग तो काव्यात्मक उतारे देतो. ) तत्वज्ञानाचा असा बेलगाम वापर करणारा हा वर्ग मात्र फार भयंकर आहे. जगांत आज जें वैचारिक विष पसरलें जात आहे तें अशा उथळ तत्वज्ञानी (?) माणसांकडून. अर्थात त्यांच्या म्हणण्यांत सत्य नसलें तरी ते जो देखावा उभा करतात त्यामुळे सामान्य माणसें ( जीं अगोदरच बावचळलीं आहेत ) मात्र मातीमोल होतात.

दुसरें आणखी कांहीं शत्रू या तत्वज्ञानाचे आहेत. ते बोलतांना तत्वज्ञान बोलतात. माणूस गार झाला पाहिजे असे तें तत्वज्ञान असतें. निरुत्तर करणारें तें तत्वज्ञान असतें; पण आचार करतांना नेमकें तत्वज्ञान त्यांत

नसतें. राजकारणांतील हें विष समाजांत फैलावत आहे. भावनात्मक ऐक्याच्या तत्त्वज्ञानावर उभे राहुन जातीयवाद अंमलांत आणायचा; पण कुणी त्याचा उल्लेख केला तर तो स्वत: जातीयवादी ठरतो. अशा रीतीनें हवें तसें आचरण करूनहि तत्त्वज्ञानी राहणाऱ्यांचा हाहि वर्ग मोठा कसरती असतो. या तत्तज्ञानानें हानि होण्यापलीकडे कांहीच साध्य होत नाहीं.

म्हणून जीवन जगणाऱ्या व्यक्तीनें जें तत्त्वज्ञान माझें म्हणून म्हटलें असेल तें जर दूषित असेल, एकांतिक वा अतिरेकी असेल, अनाचरणीय असेल तर त्याचा त्यागच केला पाहिजे. जीवनांत आनंद निर्माण न करणारे, जीवनाचें मांगल्य घालविणारें तत्त्वज्ञान हें तत्त्वज्ञानच नाहीं. म्हणून तत्त्वज्ञानाचें अमृत पितांना हा धोका आपण टाळला पाहिजे असे तुम्हांलाहि वाटतें काय तें पहा.

* * *

# सत्य

श्री. अण्णा यांच्याशीं झालेल्या चर्चेचा एक भाग गेल्या कांहीं प्रक-रणांत आला. चर्चेचा आजचा विषय होता नेहमीचा. परन्तु अवघड. कांहींसा कळत असतांहि अनाकलनीय ! तो विषय म्हणजे सत्य. अण्णा खुषींत होते. जेवण्या-खाण्याचें भान ते विसरून गेले होते.

ज्ञानाचा आनंद चाखावा अण्णाजवळ. कारण हिम्मतवाला माणूसच अण्णापुढें टिकतो. त्याचे विचार अनेक विषयांच्या अंतस्तलाला स्पर्श कर-तात. पण तें समजून घेण्याची थोडीशी पात्रता व प्रश्न विचारण्याची क्षमता असली म्हणजे मग चर्चा रंगते.

मी विचारले, ' अण्णा, सत्य म्हणतात तें काय ? अनेक विचारवंत अनेक साधुपुरुष, अनेक तीर्थंकर या पुण्यभूमींत जन्माला आले. कोणी

भौतिक तत्त्वज्ञानाला जन्म दिला, कोणी आध्यात्मिक तत्त्वज्ञानाला उजाळा दिला; कोणी क्षणिकवाद जगाला सांगितला, तर कोणी नित्यवादाचा पुरस्कार केला, कोणी ब्रह्म तर कोणी माया, कोणी अज्ञान तर कोणी ज्ञान, कोणी भक्ति तर कोणी क्रिया यांचा महिमा सांगितला. त्यांपैकीं कोणींहि व्यक्तिगत स्वार्थानें कांहीं करीत होता असें म्हणावेसें वाटत नाहीं. मग असें असतां सत्यासंबंधीं असा गोंधळ कां ?

अण्णा म्हणाले--' गोंधळ आहे, तो आपल्यांत. स्वतः बाजारांत जायचें आणि इथें इतकी गर्दी कां ? असें विचारायचें, असा हा प्रकार आहे. '

तें पुढें म्हणाले--

' वरील विचारसरणी दोघांच्या तोंडून बाहेर पडतें. पहिला वर्ग अशा लोकांचा असतो कीं त्यांना धर्म नको असतो आणि सत्य शोधण्या-इतपत वैचारिक पक्वता त्यांच्या ठिकाणीं आलेली नसल्यानें सब झूट आहे असा सोईस्कर समज ते करून घेतात.

दुसरा वर्ग असतो जिज्ञासूंचा. असे जिज्ञासू जरी थोडे असलें तरी अपक्व दशेमुळें त्यांच्यांत असा गोंधळ उडतो; पण ज्ञानी माणसांचा गोंधळ उडत नाहीं. विसंवादांतूनहि संवादी सूर काढण्याइतकी त्यांची बुद्धि पक्व असते. ज्या ग्रंथींतून ज्ञानाग्नि शिरतो ती ग्रंथी वरूनच ग्रंथीसारखी दिसतें. खरी म्हणजें ती ग्रंथी राहत नाहीं. सत्य हें अनाकलनीय खरेंच. परन्तु ज्याप्रमाणे लहानशा दीपज्योतींत तमोहरणाची दिव्यशक्ति असतें तीच दिव्यता व दाहकता सत्यांशांत असते हें विसरून चालणार नाहीं. '

अण्णांची दृष्टि विचक्षणा जातीची आहे. त्यांच्यापुढें एखादा दृष्टि-कोन सांगितला कीं त्यांतील सारतत्त्व कोणतें व ग्राह्यांश कोणता हें तात्काळ ते विश्लेषण करून सांगतात.

मी अण्णांना म्हटलें,--' सत्य हें तर अनिर्वचनीय आहे. असें असतां सत्य बोला असा वदतोव्याघात कां ? '

अण्णा हंसून म्हणाले, ' तुमचें म्हणणें बरोबर नाहीं. सत्य अनिर्वच-

नीयच आहे असें म्हणणें खरें नाहीं. सत्य वचनीयहि आहे. ‘ तुम्ही जिवंत आहांत ’ हें म्हणणें खरें कीं खोटें ? ’

‘बरें तें जाऊं द्या ?’ मी म्हणालों. ‘अण्णा, खरें सांगायचें म्हणजे...’

अण्णा माझें वाक्य मध्येंच तोडून म्हणाले--‘ खरें सागायचें म्हणज काय ? आतांपर्यंत तुम्ही खोटें बोलत होतां कां ?’

आम्ही दोघेहि मोठ्यांदा हंसलों. ते पुढें म्हणाले, ‘ सांगा, काय सांगत होतां तें ?’

मी म्हणालों, ‘ अनेक मतें आणि अनेक माणसें. आम्ही कुणाचें सत्य मानावें ? माझा तर अगदीं गोंधळ उडाला आहे. उद्यां रशियन लोक चंद्रावर गेले म्हणजे चंद्रासंबंधीं पूर्वींच्या शास्त्रकारांनीं सांगितलेलीं, कवींनीं वर्णिलेलीं स्तुति-स्तोत्रें खोटी ठरतील ! ज्याला आम्ही आतापर्यंत सत्य म्हणत होतो, तें एकाएकीं असत्य ठरेलसें पाहून आमचा गोंधळ होतो. आमच्या श्रद्धेचा अगदीं मृत्युलेख लिहिला जातो. ’

अण्णा म्हणाले, ‘ बरोबर आहे. तुम्ही जिथें श्रद्धा ठेवली, ती जागा धोक्याची आहे हें तुम्ही स्वतः तपासून पाहिलें आहे कां ? ज्ञानपूर्वक, डोळसपणें तुम्ही श्रद्धा ठेवली असती तर गोंधळून जाण्याचें कारण नव्हतें. केवळ सश्रद्ध जीवनानें काम भागेल असें जीवन लोप पावत आहे; पण याचा अर्थ आमच्या जीवनांत, आमच्या श्रद्धेंत अधिक शास्त्रीयता हवी. आणि शिवाय श्रद्धा हें साधन आहे. साध्य नव्हे. कधीं कधीं कल्पित प्रमेयांनींही खऱ्या प्रमेयांचा शोध लागला आहे--’

‘ मग साध्य काय आहे ? ’मी.

‘ साध्य आहे सत्य-सत्याचें दर्शन ! श्रद्धा हें साध्य नव्हे. श्रद्धा ज्यावर असावी असे एकच प्रमुख तत्त्व आहे, तें म्हणजे जीव-तत्त्व ! ज्याच्या बळावर सर्व मानव अनेक प्रकारचे भौतिक, बौद्धिक व आध्यात्मिक चमत्कार करून दाखवितो तें तत्त्व म्हणजे आत्मतत्त्व !’

‘ पण आत्माच न मानणाऱ्यांचे काय ? आत्माच मानला नाहीं तर

सत्य–असत्य. धर्म–अधर्म, नीति–अनीति याचे कामच ठरणार नाहीं. ' मी म्हणालों.

' तसा प्रयोग करून पाहणारे झाले नाहींत असे नाहीं; पण ते प्रयोग फसले. चार्वाकांनीं त्या अनात्मवादाची उपासना केली. पण शेवटीं त्यांना इतरांचें तर जाऊं द्या, पण स्वतःचेहि हित साधतां आले नाहीं. अनात्म–वादी दृष्टिकोन हा नवीन नाहीं. तो दृष्टिकोन वाटतो तितका सोपा नाहीं. एकदां त्या तत्त्वाचा अंगिकार तुम्ही जाहीरपणाने करून पहा. भौतिक–वाद्यांना देखील जाहीरपणानें हें मान्य करून भौतिक हित साधतां येणार नाहीं.

समजा, कुणी खून केला. त्याला तुम्ही काय म्हणून शिक्षा देणार ! ' ज्यांत जीवतत्त्वच नाही अशी वस्तु मी नष्ट केली तर काय चूक, असे तो खुनी म्हणणार ? अनंत गुणसमुहानेयुक्त असा आत्मा न मानला तर पार–मार्थिक तर सोडा पण ऐहिक व्यवस्था तरी नीट जमेल कां ?

म्हणूनच उपनिषदांत व आगमांत आत्म्याचे एवढें बिषद वर्णन आलें आहे. जैन तत्त्वज्ञानाचा तर मूळ आधार जीव–दृष्टीच आहे. ' जो एगं जाणई सो सव्वं जाणई। ' असें ज्ञानाचें बर्णन आहे. ज्यानें आत्मा जाणला त्यानें सर्व जग जाणलें. ज्यानें आत्म्यावर श्रद्धा ठेवली त्याने जगा–वर श्रद्धा ठेवली. श्रद्धा ही जर तरवारीची धार मानली तर तिचा धारक आहे आत्मा.

' पण आत्मा कुणी पाहिला इथं ! ' मी पुनः पृच्छा केली.

' इथेच तर तुमच्या ज्ञानाच्या कक्षेची कसोटी आहे. इंद्रियगम्य आहे तेवढेंच ज्ञेय आहे हा भ्रम आहे तुमचा. तुम्ही समर्याद झाला. उलट आत्मवादी दृष्टिकोन हा अधिक विशाल आहे. कारण इंद्रियांच्या माध्यमां–तून, हालचालीवरून आत्म्याचें संशोधन होणें शक्य नाहीं. आत्मा स्वतः ज्ञादवान आहे. इंद्रियें ही ज्ञानाची बाह्य साधनें आहेत. केवळ मेंदू म्हण–जेच ज्ञानाचे कार्यक्षेत्र नव्हे. मेंदूचें संचालन करणारा आत्मा ज्यांना दिस–णार नाहीं ते या बाबतींत अधिक पुढें जाणार नाहींत. '

यावर अण्णांनी एक मजेशीर दृष्टांत दिला.

ते म्हणालें, ‘ एक श्रमण साधु होता. त्याला एका राजानें बोलावले. राजानें विचारलें, ‘ तूं आत्मवादी आहेस ?’

‘ होय, ’ तो म्हणाला. मग राजानें एका मनुष्याला बोलावले व म्हटले, ‘ याच्यांत आत्मा आहे ?’

‘ होय. ’

‘ मग मी याचे दोन तुकडे करतो. मला आत्मा दिसेल का ?’

‘ नाहीं. ’

‘ चार तुकडे करतो. मग तरी आत्मा दिसेल का ?’

‘ नाहीं दिसणार, ’ श्रमण म्हणाले.

त्यानंतर श्रमणानें राजाला सांगितलें, ‘ तुझ्या आचाऱ्याला बोलाव. ’

आचारी आला. मग त्यांनीं विचारलें, ‘ तूं स्वयंपाक करतोस ? ’

‘ होय महाराज !’

‘ मग एक लांकूड घेऊन ये.’

आचाऱ्यानें लाकूड आणले. श्रमणानें विचारलें,

‘ यांत अग्नि आहे ?’

‘ होय महाराज ! ’

मग त्या लाकडाचें दोन, चार, आठ असे अनेक तुकडे करण्यांत आले. पुन: त्याने विचारले. ‘ कुठे आहे अग्नि ? मला तर दिसत नाहीं. ’

राजाला हे पटलें कीं आत्मा ही वस्तु विवाद्य नसून निर्विवाद आहे.

मी म्हणालों–‘ हें आत्म्यासंबंधीं झालें पण आपल्या सत्याचे काय ?’

‘ पाहूं ना ? सत्याचा अर्थ फार व्यापक आहे. जें जसें आहे तें तसें पाहणें, समजणें, जाणणें, अनुभवणें, स्मरणें अशी सर्व क्रियापदें इथें लावा. जें याच्या विसंगत तें असत्य आहे. सत्य हा केवळ वाणीचा अलंकार नाहीं. तो जीवनाचा आहे. ज्ञानाचें तें एक कोंदण आहे.

जीवनाची संपूर्ण अभिव्यक्ति अहिंसक होईल त्याच वेळीं सत्याचरण अंगीं बाणलें जाईल. कैवल्याची कल्पनाहि सत्याच्या अविष्काराशीं जुळती आहे. जैनधर्मांत जो स्याद्वाद् सांगितला आहे किंवा ‘ आईस्टाईन् ’ नें जो सापेक्षतावाद मांडला आहे त्यानें तरी काय झालें ? सत्य अधिक स्पष्ट

झालें. ज्या वतूची आपणांला एक अस्तिरूप बाजू माहित आहे त्या वस्तूला दुसरी नास्तिरूप बाजूहि आहे ' हें आपण विसरतों. ज्याला सत्य म्हणून आपण कवटाळतो तो सत्याभास नाहीं ना याची आपण कधीं कधीं दखल घेत नाह़ी. आणि म्हणूनच तुम्ही मागे म्हणाला त्याप्रमाणें जीं सत्यें म्हणून तुम्ही उराशी बाळगलीं ती गृहींत सत्यें होतीं. प्रत्यक्ष पारखून किंवा अनुभवून तीं सत्यें आपण उराशीं बाळगलीं नव्हतीं हें शरीर जेव्हां मृत्युमुखीं जाते तेव्हां अज्ञानी मनुष्य शोक करतो. पण ज्ञानी माणूस त्याचें अनित्यत्व नेहमींच ओळखत असल्यानें त्याच्या नश्वरतेसंबंधी त्याला कधींच वाईट वाटत नाहीं.

स्थितप्रज्ञ अवस्था म्हणजे तरी काय? एकदा बाह्य जगताचें उत्पत्ति –स्थिति आणि विलय अशा प्रकारचें खरें स्वरूप कळालें कीं माणूस ज्ञानानंदांत गढून जातो. सुखदु:खाच्या तो अ ीत होतो असें म्हणण्यापेक्षां सुखदु:खाचें उघडें-नागडें स्वरूप तो जाणतो. म्हणूनच हर्ष–विषादांत तो रमत नाहीं. सर्वप्रकारच्या सांसारिक, भौतिक क्रियेत तो रमल्यासारखा वाटतो. पण पाण्यांत कमळ राहतें त्याप्रमाणें.

मी म्हटलें–' हें सारें थोतांड वाटतें. सुखदु:खानें जो हेलावत नाहीं त्याच्या मेन्दूत विकृति असली पाहिजे.'

अण्णा हंसून म्हणाले, ' विकृति आहे ती फ्राईडमध्ये. अहंकार आणि वैषयिक प्रवृत्ति म्हणजेच माणूस असा गैरसमज झाला आहे त्याचा. फ्राईडच्या तत्त्वज्ञानानें सत्यांशाचें दर्शन होईल पण संपूर्ण सत्याचें नाहीं.

मी म्हणालों,–सर्वांचें म्हणणें सत्यांश आहे तर सत्य म्हणजे काय ?

अण्णा गंभीर होत्साते म्हणाले–' हें पहा, संपूर्ण सत्याचा विचार असा उभाउभी होणार नाहीं. तथापि आगम सत्य, व्यावहारिक सत्य, प्रायोगिक सत्य, काल्पनिक सत्य, गृहीत सत्य इत्यादि प्रकारें सत्याचें दर्शन आपण घेऊं शकतों. संपूर्ण सत्य पाहण्यासाठीं आपल्या ठिकाणीं पूर्णत्व आणणें आवश्यक आहे. केवळ शब्दाच्या आधारें सत्याचा शोध करणें म्हणजे कागदाच्या होडींतून समुद्र तरून जाण्यासारखें आहे.'

' मग संपूर्ण सत्याच्या अभावीं आम्हांला नेहमीं अंध:कारांतच चांच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८५५९ दि:

पडावें लागेल का ? ' असतो मा सद्गमय ' हें कसें साध्य होईल ? ' —मी विचारलें.

' सूर्य नसला म्हणजे तुम्ही दिवटीवर, दिव्यावर, मेणवत्तीवर काम भागवतांच ना ! त्याचप्रमाणें तुम्हांस तुमच्या अध्ययनानें, चिंतनानें आणि अनुभवानें तुमचा मार्ग निश्चित करावा लागेल. जीवनावश्यक सत्यें तुमची तुम्हांसच पडताळून पहावीं लागतील. केवळ श्रद्धा आणि भावना, तर्क आणि कालाक्षरी बुद्धि, आगमप्रामाण्य किंवा गुरुवचनप्रामाण्य यांचेमुळें तुम्हांला सत्यदर्शन होणार नाहीं. त्याच्या प्रकाशाचा, ज्ञानाचा, अनुभवाचा तुम्हाला लाभ मिळेल. दिशा कळेल; पण सत्याचें दर्शन ही तुमच्याच अनुभवाची गोष्ट झाली पाहिजे. इतरांनी सांगितलेल्या सत्यावर विसंबून चालणार नाहीं. एखाद्याची बुद्धि अधिक प्रगत असते व त्याच्या विषय मांडण्याच्या पद्धतींत आकर्षक तर्कवाद असतो. कदाचित् तो खोडतां येणार नाही तुम्हांला. म्हणून त्यांनीं काढलेले निष्कर्ष स्वतः अंतिम प्रमाण न मानतां तुम्ही त्याचा उपयोग धोक्याची जागा दर्शविणाऱ्या दीपस्तंभाप्रमाणें करूं शकाल.

असें करतांना हें मात्र विसरूं नका की तुम्ही अध्ययनाने, चिंतनानें हुडकून काढलेलीं सत्येंच तेवढीं खरीं आहेत व बाकीचीं खोटीं आहेत.

हाच तर जैनतत्वज्ञांनी सांगितलेला स्याद्वाद आहे. तिथें अभिनिवेष अभिमान नाहीं. विरोधांतहि साम्य आणि साम्यांतहि विरोध पाहण्याइतकी विचक्षणा आणि क्षमता हवी.'

* * *

# जितं मया

अशाच एका प्रसंगाची स्मृति अद्यापि रेंगाळते आहे माझ्या मनः-पटलावर-संपूर्णपणें ठसठशींत ती स्मृति नाहीं. पण जशी आठवते तशी मी सांगणार आहे.

रविवारचा तो सुट्टीचा दिवस असावा. सुट्टीमध्ये आनंद वाटावा ही मानवी मनाची प्रवृत्ति मानली तर जैन कल्पनेला ती फारच पोषक होणार होती. कारण, जैन कल्पना काय किंवा श्रमण संस्कृतीचा मूलाधार काय, त्यांच्या मुळाशी मुक्ति व मुक्तीचा आनंद हाच आहे. कामांत जसा आनंद आहे तसा सुट्टींत, मुक्ततेंत आहे. त्या कल्पनेचे मानसशास्त्रीय विश्लेषण करण्याचें हें स्थळ नाहीं. उषेच्या कोमल प्रकाशानें सारें वितान धवलित होत असतां मी त्या दृश्याशीं एकरूप झालों होतो. इतक्यांत समोरच दोघांचें

भांडण जुंपलें. मंगलवेळीं अमंगल शब्दांचें ध्वनि अधिकच कटुपणे कानावर आदळूं लागले. सुषमेचे मोहकत्व लोपलें. उषादेवीचे आरक्त कपोलहि विरलें. मानवी भांडण कांही क्षुद्र हेव्यादाव्यासाठीं सुरूं झालें.

भांडणाला इतिहास असला तरी प्रेक्षक त्याची चिकित्सा का करायला बसला आहे ? भांडणाचें स्वरूप सूर्यासारखेंच प्रखर होऊं लागले. अनेक लोक, अनेक आवाज ! वाक्यावरून सूत्र कळेल तर शपथ? जाणारे-येणारे जात येत होते. दृश्य नेहमीचें म्हणून कांहीं वाईट गोष्टीना समाज हळूंहळू मान्यता देतो. समाज म्हणजे कोण हा प्रश्न इथे विचारतां कामा नये. भांडणाऱ्यांना सार्वजनिक रस्ता, संस्था, देश आणि जग अपुरे आहे. असा माझा समज आहे. तो समोर चाललेल्या भांडणावरून अधिक बळकट होऊं घातला.

अनेकांकडून चौकशी केली. पण मूळ गवसत नव्हतें. तेव्हां सहज कल्पना सुचली ऋषीचे कूळ आणि भांडणाचें मूळ शोधूं नये. पण मन ? तें ऐकत नाहीं. जिज्ञासूपणा हा त्याचा एक गुण ! त्या जिज्ञासेला हेतु नाहीं. अगदी कलेसारखा. कलेसाठी कला म्हणणाऱ्या विद्वानासारखें मलाहि वाटलें की आपल्या मनाचा हा ‘ जिज्ञासेसाठीं जिज्ञासा, ‘ अशा स्वरूपाचा तर गुण नाहीं ना ! भांडणाचें मूळ कांहीं केल्या गवसेना. तुटलेल्या पतंगाचा धागा ज्याप्रमाणें लवकर गवसत नाहीं तसा !

कांहीं वेळानें तो धागा माझ्या हातीं लागला. भांडणाचे मुद्दे फार नव्हते. तत्त्व व तात्त्विक स्वरूप देण्याइतपत त्या भांडणारांची बौद्धिक पात्रता वाढली नव्हती. अन्यथा त्या भांडणाची मुळें खोलपर्यंत ‘ मानवतेसाठीं ’ इथपर्यंत गेली असती. तें आर्थिक भांडणहि नव्हतें किंवा भांडणांतहि आर्थिकतेचें तत्त्व गोवलें गेलें नव्हतें. अद्यापि कम्युनिस्टांचा व त्यांचा परिचय घडला नसावा.

सूत्र असें होतें कीं कोणाच्या पतंगाला कुणी काट द्यावा. एका सभ्य घराण्यांतील मुलाच्या पतंगानें एका दलित म्हणविणाऱ्याचा ( पण इतरांना दलित करणाऱ्या ) एका मुलाच्या पतंगाला काट दिला होता. त्याचा पतंग हवेंत भटकत होता. नंतर त्या पतंगाच्या चिंधड्याहि झाल्या.

दलित वर्गातील अनेक मुलें व हा एकटा ! दलितवर्गातील शिवीगाळीनें तो कचरला होता. तसल्या शिव्या त्यानें ऐकल्या नव्हत्या. मुलांना तो कांहीं तात्त्विक सांगत होता; पण ऐकून न घेणाऱ्या व शिवीगाळ करण्याच्या मनःस्थितींतील त्या मुलांनीं त्याची बंभेरी उडविली. कांहीं सभ्य लोकांनीं त्या एकाकी संस्कृतीच्या मुलांस घरीं जाण्यास सांगितलें. दलित मुलें विजयी आवाजानें जिकण्याचा आनंद त्यांना प्रदर्शित केला.

इतिहासकार तेथें असतां तर त्यानें लिहिलें असतें, ' सभ्य संस्कृतीचा विनाश अ-सभ्यसंस्कृतीनें होतो ' रानटी लोकांनीं ग्रीक, रोमन, बाबिलोनिअन इत्यादि संस्कृति नाहीं कां नष्ट केल्या ? यावरून डार्विन सिद्धांत असा-जगण्यास योग्य तोच जगतो. ( **Survivel of the fittest** ) इत्यादि.

पण माझें मन एका गोष्टीशीं एकरूप होत होतें. ती म्हणजे हा ' जितं मया 'चा प्रश्न ? कोणी कोणास जिकलें आणि नेहमीं कोण जिकतो यासंबंधीं इतिहासांत दुमत नाहीं. दुष्टत्व जिकतें, असत्य जिकतें. या भूमीवरील इतिहासाचा हा ध्या दाखला. त्यावेळीं एक दृष्टांत आठवला आहे, तो असा--

कन्नड देशांत एक अतिविद्वान वादपटु येणार होता. वादांत त्यानें देशोंदेशींचे विद्वान परास्त केलें. कर्नाटक देशाचें ' अजिक्य पत्र ' हि त्याला हवें होतें, राजाला काळजी पडली. त्यानें मंत्र्यांना बोलावलें. मंत्री घाबरले. तेव्हां एका हुशार माणसानें म्हटलें, ' तें माझ्यावर सोंपवा, मी बघून घेतो.' राजा म्हणाला, ' म्हणजे काय ? ' तो म्हणाला, ' तें सोपें आहे. त्यानें विद्वानांना हरविलें आहे, पण मूर्ख माणसांशीं त्याची कधीं गांठ पडली आहे कां ? '

राजा म्हणाला, ' वेडा आहेस कीं काय ? त्याचा आणि मूर्ख माणसाचा काय संबंध ? '

तो म्हणाला, ' पंडितांना जिकणें हें महत्त्वाचें नाहीं. मूर्खांना

जिकतां येणें हें अत्यन्त कठीण आहे. तेव्हां आपल्या देशांतील अडाणी असंस्कृत आणि खाष्ट माणसांच्या तोफेच्या तोंडीं तो पंडित दिला की तो पळ काढील.'

राजाला जरी त्यांचें म्हणणें पटलें नाहीं तरी पण प्रयोग म्हणून सम्मति देण्यांत आली.

वादविवादाच्या वेळीं तो एकटा संस्कृतज्ञ माणूस आणि शंभर महामूर्ख व असभ्य माणसें पंडिताच्या पोषाखांत उपस्थित होतीं. राजा कांहीं निमित्त काढून परगांवीं गेला होता.

वादविवादास सुरवात झाली. पंडितानें अस्खलित संस्कृतवाणीनीं प्रश्न विचारला. तिथें संस्कृत कोणाला कळणार ?

एका गुंडानें शिवीं हासडत म्हटलें,—'तुझं संक्रयांत फिक्रयाट बोल्लू नगस. कानडींत बोल आमच्या संग.'

त्या पंडिताला कानडी येत नव्हते. त्यानें सांगितले, 'मला तुमची भाषा कळत नाहीं.'

झालें. एकच काहूर माजलें. 'तुला कांहीं समजत नाहीं. साधी आमची भाषा ही समजत नव्हती तर आलास कशाला मरायला इथं !'

असें म्हणून सारे हसूं लागले. कुणी त्या पंडिताची पगडी उडविली, कुणी त्याचे उपरणें ओढलें, तो घाबरून गेला. वादविवादांत असें करणें शास्त्रशुद्ध नाहीं असें तो सांगू लागला. पण त्याचे कोण ऐकणार ?

एकानें तर त्यानें गोळा करून आणलेली सारी विजयपत्रें, ताम्रपटें देखील हिसकावून घेतलीं. पंडिताला पळताभुई थोडी झाली. त्यानें हरल्याची कबुली दिल्यावर त्या पंडिताला जाऊं दिले.

अडाणी लोकांच्या तोंडीं जयजयकार होता. वादांत त्यांनीं एका महापंडिताला हरविलें होतें. 'जितं मया' चा आनंद सर्वत्र प्रदर्शित केला जात होता.

याच 'जितं मया' चें मानसिक पृथक्करण माझें मन करीत होतें. या पंडिताचें चुकलें होतें कीं या अडाण्याचें ? कीं दोघांचें ?

अनेक दिवसांनीं असा निष्कर्ष मी काढला कीं जोपर्यंत ' जिकला कोण आणि हरला कोण ' हीच कसोटी असेल तर अडाणी लोक, आडमुठे लोक नेहमींच जिकतील आणि लोकशाहीच्या महान तत्त्वाप्रमाणें त्याला मान्यता द्यावी लागेल. जिकेल तो राज्य करील. जिकेल तो शहाणा ठरेल, अशीं तत्त्वें अद्यापि रानटी युगाचीं लक्षणें आहेत असें म्हटलें तर कांहींचा रोष मजवर ओढवेल यांत शंका नाहीं,

आणि मानवी क्रोधादि विकार ' जितं मया ' च्या आनंदाचें मानकरीच नाहींत कां ?

* * *

१२

# स्वातंत्र्याची प्रतिष्ठा

आज श्री. अण्णाच आमच्याकडे अचानक आले होते अगदीं सकाळीं. हवेंत गारठा होता. अण्णांनीं कानटोपी घातली होती. मी म्हटलें-' अण्णा, हें काय हो घातलेत ? थोडेसें हंसत ते म्हणाले--' याला कानटोपी म्हणतात. थंडहवेपासून संरक्षण होते यापासून. दिसायला थोडेसें ' तुम्हाला ' विचित्र दिसते पण आमच्या सारख्या उतारवयाच्या लोकांना आवश्यक आहे.'

आम्हाला मोठी मौज वाटली होती. पण अण्णाचें तसें नाहीं. फॅशन म्हणून हितावह व चांगल्या गोष्टी टाळणें त्यांना आवडत नाहीं.

अण्णा म्हणाले--' इथेंच नेमके पायाखालीं जळतें. आपण इतरांचें

स्वातंत्र्य कबूल करतों. सहअस्तित्व कबूल करतों पण ' दुसऱ्यांस हंसण्याचे' मात्र सोडत नाहीं. जें मला सम्मत आहे तें इतरांनाहि सम्मत असावेंच असा आपला आग्रह असतो. माझ्या मतें हा आग्रह हिंसक आहे. इथें दुसऱ्याच्या स्वातंत्र्याला बाध येतो.

इंग्रजांनीं इंग्रजीचे घोडे पुढें दामटावें. कां ? तर संस्कृतमध्यें ' जान ' नाहीं. इंग्रजांना संस्कृतमध्यें ' जान ' कशी सांपडेल ? त्यांनीं सर्व भाषांची गळचेपी केली हाच मी दुराग्रह म्हणतो. ज्ञानेश्वराला मराठींत कांहीं अडचण आली नाहीं. इंग्रजी शिवायहि त्याचें भागलें. पण आजच्या स्वतंत्र झालेल्या लोकांना मात्र ' इंग्रजी ' शिवाय भागत नाहीं. कारण नोकऱ्या मिळत नाहींत. हें कारण तर मानसिक गुलामगिरीचें निदर्शक आहे. हीच गत आमच्या राज्यतंत्राचीं झाली आहे. आमच्या परंपरेंत आम्हाला अभिमान वाटत नाहीं. किंबहुना पारतंत्र्यांतील अनेक रोगांचे माहेरघर असलेल्या रूढी आम्ही स्वतंत्र झाल्यावरहि गौरवितों.

मी म्हटलें—' आग्रह म्हणजे हिंसा कशी ? '

' आग्रह म्हणजे जिथे अविचारी सक्ति असेल तोच आग्रह हिंसक असतो. पूर्वी ऋषि—मुनि देखील चांगल्या गोष्टीचें केवळ मार्गदर्शन करीत. आग्रह करीत नसत. अनुग्रह करीत. अनुग्रहानें काम साधण्याची कला त्यांच्या जवळ होती.

' सक्तीची पाळीच कां येते ? '—मी.

' जेव्हां एखाद्या व्यक्तीला ती गोष्ट स्वतःला सोडून इतरांनी आचरावी असें वाटते तिथे आग्रह संभवतो. भक्ति संभवते. कायदे करणारा कायदा पाळत नाहीं. सरकार व्यापार करते, पण इतर व्यापाऱ्यावर असलेलीं बंधनें स्वतः पाळीत नाहीं. कायद्याचें जाळें विणीत असणारे सरकार इतरांना त्यांत अडकवितें. स्वतः मात्र वेगळें. स्वतः कायद्याचे पालन करणारे सरकार असलें तरच लोक कायदे मानतील. स्वतः न करतां इतरांना करावयास लावणें हें पाप आहे. जें स्वभावतः चांगलें तें सर्वांसाठीं चांगले असतें. सरकारी माणसें चोऱ्या करतील तर त्याची चौकशी होऊं न देणें पण लोकांनीं चोरीं केली तर कोर्टांपुढें खेचणें हा न्याय असला तरच

सक्तीची पाळी येते. सरकार व जनता यांच्यामध्यें परस्परावर सूड उगविण्याची भावना हीहि सक्तीच्या मुळाशी असतें. भांडवलशाहीच्या जाचांतून जे जीवन जगले. असे लोक त्यांना जाचक ठरतील. किंबहुना मारक ठरतील असे कायदे पास करून घेतात; परंतु ते हे विसरतात कीं राज्य करणें म्हणजे सूड उगविणे नव्हे. सर्व प्रजेवर सारखे राज्य करण्याचा सिद्धांत कठीण असला तरी आवश्यक आहे. डॉक्टर ज्याप्रमाणें दवाखान्यांत उपचार करतांना जात लक्षांत घेत नाहीं, त्याप्रमाणें राज्य–कर्त्यांनी राज्य करतांना जात किंवा पक्ष लक्षांत घेऊं नये.

एखाद्या पक्षानें राज्य करणें याचा अर्थ दुसऱ्या पक्षाच्या लोकांची नालस्ती करणें, त्यांच्या उखाळ्या–पाखाळ्या वर्तमानपत्रांतून जाहीर करणें असा मुळींच नाहीं. पण अशी वृत्ति असणारे राज्यकर्ते देशांत अशां–तता तर निर्माण करतातच. परंतु मुख्यतः ते दुसऱ्यांच्या 'स्वातंत्र्यास' बाध आणतात. स्वतःचें स्वातंत्र्य सुप्रतिष्ठित व्हावें असें वाटत असेंल तर इतरांच्या स्वातंत्र्याची बूज राखतां आली पाहिजे. या बाबतींत महर्षि लिंकन याचें उदाहरण पुढें ठेवण्यासारखें आहे–'गुलामगरी जर पाप नाहीं तर जगांत पाप वस्तुच असूं शकत नाहीं' असे तो म्हणत असे.

'ज्यानें देशाला संकटांत टाकल्यासारखें होईल, कम्युनिस्ट शेफार–तील त्यांना देशाचे शत्रूच मानलें पाहिजे.'–मी.

'तसें अगोदर घटनेंत म्हणा. एकीकडे स्वातंत्र्याची घोषणा कराव–याची व मत प्रतिपादनाला बंदी करायची हा न्याय बसत नाहीं. तुमची राज्यपद्धति अगदीं निर्दोष आहे असे तुम्हांस तरी वाटतें कां? कम्युनि–स्टांना वाईट म्हटलें तरीं ते याच देशाचे नागरिक आहेत. त्यांच्याहि स्वातंत्र्यरक्षणाची जबाबदारी राज्यकर्त्यांवर आहे. सर्वांचेच जीवन सुरक्षित राहावें असें धोरण कां असूं नये? कम्युनिस्टांनीं कॉंग्रेस पुढाऱ्यांचे खून करावेत व कॉंग्रेसवाल्यांनीं त्यांचे करावेत यांत मूर्खतेशिवाय कांहींच नाही, देशप्रेम तर मुळींच नाहीं, जो देशावर प्रेम करीत नाहीं, तो पक्षावर काय प्रेम करील? पक्षापेक्षां देश श्रेष्ट आहे.

देशापेक्षां आम्ही संस्कृति श्रेष्ट मानली तेव्हां आम्हांला दोन–तीन

हजार वर्षं पारतंत्र्यांत राहण्याची पाळी आली. आजहि तीच चूक होऊं नये, आपला देश महत्त्वाचा आहे. त्याच्यावर प्रेम करून प्रत्येकाच्या स्वातंत्र्याची बुज राहील असा राज्यव्यवहार राहणें हेंच उत्कृष्ट राज्याचें गमक होय.

लक्षावधि पोती साखर पडून असणें, धान्य सडून जाणें, लोकांनीं उपासमारीनें दिवस काढणे, राज्यकर्त्यांनीं ऐषारामांत राहून केवळ पक्षीय राजकारणांत मशगूल असणें ही सारीं राज्यनाशाची वाटचाल आहे.

डोळेझांक करून हें चालणार नाहीं. कम्युनिस्ट राज्यपद्धति काय किंवा समाजवादी राज्यपद्धति काय, यांत मानव हा मुख्य घटक आहे. मानवाच्या सुखासाठीं राज्यपद्धति आहे. हट्टानें वा दुराग्रहानें संकटाप्रत नेणाऱ्या गोष्टी अम्मलांत आणणें म्हणजे मानवसंहाराला प्रवृत्त होण्यासारखेंच आहे. '

' याचा अर्थ पक्षनिष्ठा नको काय ? ' मी विचारलें,

' पक्षनिष्ठा असावी पण दुराग्रह नसावा. निष्ठेंत विवेक असतो. पक्षनिष्ठेला मर्यादा आहे. देशनिष्ठा व्यापक आहे. पक्षाचें धोरण चुकत असलें तर त्यापासून वेगळें राहून आपलें ' स्वत्व ' टिकविलें पाहिजे. त्याला फार मोठें मानसिक धैर्य लागतें. ज्यांनीं तें दाखविलें त्यांना सवग लोकप्रियता गमवावी लागली. गरीब-भणंग व्हावें लागलें. पण सत्य बोलण्याचा आनंद त्यांनीं अभंग ठेवला. सतीत्व नसणाऱ्या स्त्रीची जी बूज राखली जाईल तीच सत्यनिष्ठा न दाखविणाऱ्या पक्षनिष्ठ सेवकाला अनुभवावी लागेल.

मानवाची प्रतिष्ठा-म्हणजेच स्वातंत्र्याची प्रतिष्ठा होय. माणसाचें खून करून, माणुसकीचा मुडदा पाडून स्वातंत्र्याची सुप्रतिष्ठा होणार नाहीं. माणसाला माणुसकीनें वागणेंहि जर अशक्य होत असेल तर तें स्वातंत्र्यच नव्हे. अरेरावी करणारा अधिकारीवर्ग मानवाच्या सुप्रतिष्ठेला कलंकित करतो. अशा अरेरावीखोर अधिकाऱ्यांना शासन होणें आवश्यक असतें. अन्यथा पुण्यांत जसा घाशीराम निर्माण झाला होता तसा सर्व ठिकाणीं घाशीराम तयार होतो. ज्यांना नम्रतेनें वागतां येत नाहीं, असा न्याय-

खात्यांतील, शिक्षणखात्यांतील किंवा इतरत्रहि अधिकारी वर्ग असतो. अशांना अधिकारी म्हणणें म्हणणें 'अधिकारी' शब्दाची केवळ कुचेष्टा आहे. शिक्षणानें अशा अधिकाऱ्यांच्या मनःपिंडांत बदल घडत नाहीं. असे अधिकारी काढूनच टाकले पाहिजेत. मानवाला मानानें, प्रामाणिकपणे व स्वत्व टिकवुन जगतां आले पाहिजे तरच स्वातंत्र्याची सुप्रभात निर्माण झाली असें म्हणता येईल.

'मनुष्याला कसेंहि वागूं द्या, असे तुम्हांला सूचित करायचें आहे कां?' मी विचारले.

'मी आतांपर्यंत जे सांगितलें, त्याचा मतितार्थ तुम्हांला कळलाच नाहीं असें दिसतें. माणूस अन्यायानें वागला तर दण्डाची व्यवस्था तुम्ही केलीच आहे; पण सरकारी माणसें व सरकार नीट नाहीं वागले तर त्याची काय वाट? प्रथम हे पहा राज्यकर्त्यांनीं आदर्श निर्माण करावा. दारू पिणारे दारूबंदी यशस्वी करतील हें 'वदतो व्याघाता'चेंच उदाहरण आहे. स्वतःला स्वातंत्र्याची चाड असणारा इतरांच्या स्वातंत्र्याची पायमल्ली करणार नाहीं. म्हणूनच खऱ्या स्वातंत्र्याचे कैवारीं लोक निर्माण व्हावेंत असें मला वाटतें. धार्मिक लोकांशिवाय जसा धर्म टिकाव धरूं शकत नाहीं तसेंच स्वतंत्र प्रवृत्तीच्या लोकांशिवाय स्वातंत्र्यहि टिकत नाहीं. स्वातंत्र्य-प्रीति ही जीवनाची गुरुकिल्ली आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 35558 वि:
क्रमांक नों दि:

# अध्यात्म

जीवनाच्या प्रवाहाचें आधारभूत तत्त्व काय आहे ?--माझ्या एका मित्रानें विचारलें. हा त्याचा प्रश्न अत्यंत मूलगामी असल्यानें मी त्याला म्हटलें, 'प्रथम ज्याला आपण जीवन म्हणतों ती काय वस्तु आहे! यासंबंधीं आपली काय धारणा आहे, हें समजणें आवश्यक आहे. जन्म घेतल्यानें जगण्याची ( अर्थात मरेपर्यंत ) जबाबदारी आपल्या शिरावर येऊन पडते. जगणें आवश्यक म्हणूनच आपण जगतो असें मात्र नाही मरत नाहीं. म्हणूनहि आपण जगतों. सुरवातीला अशा वाक्यांतील तीव्रता कळत नाहीं. कांहींतरी चमत्कारिक वाक्यें म्हणून मौजेखातर आपण तीं वाक्यें वाचतों. पण मी हें मौज़ेनें म्हणत नाहीं.

आपलें जीवन हें अत्यंत मौलिक आहे. त्या जीवनाला प्रयोजन आहे. हेतू आहे, अर्थ आहे हे अनेकांना उमजत नाहीं. हें न उमगलें तरीहि चालतें. त्यामुळें अशी समजूत घट्ट होऊन बसते. ज्यांच्याकडे सुखानें जगण्याइतपत आर्थिक सुबत्ता आहे त्यांना या विचारांचा उबग येतो. ‘ नको हो तुमचें तत्त्वज्ञान ! ‘ असे म्हणून ते तुमची–आमची तोंडें बंद करूं शकतात. संपत्तीच्या उन्मादानें जीविताचें प्रयोजन कळत नाहीं. संपत्तीमुळें विवेकशक्तीचा ऱ्हास होतो. ती सांठवल्यामुळें तर तो प्राणी जिवंत कीं मेलेला हेंहि कळत नाहीं. प्रयोजनाच्या दोरीला संपत्तीचा मांजा लागला कीं जीविताचा पतंग वाऱ्यावर भरकटूं लागतो, आणि म्हणूनच की काय राजवैभव भोगणारे तीर्थंकर जो पर्यंत तें वैभव उपभोगतात तोपर्यंत उपदेशाच्या भानगडींत पडत नाहींत. जीवित प्रयोजनाचा हेतु निःसंग होऊन, हाल अपेष्टा सोसूनच तें हुडकून काढतात. तें प्रयोजनभूत-तत्त्व स्वतःमध्यें अगोदर बिंबवून घेतात. याचा अर्थ असा कीं निःसंग, निरासक्त होऊनच जीविताच्या प्रयोजनाचा साक्षात्कार होऊ शकतो. उपवास केल्यानंतरच उपवासाची कल्पना येते. त्याप्रमाणेच संपत्ति, वैभव यांच्या त्यागाशिवाय जीविताच्या प्रयोजनाचीं कल्पना येत नाहीं. म. गांधींना भारताच्या आत्म्याची ओळख तेव्हांच पटली जेव्हां त्यांनीं ‘फकीर’ व्हायचें ठरविलें. आज जे राजकीय अनैतिक जीवन पहावयास मिळतें याचें कारण ‘ प्रयोजन ’ कळत नाहीं. हेतु कळत नाहीं. भारताचें जीवन समृद्ध बनविणारा माणूस ‘ फकीर ‘ पाहिजे. मुलांचं पोषण जसं आई आपल्या रक्तानं करते तसं.

माझ्या विधानाला विरोध फार आहे. हें मला कळत कां नाहीं ? लोक अमेरिकेचं उदाहरण देतील. पण अमेरिकेंत पैसा वाढला एवढंच आपण पाहतों. पण पैसेवाले गोळ्या खाल्याशिवाय झोंपत नाहींत हें कोणास ठाऊक आहे ? संपत्तीनें जर आमची झोंप उडणार असेल आमच्यांतील विवेक लोपणार असेल तर ती संपत्ति आम्ही स्वीकारणार आहोंत कां ? संपत्ति जीवनाचें साधन आहे, ध्येय नव्हे. हेतु नव्हे. जीवनाचें प्रयोजन कांहीं वेगळेंच आहे. देशाची संपन्नता देशांतील संपत्तीनें मोजणें चुकीचे

आहे. देशाची संपन्नता तेथील लोकांना मिळणारें सुख, मिळणारा आनंद, मिळणारें स्वातंत्र्य यावर अवलंबून असली पाहिजे. यांत्रिक जीवनाला कांहीं एक मर्यादा आहे. ती मर्यादा ओलांडली कीं मानवजातीचे अस्तित्व देखील धोक्यांत येतें. म्हणूनच मी आपच्या जीवनाच्या प्रयोजनभूत तत्त्वाचें विवेचन करण्याचें ठरविलें आहे.

जीवनाचा विचार करण्याचें सामर्थ्य देशांतील बहुसंख्य लोकांना प्राप्त होईल अशी कांहीं व्यवस्था देशांत होते आवश्यक आहे. जेथील लोक असा विचार करतील तो देश अधिक प्रगत होत जाईल. भौतिक जीवनाचा मी धिक्कार करीत नाहीं; परंतु त्या जीवनाचा आंधळेपणानें स्वीकार करणें आत्मघातकी प्रवृत्तीचें आहे. हें मला म्हणावयाचें आहे. जीवनाचें प्रयोजन काय हाच आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे.

मानवी जीवन अत्यंत प्रभावशाली व वैभवसंपन्न असून तें जीवन विकसित झालें तर याच पृथ्वीवर एक प्रकारचें दिव्य जीवन जगणारा समाज निर्माण करतां येणें शक्य आहे. जीवनाचें प्रयोजन आहे आत्म-तत्त्वाची ओळख. प्रत्येक जिवंत प्राण्याच्या अन्तर्यामी जे तत्त्व अविच्छिन्न-पणें अधिष्ठित आहे, तें तत्त्व म्हणजे आत्मतत्त्व. हें आत्मतत्त्व ज्ञानमय असून अनंत सुखाचा, अनंत दिव्य तेजाचा, शक्तीचा निवास त्यांत आहे. याचा प्रत्यय सुरवातीला येत नाहीं. सुरवातीला कांहींना हें आत्मतत्त्व दिसत नाहीं. शरीर हेंच त्याचा जिवंत किंवा मृत माणूस मोजण्याचे मापा आहे. शरीराच्या आश्रयानें आत्मतत्त्व हुडकणें किंवा त्या शरीरालाच आत्मा समजणें हें अयोग्य आहे. अविवेकाचे आहे. म्हणजेच शरीराच्या आंतील आत्मतत्त्वाला ओळखणे हेंच प्राथमिक कर्तव्य आहे. हें न कळालें तर जीवनासंबंधींच्या गैर कल्पना बद्धमूल होतात. आज जो स्वार्थ जीव-नांत बोकाळला आहे, अनीति घुसली आहे, पराधीनता शिरली आहे याचें कारण जीवनासंबंधीची गैरकल्पना.

आपल्या जीवनावर परिणाम करणारी शक्ति म्हणजे ‘ कल्पना ! ’ कल्पनेसाठींच आपण प्राण द्यायला तयार असतो. ‘ मी भारतीय आहे ’ या कल्पनेसाठीं आम्ही राज्यें निर्माण करतों. ती कल्पना टिकविण्यासाठीं

आम्ही वाटेल तें दिव्य करायला तयार असतो. तसेंच ' मी म्हणजे शरीर ......माझें शरीर, म्हणजेच माझें जीवन 'या कल्पनेच्या पोटीं किती स्वार्थ शिरला आहे जीवनांत ! भावाला भाऊ म्हणायला तयार नाहीं, मित्राला मित्र म्हणायला तयार नाहीं. मानवजातीला कलंक लागेल असे अनेक व्यवहार आम्ही याचसाठीं करीत आहोंत. शरीर आणि पैसा ! व त्या-साठीं साऱ्या मांगल्यपूर्ण कल्पनांचें हवन ! खोटीं औषधें, खोटे व्यवहार, खोटे कागद, खोटे पुरावे...सारें खोटे ! यांतून उद्भवणारी विकृति कुणा-लाच दिसत नाहीं. दिसली तरी खोट्या जीवनाला जिवंत ठेवण्यासाठीं तिकडे नाकाडोळा करावा लागतो.

सारे याच उद्योगाला लागले आहेत. पैसा आणि माझें शारीरिक सुख ! मग एक काळ असा येतो कीं अमाप पैसा मिळायला लागतो. सुखाची विपुल साधनेहि एकत्र होतात. पण हृदयाचें समाधान गमावून, शांति गमावून तें मिळणारे असतें. लहान मूल खेळतांना जसें खेळण्याशी एकरूप होतें. कुणी खेळणें घेतलें कीं अकांडतांडव करतें, तशी आपली स्थिति झाली आहे. सुखाचें मूलभुत अधिष्ठान वस्तु नाही तर आपण स्वतःच सुखाचे महन्मंगल अधिष्ठान आहोंत हेंच न कळाल्यामुळें एखाद्या तृषार्त हरिणासारखे आपण मृगजळाच्या मागें धांवत आहोंत. दोघांतील अंतर कां कधीं कमी होणार आहे ?

हें भटकणें सोडायचे तर त्यासाठीं कांहीं विचार केला पाहिजेच आणि तो विचार म्हणजेच आत्म्यासंबंधीचा विचार. शरिराचा विचार करणारे अनेक आहेत. पण आत्म्यासंबंधीचा विचार करणारे कमी. त्यामुळें दुःखपरंपरा फार आनंद कमी. एका अमेरिकन कवीची कविता मी वाचत होतो. त्यानें पापाचे दोन प्रकारें वर्णन केले आहे. पहिलें पाप म्हणजे आपण वाईट आचरण करतों तें. पहिल्या संबंधींचा विचार अनेकांनी केला आहे. पण जें चांगले आहे तें करावयाचे टाळणें हें देखील एक पाप आहे. जबाबदारीची टाळाटाळ, जीविताच्या प्रयोजनाला हुडकून काढतांना होणारा आळस हें देखील एक फार मोठें पाप आहे. जीवन उजळणाऱ्या कांहीं मंगल गोष्टींत

आपण मुद्दामच जवळपास फिरकूं देत नाहीं. आम्हांला दगडाचा देव नको. कां तर तो कांहीं करीत नाहीं. हें खरें मानलें तर दुसरा देव अगोदर पहा, मग पहिल्याला रजा द्या. हवें तें करण्याचें टाळणें हेंच पाप मी अधिक मानतो. अरविंद महर्षींनी आणखी एक पापप्रवृत्तीचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात--

'स्वार्थमूलक प्रवृत्तींची जोपासना (उपासना अधिक लागू पडेल) करणें म्हणजे समाजाच्या नाशाचा मृत्युलेख लिहिणे होय. मोठमोठ्या संस्कृति समूळ नष्ट कां पावल्या याचे विवेचन करतांना हें महत्त्वाचें कारण ते नमूद करतात. म्हणूनच मला असें वाटतें कीं राज्याचा सारा रोख मानवांतील स्वार्थमूलक प्रवृत्तींना आळा घालणें हा असावा. परंतु हें करतांना मानवांतील शुभप्रवृत्तींना आव्हान केलें गेलें पाहिजे. कोणत्याही गोष्टींचा केवळ कायदा करून उपयोगी नाहीं.

आतां प्रयोजन भूत-तत्त्व आहे 'आत्मा' हें एकदां कळल्यावर! हा आत्मा म्हणजे काय हें जाणून घेतलें पाहिजे. तें जाणून घेतांना असा विचार करूं या--

आपल्या जीवनांत आपण जीं विकृति आणली याचे कारण म्हणजे भय. भीतीमुळें आपल्या जीवनांत गढूळपणा निर्माण झाला. भीतीमुळें संचयाची प्रवृत्ति वाढली. भीतिमुळेंच हिंसात्मक भावना निर्माण झाली. ही भीति स्वतःच्या जीवना संबंधीं असते. मरणाची भीति प्रथम निर्माण होतें. ही मरणाची भीति आत्म्याच्या अमरत्वाला खो देणारी आहे. म्हणून आत्मा हा अमर आहे. शेकडों जीवन घालवूनहि त्याच्या अमरतेला बाध येणार नाहीं. आजच्या जीवनाच्या अंतामुळें जीवन संपते असें नाहीं. आपण स्वतः हीं जीवनें निर्माण केलीं. जगली व सोडून दिलीं आहेत, असा विश्वास झाला पाहिजे. आत्म्याच्या अविनाशीपणाबद्दल बालपणापासूनच संस्कार केले गेले पाहिजेत. एकदां यावर श्रद्धा दृढ झाली की जीवनांतील विविध गूढ (Complexes) कमी होतात. भयगंड (Fear complex) हा सर्वांत प्राथमिक गंड आहे. यांतूनच भीति, हिंसा, संचय प्रवृत्ति, असत्

प्रवृत्ति निर्माण होतात. म्हणून निर्भय होऊन जगायला शिकण्याचा उपाय आहे. आत्म्याच्या अमरत्वाबद्दल निःशंक असणें हेंच माझ्यामतें पहिल्यांदा रुजलें पाहिजे. आत्मा निर्भयत्वानें श्रीमंत होतो व संपत्तीनें दुबळा होतो ! संपत्ति नसेल तर जगतां येणार नाहीं असा न्यूनगंड निर्माण झाला की मानवाचे दैन्य सुरू झालें. जगाची सुधारणा, धर्म, मोठेपणा इत्यादि सारे पैशामुळें त्याला सुंदर दिसतात. मोटारींत बसल्यावरच त्याला निसर्गाचे सौन्दर्य कळते. बगल्यांत राहूं लागला म्हणजे माणसांत आल्यागत त्यास वाटतें. सेवा, परोपकार, फकिरीवृत्ति त्याला त्याज्य वाटूं लागतात. कोणी दिगंबर वृत्तीनें हिंडू लागला की मूठभर कपडे घालणाऱ्यांना मोठें किळसवाणें वाटतें, परंतु मासिकांतून, चित्रपटांतून लैंगिक प्रवृत्तींना उफाळून टाकणाऱ्या अर्धनग्न किंवा नग्न चित्रांना कलेच्या नांवाखाली खुशाल प्रसिद्धी दिली जाते.

मी जी सामाजिक विकृति म्हणतों ती हीच. एकीकडे लिंगाची सामुदायिक पूजा व दुसरीकडे कामप्रवृत्तींना आवाहन ! हे सर्व पाहतांना आम्हीं सारे कधी विचार करणार आहोंत की नाही असा प्रश्न समोर उभा राहतो. आम्हाला अमेरिकेचें किंवा रशियाचें अंधानुकरण नको आहे. तें आमच्या इथें रुजणार नाहीं. जे रुजणार आहे तेंच उत्तम, सखोल व सकस कसें रुजेल हें पाहिलें पाहिजे. आमची भूमि संतांची. आमचे विचार अध्यात्माकडे बळणारे. म्हणून या देशांतील लोकांनीं कोणताहि गोष्ट ठरवितांना तिची बैठक आध्यात्मिक आहे की नाही हें पूर्णतः तपासलें पाहिजे. ते न तपासतां कांहीं तरी करीत राहिलों तर तें आपणांस लाभदायक होणार नाहीं. उलट तापदायकच ठरेल. उदाहरण म्हणून सांगायचें म्हणजे भाषावार प्रांतरचनेचें. हें खूळ भारतीय स्वरूपाचें नव्हतें. तें अमलांत आल्याबरोबर आमच्यांत नको तें विष पसरलें. भाषाभेद, प्रांतभेद, जातिभेद यांनीं यापूर्वी इतकें भयानक स्वरूप धारण केलें नव्हतें. पण तें घडलें. यासाठीं हें निश्चित झालें पाहिजे की आमच्या भूमींत रुजणाऱ्या गोष्टी कोणत्या व आपलें जीवनसूत्र कोणतें.

आपल्या देशात चार्वाक जन्माला आला. किती साधा धर्म ! कर्ज

काढावें. मजा मारावी. चैन करावी व एके दिवशी निघून जावें. पण हा धर्म टिकला नाहीं ? खरें म्हणजे याहून सोपा धर्म कोण सांगणार ? तथापि हें कां घडलें नाहीं तर आमच्या भूमींत तें रुजूं शकलें नाहीं. कोटयावधि लोकांच्या हृदयांत ऋषिमुनींचा, साधु-संताचा वास आहे. त्यांचे आराध्य ' त्याग ' आहे. त्यागहीन भोगाकडे तें वळूंच शकत नाहींत. आणि ज्यावेळीं तसें घडण्याची वेळ आली त्यावेळीं तीं राज्यें, ते देश, ती संस्कृति कोलमडून पडली. अध्यात्म हा आमचा स्थायीभाव आहे. आम्ही आत्म्याचे उपासक आहोंत हा आरंभिक अध्यात्मवादच आमच्या जीवनाला आजपर्यंत उजाळा आणीत आला आहे; अनेक संस्कृतीना, धर्मांना व पंथांना पचवीत आला आहे, अनेक विरोधी जातिजमातींना एका सूत्रांत बांधीत आला आहे. इतिहास याला साक्षी आहे.

* * *

## व्रती

रविवारचा दिवस. सकाळची वेळ होती. एक व्रती गृहस्थ माझेकडे आले. त्यांना पाहून आम्ही त्यांचें स्वागत केलें. बऱ्याच दिवसांनीं त्यांचें आगमन झालें होतें म्हणून त्यांचेंशी बराच वेळ बोलत बसलों. बोलतांना एका विषयाबद्दल प्रामुख्यानें चर्चा झाली. त्यांचं म्हणणं असं होतं–' तुम्ही जें सन्मतींतून लिहितां तें अगदी ' नीरस व एकांगी ' असतं, येऊन जाऊन ' आत्मरति ' ' आत्मतुष्टि ' या मायाजाली शब्दांची पेरणी ! अध्यात्म सांगणें सोपें आहे; पण आम्ही गृहस्थी आहोंत. व्यापार–उदीम, उद्योगधंदे व इतर व्यवसायांत काय उपयोगी पडणार तुमचा सल्ला ? खरें पाहिलें तर तुम्ही कथा लिहित होतां तेंच बरें होतें. उगाच अवघड शब्दाशी गमतीखातर खेळत बसायचें हें मला आवडत नाहीं ' तुमचा पुरुषार्थ ' लेख तर केवळ फसवणूक आहे. नशीब, दैव हे देखील अज्ञात पुरुषार्थ म्हणून तुम्ही

संबोधता ! अर्थ व काम हे पुरुषार्थ नाहीं म्हणतां, आम्हांला हें पटत नाहीं, केवळ बुद्धिवाद हाच जीवनाचा प्राण नाहीं. मानवाचे मन म्हणजे केवळ बुद्धी नाहीं. संसारांतील आनंदाचा उपभोग सोडून केवळ आत्मरतीचा (जय) घोष तुम्ही करीत सुटता. समाजाला काय झेपेल तें तरी पहायला नको का ?

कालचाच तुमचा 'तत्त्वज्ञान' हा निबंध वाचा. माझाच लेख माझ्या अंगावर फेकून ते म्हणाले--

'यांत काय करावं, काय सोडावं. हें तुम्हीं स्पष्ट कां सांगत नाहीं. जे सांगायचं तें केवळ मोघम ! स्पष्टपणें म्हणा कीं हें तत्त्व चांगलें आहे त वाईट आहे अगदीं लक्ष्मण रेषेने आखून दिलें पाहिजे कीं अमूक करा नि अमुक करूं नका. सामान्य माणसांची दिशाभूल तुम्ही करतां. सामान्य माणसाला आदेश पाहिजे. स्पष्ट रीतीनें काय करावं, काय करू नये असं सांगितलं गेलें पाहिजे."

असे सारे सुमारें अर्धा तास चालू होतें. मी शांतपणे ऐकून घेत होतो. माझ्या लिखाणाचे पडसाद काय उमटत होते हें मलां कळत होतें. ते शांत होईपर्यंत मी कांहींच बोललों नाहीं. जेव्हां तें सद्‌गृहस्थ कांहींसे थंड झाले तेव्हां मी म्हणालों--

'तुमच्या म्हणण्यांत बरेंचसें तथ्य व सत्य आहे. माझे लिखाण एकांगी आहे. मला एखाद्या विषयाचेच सूक्ष्मतेने वर्णन करावयाचें आहे. म्हणून इतर सर्वच साधक-बाधक गोष्टींचा विचार येथें मांडलेला नसतो. याचा अर्थ इतरहि पुरक किंवा विरोधक विचार तिथे उद्‌भूत होत नाहींत असें मात्र नाहीं. एका विशिष्ट पद्धतीनें शास्त्रांतील विचार मांडण्यापलिकडे मी कांहीं केलें नाहीं. या विचारप्रदर्शनांत तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें एक गोष्ट मी टाळली आहे. ती म्हणजे लक्ष्मण रेषेची.'

'ते कां ?' त्यांनीं विचारले.

त्याचें असें आहे, मी म्हणालो, कीं ज्यांच्यापुढें मी सांगत आहे ती व्यक्ति कोण आहे हें मला माहीत नाहीं. सामान्य जन आणि विशेषजन

असे दोन भाग वाचकाचे मी करावेत हें माझ्यासारख्याला पटत नाहीं. माझा वाचकवर्ग हा आत्मरतीचा चाहता आहे, हें मी समजून चालतो. आपल्या जीवनाचा केंद्रबिंदु ‘ मी ’ न मानतां ‘ आत्मा ’ मानणारा तो आहे. त्याला हें माहीत आहे कीं, झाडाची फळें जमिनींत गाडून ठेवलीं नाहींत. फलावस्था ही वृक्षाची अखेरची स्थिति आहे. वृक्षाची निरोगी वाढ झाली तर फलोदय होणारच; त्याप्रमाणें ज्यांनीं आपल्या जीवनवृक्षाचे अंतिम फळ आत्मरति, आत्मतुष्टि, विवेक, आत्मजागृति मानलें आहे अशा सर्वांना समजेल असेंच त्यांत आहे.

दुसरें, वाचकांना मी सांगणार कोण ? हा गुरुडम मला पसंत नाहीं. दिव्या, तूं प्रकाश, अशा आज्ञेनें दिवा पेटत नाहीं, यावर माझा विश्वास आहे. माझी भूक मलाच शांत करावी लागते. त्याप्रमाणें ज्याला आत्मरतीची भूक आहे ती त्यानेच भागवावयाची आहे. भूक नसेल तर माझ्या अन्नाची त्याला परवा देखील नसेल. म्हणून मी मुद्दामच उपदेशकाची भूमिका स्वीकारूं शकत नाहीं. उपदेशकाचें कार्य फक्त तीर्थंकरच करूं जाणे; आपण तर त्यांच्या तीर्थांत राहून आपल्यासाठीं सुखमय जीवन निर्माण केलें पाहिजे. मी सांगतो म्हणून माझेंच म्हणणें खरें असें कुणीहि समजूं नये. माझ्या पद्धतीनें मी विचार मांडला आहे. त्यांतील आनंदाचा भाग तेवढा तुमचा आहे. बाकी सारें तुम्ही सोडून दिलें पाहिजे.

‘ अहो आम्हांला असतो कुठें वेळ एवढा ! कांहीं तरीं धर्माचें वाचल्यावर समाधान मिळावें हाच हेतु असतो आमचा ! ’ ते म्हणाले.

‘ छे, छे ! मग तुम्ही वाचूं नका. कांहीं तरी धर्माचें वाचून पुण्याचे फळ पदरी बांधून घेणें हें मला पटत नाहीं. घाईघाईनें असें पुण्य संचित करणें हें उचित नाही. यानें जीवनांत आनंद येत नाही. जीवनांतील प्रत्येक क्षण आनंदाचा घालविता आला पाहिजे. हा आनंद केवळ उपभोगानें मिळत नाहीं, केवळ त्यागानेंहि मिळत नाहीं. त्याग आणि उपभोग या परस्पर पूरक गोष्टी आहेत. एकांगी उपभोग जसा खोटा तसा एकांगी त्यागहि खोटा. आंधळ्यानें आंधळ्याला पाहिल्यासारखा हा खेळ आहे.

ते म्हणाले, ' हें पहा, हेंच तुमचें चुकतें. उपभोग खोटा हें खरें; पण त्याग खोटा कसा ? हें तुम्ही जें काव्यात्मक बोलतां व लिहितां ना, त्यानेंच आम्ही भांबावून जातो. '

मी म्हणालों–' मी काव्यात्मक सांगत नाहीं. त्यागाची कल्पना उपभोगाच्या कल्पनेवरच अवलंबून नाहीं कां ? उपभोग हा खोटा आहे. मी उपभोग घेतो, हें सारें जग माझ्या उपभोगासाठीं आहें. अशी कल्पनाच मुळीं खोटी आहे. आपण उपभोगाची मालकी घेऊन आलों तर असलेल्या मातींत आणखी मूठभर माती घालून कां निघून जातों ? कुठें जातों ? हे उपभोग आम्हांपासून कोण हिरावून घेतो ? कां हिरावून घेतो ? उपभोगाची सामुग्री समोर असूनहि आपणांस उपभोग कां घेतां येऊं नये ? याचा सरळ अर्थ असा नाहीं कां आपण सारेजण या जगाचा मालकीनें उपभोग घेऊं शकत नाहीं. त्या उपभोगाला शारीरिक, बौद्धिक, सामाजिक व धार्मिक बंधनें आहेत. म्हणूनच मी म्हणतों की ' मी उपभोग घेतों ' असें म्हणणें ही केवळ बडबड आहे. विवेकानें तसें म्हणतां येणार नाहीं. आपण स्वतः एक उपभोग्य पदार्थ आहोंत. आपलाहि लोक उपभोग घेत आहेत नौकरीच्या रूपानें, व्यापाऱ्याच्या रीतीनें सर्वच जण एकमेकांचा उपभोग घेतात. म्हणूनच उपभोगाची एकांगी कल्पना जशी केवळ भ्रमपूर्ण तशीच त्यागाचीहि. जे मुळांतच आपलें नाहीं त्याचा त्याग आपण काय करणार ? त्याग नाहीं केला तरी जातांना आपल्या उराशी बांधून आपण काय काय घेऊन जाणार आहोंत ? मग मरतांना घडणारा हा देखील एक त्यागच होईल. पण त्याला कुणी त्याग म्हणत नाहीं.

' कां म्हणत नाहीं ? ' त्यांनीं विचारलें.

' त्याग ही कल्पना भोगाच्या कल्पनेवर उभी आहे. म्हणूनच सर्व ग्रंथांतून त्यागावर जोर देण्यांत आला आहे. किंबहुना या त्याग–कल्पनेवरच धर्माची उभारणी झाली असल्याचें आपणांस दिसतें. खरें पाहिलें तर त्याग हा धर्माचा आधार नाहीं. धर्माची आधारभूतच नव्हे तर प्राणभूत शक्ति आहे आत्मज्ञान !'

मराठी ग्रंथ संग्रहालय ... स्थळप्रत.

'मग व्रत-वैकल्यें खोटी आहेत काय ?'

हें पहा, तुम्ही एकदम खरें-खोटें या कल्पनेंत शिरूं नका. व्रत म्हणजे काय हें समजून घ्या. व्रत याचा अर्थ आहे-त्याग. पण कशाचा त्याग ? उपभोगाच्या भोंगळ व अज्ञानमूलक प्रवृत्तीचा. अशा अज्ञान व प्रमादजन्य प्रवृत्तींतून, विचारांतून मोकळे होणाच्या मार्गाला व्रत म्हटलें आहे, व्रतनिष्ठ माणूस अगोदर आत्मनिष्ट असावा लागतो. व्रतावर जोर नसून आत्मनिष्ठेवर जोर आहे. आत्मनिष्ठेशिवाय व्रतांना किंमत येत नाहीं. वांझ स्त्रीला जशी संतति होत नाहीं तसेंच आत्मनिष्ठेशिवाय व्रतें पालन केली तर तीं ध्येयाप्रत पोंचवूश कत नाहींत. म्हणून अगोदर व्रतें कां घ्यावीत हेंहि जाणून घेतलें पाहिजे. कोणी एखादा सांगतों म्हणून केवळ व्रतें धारण केलीं तर व्रतनिष्ट राहूनहि त्यांची मधुर फळें आपणांस प्राप्त होत नाहींत. फळें न मिळालीं तर सांवली मिळतेंच कीं एवढें समाधान मानावयाचें असेल तर मला कांहीं म्हणायचे नाहीं.

अहिंसा हा सर्व व्रतांचा राजा आहे. आपण जीं व्रतें घेतों त्यांच्या मुळांशी हिंसेचा त्याग आहे. हिंसेच्या त्यागाच्या मुळाशी आत्मनिष्ठता आहे. हिंसा हा विकार असून त्यामुळें आपण आत्मधर्माची, आपल्या व्रताची सारी उभारणी अहिंसेवर आहे. याच अहिंसेचें वेगवेगळे दर्शविणारे शब्द आपण रूढ करून घेतलेले आहेत. दया, अनुकंपा परोपकार, सहानुभूति इत्यादि शब्दांतून अहिंसेचा रस पाझरतो. म्हणूनच व्रतांचा सारा पसारा अहिंसेवर उभारलेला आहे.

'व्रत म्हणजे त्याग हें मी नुकतेंच सांगितलें, पण कशाचा त्याग व कशाचें ग्रहण हें मात्र पाहिलें पाहिजे. इथेंच आपण सारे गोंधळांत पडतों. कुणी रविवार करतो, कुणी सोमवार, कुणी अष्टमी-चतुर्दशी, पण हा करतो तरी काय ? शिजविलेलं अन्न न खाणं एवढ्या पुरतं कांहींचं 'हें करणं' असतं. त्या 'करण्याच्या' मागील तत्व व तत्वज्ञान मात्र लोपतं. हें जाणून बुजून घडतं असं मला म्हणायचं नाहीं. तथापि घडत मात्र असतं. व्रतामध्ये मुख्यत: इंद्रियाधीनता व बाह्य विषयासक्ति कमी करावयाची असते. कषाय (कामक्रोधादि विकार) व विषय यांचा अभिप्रायपूर्वक-

मराठी ग्रं... ९३०७८

स्वेच्छेनें केलेला त्याग म्हणजे ' व्रत ' होय. तेथें बाहेरून कांहीं दडपण वा आग्रह नाहीं. आपल्याच आंतरिक स्फूर्ति व उत्साहानें हा त्याग करावयाचा असतो. म्हणूनच आत्मनिष्ठा व अनासक्तीशिवाय खऱ्या अर्थानें असा त्याग होऊं शकत नाही. केवळ बाह्य वस्तूंच्या त्यागाला व्रतांत महत्त्व नाहीं. व्रताचें हें सत्यरूप–मूळ गाभा आपल्या दृष्टिआड होता कामा नये. तेवढाच त्याचा आत्मा आहे. बाकीचें शरीरच, यासाठी आपल्या सर्व धार्मिक–क्रिया व व्रतादिक अनुष्ठानाचे सत्य स्वरूप व त्यामागील भूमिका आपण स्वतः समजून व पारखून घेतली पाहिजे. त्या बाबतींत अज्ञान वा आंधळेपणा ठेवून भागणार नाहीं.

कित्येकदां आपण आपल्या अनेक क्रिया व रूढीबाबतचें सत्यासत्य न पारखतां त्याचा हवाला दुसऱ्यावर–एखाद्या शास्त्रावर किंवा आचार्यांवर सोपवून मोकळें होतों. कदाचित सुरुवातीला हें ठीकहि म्हणतां येईल, पण ज्ञानी माणसाला नेहमीसाठीं तसें करून भागणार नाहीं. या सर्वांबद्दल समुचित आदर ठेवूनहि त्यानें आपल्या जीवनाच्या विकासाचा मार्ग स्वतः साधक–बाधक विचार करून ठरविला पाहिजे. त्याचें जीवन इतकें कमी मोलाचें खचित नाहीं की कुणीतरी दुसऱ्याने त्याचा मार्ग आंखून त्याप्रमाणें त्याला वागणें क्रमप्राप्त करून ठेवावें कीं जें मानवी बुद्धीला पटूं नये, खपूं नये. पण मानसिक गुलामींत आपण वाढतों आणि कसल्यातरी (अ) वैचारिक अस्वस्थतेंत कशालातरी प्रमाण मानून त्यावर आंधळेपणाने आपल्या सुखदुःखासाठीं विसंबून राहतों.

' म्हणजे तुम्ही आचार्यांना व शास्त्रांना प्रमाण मानीत नाहीं का ?' ––त्यांनी मध्येंच घाई करीत विचारलें.

मी म्हणालों–' इतक्या घाईनें असें अनुमान तुम्ही कां काढतां ? आचार्य किंवा शास्त्र हे प्रमाण नाहींत असें नाहीं, तथापि ते कितीहि प्रमाण असले तरी माझ्या जीवनाचा प्रश्न त्यांच्या आश्रयानें मलाच आणि मलाच सोडविला पाहिजे. कारण येणारी दुःख परंपरा सोसायला दुसरा कुणी धावून येणार नाही. सर्व चांगल्या––वाईटांचें कर्तृत्व जर माझें तर त्याचें बरें–वाईट फल मलाच भोगावें लागणार हें निश्चित तर आहे. असें जर आहे

तर मी माझ्या जीवननौकेचें सुकाणूं दुसऱ्याच्या हाती देणें कितपत बरोबर ठरेल ?

एकदां सिकंदर हिंदुस्थानांत आला असतां त्याचा सर्वत्र जय झाल्यावर हत्तीवरून त्याची स्वारी शहरांत फिरणार होती. त्या लोकांनी हत्ती कधीच पाहिला नव्हता. सिकंदर पहिल्यांदाच हत्तीवर बसणार होता. हत्ती तयार झाला. सिकंदर हत्तीवर आरूढ झाला. पण त्याचं मन अस्वस्थ झालं. हत्तीवर माहुत बसला होता. माहुत हत्ती चालवणार व आपण तो नेईल तसे व तिकडे जाणार ही कल्पनाच त्याला रुचली नाहीं. त्यानें हत्तींवरून खाली उडी टाकली. तो म्हणाला दुसऱ्याच्या हाती लगाम देऊन माझ्या जीवनाचा नाश मी करूं देणार नाहीं ' या गोष्टीचा अर्थ हाच नाहीं कां ?

म्हणूनच मी म्हणतो कीं जैन तत्त्वज्ञानांतील सारभूत कल्पना हीच कीं मानवानें अत्यंत जाणतेपणाने आपल्या जीवनाच्या विकासाचा मार्ग आंखला पाहिजे. सूर्य फार प्रकाश देतो हें ठीकच. पण तो रात्री उगवत नाहीं, खोलींत सामावत नाहीं. असलें मोठेपण आपल्या काय उपयोगाचें ? आपणांस हवा तेवढा, तेव्हा आणि त्याठिकाणीं प्रकाश देणारी वस्तु आपण कां तयार केली ? आपलें जीवनहि असेंच आहे. आपण आपल्यासाठीं स्वतंत्र प्रकाशदीपाची निर्मिति केली पाहिजे. सूर्यप्रकाश हवा असेल तर त्याचा उपभोग आपण घेतोंच. तसेंच मोठमोठें ग्रंथ व आचार्य आहेतच, त्यांचा उपयोग आपण जरूर करून घ्यावा; पण त्यांच्या महत्तेची व आमची एकरूपता कशी शक्य आहे ? जीवन उजळण्यासाठीं ते फार तर प्रकाश देतील, मदत करतील; परंतु प्रत्यक्ष उजळण्याचें कार्य तें कसे करणार ? तें आपलें आपणांसच केलें पाहिजे. तसें न झालें तर जीवनांत दम्भ निर्माण होऊन तें उजण्याऐवजी जळेल मात्र ! '

' तें कसें ? '--त्यांनी विचारलें.

' जीवनांत ढोंग कां निर्माण होतें ? मायाचार आणि दंभ कां माजतो ? याची मीमांसा आपण केली पाहिजे. जैनतत्वज्ञानांत व्रती कसा असावा हें सांगतांना तीन पथ्ये सांगितलीं आहेत. पहिलें पथ्य आहे, जें आपण आचरतो तें मिथ्या नसावें, खोटें नसावें, अनावश्यक नसावें. जे इष्ट तें

स्वीकारणें व जें अनिष्ट तें त्यागणें हेंच व्रत. इथें इष्ट म्हणजे काय ? असें तुमच्या मनांत येईल. चोराला चोरीं इष्ट वाटेल. मग चोराला फावेल असें तुमचें या वरील भाष्य. पण चोराला चोरी खरोखरच इष्ट वाटतें कां ? वाटत नाहीं. तो चोरी करतो व एखादेवेळीं तो क्रिया करतांना किंवा केल्यावर तिचें समर्थनहि करतों, पण समर्थन मिथ्या असते. त्यांतून त्याला स्वतःची चूक कळते, त्यांचें अंतःकरण त्याला खातें. तरीही तो वरून समर्थन करतों. मांसाहारी माणसें मांसाहाराचें किती झकास समर्थन करतात! पण राणा प्रतापाचा पराक्रम, चामुण्डरायाचें दैदीप्यमान कर्तृत्व, अशोकाचे सार्वधर्मसमानत्व कां मांसाहारामुळें निर्माण झालेले होते? म्हणून जें स्वीकारायचे तें जीवन विकसित करणारें असावें. सत्य असावें. अहिंसक असावें.

दुसरें पथ्य आहे 'व्रतांत दंभ नसावा' व्रतें ग्रहण करतांना तीं पाळणें जमत नसेल तर तीं घाईनें घेऊं नयेत. लोक काय म्हणतील या भीतीनें आंत एक आणि बाहेर एक असा आचार असूं नये. यामुळें व्यक्तिगत कीड निर्माण होते व इतरहि लोकांची धर्ममार्गावरची श्रद्धा कमी होते. आपल्या मनांतील अंधार घालावावयाचा असेल तर आपली मानसिक शक्ति किती आहे हें ओळखूनच आपला आचार आपण ठरविला पाहिजे. संपूर्ण दृष्टीनें सर्वगुणसंपन्नता जेव्हां येईल ती येवो. पण गुणवत्तेला प्राधान्य देऊन त्याचा सुगंध कां लुटूं नये. एखाद्या उत्तम गवयाचें गायन आपणाला येत नसेल तरी पण त्याची गोडी चाखता येते, आनंद लुटता येतो. त्याप्रमाणें स्वतःला निर्दोष व्रतें पालन करतां येत नसलीं तर खंत न वाटून घेतां किंवा दांभिक रीतीनें ती पालन न करतां जें लोक तीं व्रतें निर्दोषपणें आचारतात त्यांचा आदर सत्कार करून आनंद लुटता आला पाहिजे.

'गुणिषु प्रमोद' गुणी व व्रतसंपन्न लोकांना पाहून प्रमोद वाटणें, हृदय आनंदातिशयाने भरून येणें यांचेहि महत्व शास्त्रांत याचदृष्टीने मुद्दाम नमूद केलें आहे. सारांश व्रताचरणांस दंभ किंवा मायाचार नसावा.

तिसरें पथ्य आहे-व्रतांच्या मोबदल्यांत कांहीं न मागणें. व्रतांचा मोबदला काय ? असा प्रश्न विचारणाऱ्यांनीं व्रताचें मोल ओळखलें नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. व्रतांचा मोबदला म्हणजे काय ? एखाद्यानें वाईट मार्ग

सोडून चांगला मार्ग धरला तर त्याचा मोबदला काय ? विष न पितां ते पिण्याचें सोडले तर मोबदला काय ? चोरी अगर अब्रह्मादि गोष्टी करायच्या सोडल्या तर त्याचा मोबदला काय असणार ?

पण ही मोबदल्याची भाषा आली कोठून ?

कोठल्यातरी भोगलोलूप व विषयाधीन मेंदूतून ती आली असावी. त्यानें प्रत्येक व्रताचें या दृष्टीनें कोष्टकच घालून ठेंवलें असावें. कार्य म्हटलें कीं त्याचे परिणाम ( **After effects** ) येतातच. व्रतें म्हटलीं तरी तेंच होणार हें खरेंच. पण त्यामुळें व्रतांचा जो मूळ उद्देश आत्मदर्शन वा अन्तेंस्तृप्ति तोच बाजूला राहातो आणि सामान्य माणसेंच काय पण असामान्य माणसें देखील हिशोबी बनतात. असें होऊं नये, म्हणूनच व्रताचरणांत आत्मरति, आत्मदर्शन, स्वानंद यांनांच प्रामुख्य दिलें आहे. याचा अर्थ गौण भाग त्यात नसतो असा नाहीं. व्रताने स्वर्ग मिळतो हें खरेंच, पण स्वर्ग ही कांक्षा, अभिलाषा बनूं नये. हेंच नेमकें पथ्य व्रती बनणाऱ्यांनीं पाळावयास हवें आहे. व्रतांच्या प्रतिफलांत भोगप्राप्तीची अभिलाषा बाळगणें यालाच ' निदान ' म्हटलें आहे. सारांश ही तीन मिथ्यात्व, मायाचार व निदान-व्रती जीवनांतील शल्यें होत. तीं जोपर्यंत हृदयांत घर करून आहेत तोंवर बाह्यचारकारी व्रतें पाळूनहि त्यायोगें मानसिक समाधान व शांति लाभूं शकत नाहीं. यासाठींच व्रती ' निःशल्य ' असावा. ' निःशल्यो व्रती ' हें जें सूत्रवाक्य आहे त्याचा मतितार्थ समजून घेतला पाहिजे. व्रतनिष्ठता गृहस्थ जीवनाचा कणा आहे. गृहस्थजीवन सफल नि सुफल व्हावयाचें असेल तर व्रतांनीं पुनीत केलें पाहिजे. इहपरसुखाचें तेंच साधन होय.

व्रत धारण करण्यांत आजकाल अनुत्साह दिसून येतो. यांत काय, त्यांत काय, असे म्हणून व्रती जीवनाची चेष्टा केली जाते, पण ती अयोग्यच नव्हे तर आत्मघातक आहे. जगायचें असेल व तेंहि चांगल्या रीतीनें जगायचे असेल तर जीवनांत संयम हवा आहे. संयम ही शक्ति आहे. या शक्तीचें संगोपन-संवर्धन व्रतामुळेंच शक्य आहे म्हणून अज्ञानपणें होणाऱ्या चेष्टा किंवा टीकेची पर्वा न करतां ज्ञानी माणसांनीं वरील त्रिदोष टाळून म्हणजेच निःशल्य, निःशंक व निर्भय होऊन किमान श्रावक धर्मातील विविध व्रतांचें यथाशक्ति पालन करण्यांत उत्साह ठेवला पाहिजे.

* * *

# अव्यक्ताशीं भांडण

ह्या वर्षाच्या उन्हाळयांत मातृप्रेमाच्या वर्षावांत मनसोक्तपणें स्नान करण्याचा आनंद लुटता आला. आईची प्रकृति बरी नव्हती. ती घरीं व मीहि सुटींत घरींच. ती आजारी होती पण नवें, ताजे आणि चर्चेला हवें तसें तिचें स्वास्थ्य होतेंच.

त्या चर्चेतील महत्त्वाचा एक मुद्दा मी आज उपस्थित करणार आहे. मुद्दा नवा नाहीं. पण नव्यानें विचार करून त्याचा अम्मल होणें आवश्यक वाटतें.

प्रश्न होता देव आहे कां ? ईश्वर आहे कां ?

मी म्हणालों– ' हा प्रश्नच संभवत नाहीं. प्रश्न म्हणजे जाणून घेण्याचें, समजून घेण्याचें साधन. जमीन खोदायला कुदळ हें जसें साधन तसें, पण ही जमीन आहे कां असा प्रश्न ' जमिनीवर उभे अस–

णाऱ्यानें देव आहे का ? असा प्रश्न विचारणे म्हणजे जीवनाशी प्रतारणा करणें होय. जीवनाला व्यापून असणाऱ्या ' देवपणांत ' हळूच उद्भवलेला हा सैतानी प्रश्न आहे, या प्रश्नाचें उत्तर नकारार्थी दिलें तर जीवन उरत नाहीं. केवळ होकारार्थी उत्तर दिलें तरींहि जीवन रसपूर्ण बनत नाहीं. शिवाय प्रश्नाच्या उत्तराचा कांहीसा भागच तुमच्या ' होय ' आणि ' नाहीं ' यानें उलगडतो.

माझ्या पाहाण्यांत असें विद्वान लोकहि आहेत कीं ते देव मानीत नाहींत. त्यांचा आधार तर्क आहे. तर्काने जें सिद्ध होत नाहीं, त्यावर त्यांचा विश्वास नसतो. पण तर्कानें सिद्ध झालेला भाग म्हणजे संपूर्ण सत्य नाहीं. हें त्यांना कळत नाहीं असें कसें म्हणतां येईल ? डोळे उघडून एखादी वस्तु पाहिलीं तरी न बघितला जाणारा असा भाग राहून जातोच. ही नेत्राची कोनात्मकता ( **Angularity** ) चित्रकार ओळखतो. तीच गत सत्याची आहे. सत्य हें नेहमींच मानवी बुद्धीला कोणात्मक दिसतें. चारहि बाजूनीच नव्हे तर त्या सत्याच्या अणुरेणूंत क्ष-किरणाप्रमाणें घुसून तिचें अन्तरंग तपासण्याचें सामर्थ्य कुठें आहे आमच्या दृष्टींत ? तींच गोष्ट तर्काची आहे. तर्क एका पायावर उभा आहे अशी एक चिनी म्हण आहे. ती या अर्थानें फारच समर्पक वाटते.

आईचें म्हणणें होतें-देव नाहीं-नसावा जे देव मानतात त्याची पूजा करतात ते ढोंगी असतात इत्यादि-''

मी म्हणालो- ' देव न मानला तर या काळांत तत्काळ कुणी कुणाला फांसाला देत नाहीं. ( पूर्वीं देत असत ) व देव आहे असा घोष केला तरी तत्काळ कांहीं भौतिक फायदा दिसत नाहीं. पण ज्याची अशी श्रद्धा ( भोळी कां असेना ) आहे त्यांच्या श्रद्धेशी आपण इतक्या उतावीळपणें खेळावें कां ? खेळणें उचित व हितकारक ( त्यांच्या दृष्टीनें ) ठरेल कां ? याचा विचार केला पाहिजे.

ती म्हणाली-' देवाच्या नांवावर लोक इतरांना लुटतात. फसवणूक करतात. त्यांच्या अन्ध श्रद्धेचा फायदा घेतात.

हे देवाच्या नांवाशिवाय जे करतात, त्यांच्यासाटीं आज आपण काय

करतों ? इतर बुरखेहि अनेक आहेत कीं ज्यांच्या आड लपून लोक हे करतातच. देवाचाहि फायदा या कामासाठीं लोक घतात. पण याचा अर्थ देवाचें अस्तित्वच अमान्य करण्यापर्यंत पोंचावे तें तर्कशुद्ध नाही. देवाचें अस्तित्व अमान्य केल्यानें तत्काळ होणारे फायदे कोणते याचा तरी विचार आपण केला पाहिजे. केवळ आपल्या म्हणण्यामुळे ज्याचें अस्तित्व ढळमळेल इतकें ' देवत्व ' मिळमिळीत खासच नाहीं.

' हे खरें कीं देवाचा किंवा देवाच्या नांवाचा आश्रय घेऊन जनतेला फसविणारा हा देशद्रोह करणाऱ्यापेक्षांहि भयंकर आहे. कारण तो भयंकर माणूस दुसऱ्यांच्या श्रद्धेशी खेळतो. श्रद्धा हा तर जीवनाचा आधार आहे. सर्व प्रेमाच्या मुळाशीं श्रद्धाच आहे. म्हणून श्रद्धेला काळिमा फासणारा माणूस ( माणूस कसला तो ! ) हा भयंकरच समजला पाहिजे. परंतु आपण तसें न करतां देवाचें अस्तित्वच नष्ट करतो. इतिहासाकडे पाहिलें तर मानवाला देवाची फार गरज आहे असें दिसून येतें. एक देवत्वाच्या कल्पनेपासून तो कोटयवधि देवापर्यंत त्यानें मजल मारली आहे. ज्याला तुम्ही ' दगड ' संबोधितां त्यानें लक्षावधि प्राण्यांना नैतिक जीवनाची दीक्षा दिलेली आहे. असंख्यात राजेलोकांनीं जे दंडबळांवर केलें नाहीं तें एका हातभर उंच दगडाने घडवून आणलें आहे.

सामान्य जनतेंतून भक्तिमार्ग सांगणारे शेंकडों संत त्या अबोल दग–डानें तयार केले आहेत. भारतावर आक्रमण करणाऱ्या मूर्तिभंजकांचा खरा पराभव याच देवांनी केला. मूर्ति फोडणारे पराभूत झाले. मूर्त्या अद्यापि उभ्या आहेत. इतिहासाकडे हे सारें दाखले जमा आहेत. तेव्हां ' दगड ' काय करतो हें पुन्हां पहावयाचें कारण नाहीं.

प्रश्न––' दगडांत देव मानतां कां ? सर्वधर्मियांच्या देवांच्या मूर्त्याहि तुम्ही पूज्य मानता कां ? '

मी म्हणालो,––' दगडांत देव नाहीं, हें साऱ्यांना माहीत आहे. असें असतां कुणी तुमच्या देशाच्या मूर्ति खंडित केल्या तर केवळ दगड फुटला असें सांगतां कां ? आईच्या फोटोचा कुणी अपमान केला तर कागदाचा अवमान झाला असें मानतां कां ? ध्वज म्हणजे फडके तर खरेंच, पण त्या·

साठींच लक्षावधि लोक कां रक्त सांडायला तयार असतात ? याचे कारण वस्तु ' जड ' असली तरी त्या ठिकाणीं असलेली व्यक्तिगत किंवा सामाजिक श्रद्धा ही ' जिवंत ' असतें, ' चेतन ' रूप असते. म्हणूनच देवाच्या भावनेचा कुणी अवमान करूं नये.

आपल्या ज्ञानाच्या कुवतीप्रमाणें मानवाचें अन्तिम साध्य काय असावे यावरच देवाचे स्वरूप लोकांनी ठरविलें. जो समाज अविकसित त्यांच्या देवांच्या कल्पनाहि अविकसित. देवाकडे जगाच्या विकासाचा, ऱ्हासाचा व उत्पत्तीचा मक्ता दिला कीं झाले असे कांहीं लोक मानतात. तर कांहीं देवाला पितृत्व बहाल करून स्वत: सर्व प्रकारच्या बंधनांतून मुक्त होतात. कांहींना हें सारें अतर्क्य वाटून ' सब झूट ' चा शिक्का मोर्तब करून ते मोकळे होतात. देव न मानला तर कुणाचे कांहीं जात नाहीं. असें वरकरणी वाटते.

' वरकरणी कां ? खरेंच आहे तें, मी देव मानीत नाहीं. त्यामुळें तुमचें किंवा समाजाचें काय बिघडतें ?' --आई.

' मी वरकरणी हा जो शब्द वापरला तो मुद्दामच. कारण जे स्वत:-पुरते कां होईना देव मानीत नाहींत ते सामाजिक व राजकीय शत्रु बनूं शकतात. कारण समाज, घर, राष्ट्र या सर्वांचा आधार शेवटीं श्रद्धा आहे. देव न मानणारा माणूस समाज मानणार नाहीं. घरांचें मांगल्यहि मानणार नाहीं. राष्ट्र तर त्याच्या खिजगणतींतहि असणार नाहीं. माझें बरें-वाईट वागणें याला आधार काय ? असा जर त्याला प्रश्न विचारला तर उत्तर काय ? नीति-अनीतीच्या लक्ष्मण रेषा त्याला कळणार नाहींत. कसला देव अन् कसली संस्कृति ! असा एकदा विचार सुरूं झाला तर जीवनाचा साराच प्रवाह विकृत होईल.

' चार्वाकांनीं आमच्या जीवनांत अशा प्रकारची विकृति कालविण्याचा प्रयत्न केला; परंतु ती विकृति फार काळ टिकूं शकली नाहीं. आमच्या श्रद्धेनें चार्वाक् ' अर्वाक् ' झाले. बौद्ध दर्शनाचा पराभव झाला. त्याचेहि कारण हेंच मानले जातें. याचा इत्यर्थ हा कीं जीवनांत देवत्वाच्या कल्पनेनें दिव्यत्व येतें, मांगल्य येते. ही देवत्वाची कल्पना सुप्रतिष्टित

व्हावी असें साऱ्यांना वाटूं लागले आहे. त्या कल्पनेला खतपाणी दिलेंच पाहिजे असें वाटणें हें शुभसूचक आहे.

' तुमचे म्हणणे हेंच कीं पुन्हां धर्मांधतेंत सारा देश बूडावा. जग चन्द्रावर स्वारी करीत आहे आणि तुम्ही मात्र जुनें तें सोनें म्हणूनच कव-टाळींत आहांत ' –आंई.

युद्धाच्या खाइंत बुडालेला देश तुम्हाला चालतो ! पिळवणुकीने गांजलेला देश चालतो ! वर्णभेदामुळें कोटयावधि निग्रोला जीवनाचे साधे हक्कहि मिळूं नयेत हें चालतें, पण देवाचें नांव निघाले कीं तुम्हाला धर्मां-धता दिसते. मी धर्मांधतेचें समर्थन करणार नाहीं. धर्माच्या नांवावर जनतेचें शोषण मलाहि पसंत नाहीं पण ' देव ' पुन्हा सुप्रतिष्ठित व्हावा, असें मला म्हणावयाचें आहे, यांत देवाचें बरें होणार नसून मानवाचें बरें होणार आहे. कारण माझी देवत्वाची कल्पना मूर्तिपुरती मर्यादित नाहीं. मूर्ति हें अस्थिर वृत्तीला स्थिर करण्याचें, साध्याची वारंवार आठवण करून देण्याचें एक साधन आहे.'

' तुमची देव–कल्पना कोणती ? '

' माझी देव–कल्पना ही केवळ माझ्या चिंतनाचाच भाग नाहीं. अनेक ऋषि–मुनीना दिव्य ध्यानाचें, ज्ञानाचें तें एक अमृत–मय फळ आहे प्रत्येक प्राणी हा आपल्या पुरुषार्थानें देवत्त्व प्राप्त करून घेऊं शकतो ही शिकवण अत्यंत क्रांतिकारी ठरली आहे. ' जगा आणि जगूं द्या ' अशी पोकळ घोष-णाच करून भागणार नाहीं. प्रत्येकाला स्वपुरुषार्थानें देवत्व प्राप्त करून घेण्याची संधि आहे. क्षुद्रत्वाचा त्याग करून आत्म्याच्या महान् शक्तींना वाट करून देता आली पाहिजे आणि व्यक्ति, रंग, भाषा यापैकीं एकहि गोष्ट या उत्कर्षाच्या आड येणार नाहीं.

' आत्म–तत्त्वाचा परिचय करून घेणें व त्याच्या उत्कर्षासाठीं क्षुद्र अहंकार, लोभ, क्रोध इत्यादिकांना तिलांजली देणें हें कार्य पार पाडण्याचा निश्चय हाच खरा निश्चय आहे.' राजकारणांत काय किंवा समाजकारणांत काय प्रत्येक व्यक्तीच्या आत्मोन्नतीस वाव असला पाहिजे. जिथें राजकीय व सामाजिक बंधनें परस्परांत घृणा, द्वेष, अहंकार, असूया निर्माण करतील

अनुक्रम ३६५५.१ ........ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ७६-११-८०


तिथें मानव सुखानें जगणार नाहीं. याचसाठीं मनुष्यांतील देवत्वाला हाक दिली पाहिजे. तो देव जागविला पाहिजे. हें मला कळतें कीं हें काम कठीण आहे. पण तें आवश्यक आहे. भगीरथ प्रयत्नानें हें अशक्य होणार नाहीं. कायद्यानें हें होणार नाहीं. त्यासाठी मानवी मूल्याची पुनर्वसाहत केली पाहिजे. तीं मूल्यें जीवनांत स्थिर केलीं पाहिजेत. त्यावर विश्वास बसेल अशी घडी पुनः घातली पाहिजे.

'तुम्ही तरी देव मानतां कां ? देवळांत तुम्ही जात नाहीं मग देव सुप्रतिष्ठित झाला पाहिजे असें कसें म्हणतां ?'

'मी देव मानतों, मी नियमानें देवळांत जात नाहीं हें तर खरेंच, पण त्यामुळें देवत्व जागविण्याची गरज नाहीं. हें सिद्ध होत नाहीं. मी देवळांत जात नाहीं याचा अर्थ मी तें निषिद्ध मानतो असा नव्हे. आणि जे नियमित जातात त्यांना आंतील देवत्व जागृत करावयाचें आहे म्हणून जातात हेंहि तितकेसें खरें नाहीं. देवभक्तीनें आंतील देवत्व जागृत व्हावे हाच एकमेव हेतु आहे. देवभक्ति म्हणजे स्वतःच्या श्रीमंतीचें प्रदर्शन नाहीं– कीं स्वामित्वदर्शक चिन्हहि नाही. म्हणूनच माझ्यामतें अन्तरीच्या आत्मदेवासंबंधीं श्रध्दा, त्या आत्मदेवाची मी जीवनांत प्रतारणा करणार नाहीं अशी भावना तो देव म्हणजेच माझें जीवनसर्वस्व. असें ज्या दिवशीं वाटेल त्या दिवशीं देवत्व जागृतीचा सोहळा पूर्ण होईल.

माझ्या मंदिरांत जाण्याचा तुम्ही उल्लेख केला म्हणूनच मला हें नम्रपणें सांगू द्या कीं माझा देव मला पार्टटाईम ( अर्ध वेळ ) भक्त होऊं देत नाहीं. माझ्या देवाला पूर्ण वेळ भक्त असणारे पूजक हवे आहेत, भक्तीच्या अमृतरसानें आपले समग्र जीवन रसमय, प्रेमळ व मधुर कर-णारे भक्त हवेत. पूजेनंतर साध्या मानवतेलाहि विसरून वागणारे अर्ध-भक्त किंवा अन्धभक्त नकोत. ज्यांचा देव केवळ 'दगड' हाच असतो' तिथें मानवतेचा साधा अविष्कार– दयाधर्म–नसतो. ते निर्दयपणें 'देवाची. नव्हे 'दगडाची' उपासना करतात. इकडे मानवतेची हत्या करून तिकडे हजारों मणांचा भोग किंवा मूक प्राण्यांचा बली देवाला देण्यांत येतो. ही भक्ति आंधळी आणि विवेकहीन आहे. विवेक व कारुण्य ( दया ) हे मान–

वाचे दोन पाय असले पाहिजे. त्याशिवाय उभा राहणारा माणूस हा माणूस नाहीं. त्याचा अभिनय ( **Acting** ) करणारा प्राणी होय.

' यासाठीं खोटया व अन्ध भावनांना आपण सोडून दिले पाहिजे. जें त्याज्य आहे तें स्वीकारलें तर इतरहि भाग सडत जातो. श्रध्दा चांगली आहे. पण तिला विवेकाची, ज्ञानाची चौकट घातली पाहिजे. कोळसा काळा आहे म्हणून त्याला किंमत नाहीं. तो अणुरेणूंतून पेटून निघतो म्हणून त्याला किंमत आहे. तो पेटणार नाहीं तर त्याला किंमत कोण देणार ? तीच गोष्ट श्रद्धेची आहे. जी श्रध्दा सम्यक् होणार नाहीं, तेजस्वी व ज्वलंत होणार नाही, ती खासच आत्मदेवाचें दर्शन घडवायला समर्थ ठरणार नाहीं. '

' भारतांत तर शेंकडों पंथ आहेत व त्यांचे देवहि अनेक. त्या देवाचें स्वरूप भिन्न भिन्न आहे. मग त्यांत मेळ कसा घालणार ?' —-आई.

' मेळ देवांचा घालायचा नाहीं. पंथ व पंथीय यांचाहि मेळ घालीत बसण्याचें कारण नाहीं. सर्वच साधु-संतांनीं ' देव आंत आहे, आत्म्यांत देव आहे. असें सांगितलें आहे. देव बाहेर कुठेंहि नाहीं, कुणांत सांपडला नाहीं. कसा सांपडणार ?'

हा सारा अज्ञानाचा घोटाळा आहे. देव देत नाहीं, देव मागत नाहीं. देवाला दिलेले देवाला कधींहि मिळत नाहीं, हें साध्या बुद्धीलाहि आतां कळू लागले आहे. विज्ञानाच्या आश्चर्यानें खोटें देवत्व लोपेल असा मला विश्वास वाटतो. आपल्या साऱ्यांची श्रध्दा ही असावी की मानवांतील देवत्व जागे होणार आहे. कदाचित त्यासाठीं फार मोठी किंमत द्यावी लागेल; पण देवत्व जागले तर किंमतीला घेऊन काय करायचें ? जीव-नाचा सारा सारीपाट याचसाठीं तर आपण खेळत आहोंत; ' बचेंगे तो और भी लढेंगे ' या उमेदीनें देवत्व जागविण्याचा प्रयत्न मानवानें केल्यास दुसऱ्या स्वर्गसुखाचीहि गरज भासणार नाहीं.

आज असें वाटतें की देवत्व नाकारून, कायदे तोडून चोरी करतां येते, दारू गाळतां येते. पैसे खातां येतात. याच पैशाने मी सत्ता हातांत घेईन. दिमाखानें मिरवेन. कदाचित अशा ' भल्या ' माणसाचें स्वप्न साका

रहि होईल. पण त्याला सुख मिळेलच असें नाहीं. मानसिक व आत्मिक तृप्ति ही बाब वेगळीच आहे. देहपुष्ट होईल त्याचा. पण आत्मा रोडावेल. कांहींना अशा आत्म्याची ओळख नाहीं. हेंहि मला ठाऊक आहे. पण जोपर्यंत माझ्या देशाच्या मातींत जन्मलेला वाल्या कोळी हा वाल्मिक ऋषि बनतो, ब्राह्मण गौतम हा भ. महावीराचा सर्वश्रेष्ठ शिष्य-प्रथम गणधर बनतो. साधा वाणी तुकाराम बनतो, तोंपर्यंत मी मानवाच्या सद्‌हेतूबद्दल साशंक होणार नाही. साशंक बनणें हे स्वत: अश्रद्ध, होण्याचें लक्षण आहे हें मीं विसरूं शकत नाहीं.'

आमच्या चर्चेचा शेवट मोठा गमतीचा होता. आईला मी एक घडलेली गोष्ट सांगितली. मॅट्रिकची परीक्षा देऊन आम्ही कांहीं स्तानक मंडळी शिरपुरला गेलों. शिरपुर हें विदर्भातील एक प्रसिद्ध जैन क्षेत्र असून तेथील मूर्ति अधर आहे. फक्त एका बाजूस ती अगदीं किंचित टेकली आहे. तिथें गेल्यावर साऱ्यांनीं पैसे गोळा करून अभिषेक केला. मी व माझा एक मित्र मात्र देव-विरोधी असल्यानें आम्ही वर्गणी दिली नाहीं. 'देवावर माझा विश्वास नाहीं' असें मी म्हणालों होतों. अभिषेक झाला. जेवण झालें. त्यानंतर बैलगाडी करून आम्ही वाशीमला यायला निघालों. वाटेंत दोही. बाजूला रामफळांची खूपच झाडें होतीं. रामफळांनीं सारे वृक्ष नुसते बहरले होते. ती तोडण्याचा मोह झालाच. मी व माझा मित्र उतरलों. फळें तोडलीं व त्यावेळीं हें विसरलों कीं ही फळें कुणाच्या मालकीची असतील. इतक्यांत एक माणूस तेथें आला व त्यानें आम्हाला चोरीं केली या सदराखाली पाटलाकडे चला म्हणून सांगितलें. आम्ही सांगून पाहिले कीं हीं फळें चोरण्याचा हेतु नाहीं. पाहिजे तर पैसे घे. शेवटीं पांच रुपये त्याला देऊन सुटका करून घेतली. पैसे आणि फळें घेऊन तो निघून गेला.

ही गोष्ट घडून अनेक वर्षें झालीं. पण मनांत यानंतर वाटलें कीं देवाच्या अभिषेकाला सव्वा रुपया न देता मी त्या माणसाला पांच रुपये दिले. ही घटना घडण्यामागे एक हेतु आहे. देवावर विश्वास नाहीं तर नसूं दे. पण एक सत्प्रवृत्ति मूलक तत्व प्रत्येकाच्या ठिकाणीं वास करीत आहे, त्याचा माणसाला विसर पडूं नये. तें तत्व चूक करणाऱ्या माणसाला बजा-

वते की हें चूक आहे. तरीहि तो ती चूक करतो. त्या तत्वाचा सल्ला मान्य केल्यास अनेक वाईट कामे टळूं शकतात.

त्या अव्यक्त तत्त्वांचा—त्या आंतील आवाजाचा विकास करण्यासाठीं सारें जीवन राबवितां आलें पाहिजे. या उलट आम्ही मात्र त्या अव्यक्त तत्त्वाशी भांडत बसतो. त्या अव्यक्ताला व्यक्त करण्याचा प्रयत्न हाच मानवाचा महान उद्योग असला पाहिजे. या उद्योगाशिवाय आरंभिलेला प्रत्येक उद्योग हा शेवटी दुःखपूर्ण झालेला दिसून येईल. म्हणूनच जीवन-प्रेरक असे तें अव्यक्त आत्मतत्त्व जाणण्याचा प्रयत्न न करतां केवळ त्याच्याशीं भांडत बसलों तर-तर काय ? तर जीवनासंबंधींचा विचार करण्यास आपण अपात्र ठरूं एवढेंच !

* * *

# जीवन संघर्ष

माझें एक माननीय मित्र कम्युनिस्ट आहेत. बनारस विद्यापीठांत ते इतिहासाचें प्रोफेसर आहेत, ते एकदां सुट्टींत मुक्कामाला माझ्या घरीं होते. त्यांच्याशीं थोडेसे बोलणें करावे लागे. पाहुणे म्हणून व त्यांनाहि बोलणें हें फार प्रिय होते म्हणून. त्यांच्या इतिहास विषयांतील मला फारसें गम्य नव्हते. कारण ' गत काळाचा वृथा शोक वाहे ' अशी माझी समजूत इतिहाससंबंधानें फार लहानपणापासून आहे. इतिहासानें राष्ट्र निर्माण करण्याचें दिवस संपलेले आहेत. मानवानें जगून नवे विश्व निर्माण करावें असें माझें मत आहे. जुन्या काळांतील माणसें आजच्यापेक्षां प्रगत असतील याचा पुरावा क्वचितच. भांडणें, द्वेष, युद्धप्रियता, स्वार्थांधता, धर्मांधता यांत सर्वांना गोवून चालणाऱ्यापैकीं मागील इतिहास आहे. आतां नव्या मूल्यांना किंमत येत आहे. तीं मूल्यें अधिक कशी रुजतील याची दक्षता घेणें अधिक चांगलें असें मला नेहमींच वाटत आलें आहे.

परंतु माझें मित्र कट्टर इतिहासवादी ! त्यांचा व्यासंग, अभ्यासशीलता मोठी ! परंतु आमचे दोघांचें जें जमलें नाहीं तो मुद्दा होता-- 'जीवन संघर्षमय आहे का ?'

'जीवन हा लढा आहे. जीवन म्हणजे प्रचण्ड संघर्ष आहे. जीवन म्हणजे झुंज आहे.' अशा प्रकारे अनेकदां बोललें जातें. पुढें पुढें तें तत्त्वहि बनतें. कांहीं प्राणिशास्त्रविशारदांनीं व वनस्पतिशास्त्र-विशारदांनीं हें म्हणणें सोदाहरण मांडून दाखविले कीं, त्याहि जीवनांत प्रचंड झगडा आहे. लहान लहान कीटाणु, बीजाणु, जीवाणू देखील जगण्यासाठीं तीव्र झगडा देत आहेत. याचाच सूर पुढें मानवी जीवनांत उमटला. मानवी जीवन हें संघर्षमय असून तें टिकविण्यासाठीं भयंकर झगडा द्यावा लागतो असें सिद्ध केलें गेलें. हें झगड्याचें तत्त्व जीवनांत शिरलें तें फारसें विवेकानें शिरलें असें मला वाटत नाहीं. 'झगडा असणें तो मानणें, तो निर्माण करणें, त्याचा आभास निर्माण करणें, त्याची कल्पना करणें, असे वेगवेगळें पर्याय त्यांत असत नाहींत काय ?' असा माझा उलट सवाल माझ्या मित्राला होता. 'डार्विनने मांडलेले सर्व्हाइव्हल ऑफ द फिटेस्ट' ( बळी तो कान पिळी ) चें तत्त्व हें अत्यंत तोकडे असून मुळांत 'सर्व्हाइव्हल' या कल्पनेंतच गफलत झाली आहे असें मला वाटते. कां वाटतें ? तेंच मी सांगणार आहे.

पहिल्यांदा असें पहा कीं, आपणांस ज्या मानवी जीवनाचा लाभ घडतो त्याचे कारण आपण स्वतःच नाहीं काय ? माझ्या जीवनाचे सूत्रधारकतत्त्व अन्यत्र मानले तर 'मी केवळ कळसूत्री बाहुलीच' आहे काय ? मग माझ्या आत्म्याचें अमरत्व, ज्ञातृत्व, सर्वकर्तृत्व असें जें वर्णन केलें आहे तें खोटें आहे काय ? 'आत्मा' हें तत्त्व इतक्या सहजासहजी बारगळून टाकता येण्यासारखें आहे काय ? तसें असेल तर 'आत्मा' हा स्वतंत्र पदार्थच नाहीं असे मानावें लागेल व मग जीवनविकासाची, जीवनपूर्तीची कल्पनाच सोडून द्यावी लागेल. पण तसें करतां येत नाहीं. तसें करणें हें विनष्ट विवेकाचें लक्षण ठरेल. म्हणून प्रत्येकाचें जीवन हें स्वतःच्याच आत्म्याच्या संकल्पसिद्धीचें दृश्यरूप आहे हें मानणें अपरिहार्य आहे. जीवनाचें हिताहित हें आदि-अंतीं ज्याचें त्यालाच करावें लागत नाही काय ?

असें असेल तर जीवनाला सर्वस्वी जबाबदार ज्याचा तोच आहे–असतों हेहि मान्य करावें लागतें.

अशा रीतीनें जीवन–विकासाचा मार्ग ज्याचा त्यानेंच अनुसरावा लागतो. हा मार्ग स्वीकारतांना स्वतःच्या बुध्दिसामर्थ्याप्रमाणें व प्राप्त परिस्थितीप्रमाणें तो स्वतःचा विकास करून घेण्याचा प्रयत्न करतो. धड-पड करतो.

या धडपडीला, प्रयत्नाला कांहीं तत्त्वज्ञानी संघर्ष मानतात. परंतु संघर्ष हा शब्द विकासासाठी वापरावाच लागतो. ही समज खोटी आहे. विकासाचा संघर्षाशी अनिवार्य संबंध आहे हें म्हणणें खोटें आहे. मी केवळ आध्यात्मिक बाबतींत हें म्हणतो असें नाहीं. आर्थिक बाबतींत प्रयत्नानेच पैसा मिळतो अशी अनिवार्यता सांगतां येत नाहीं. तशी कार्यकारणपरंपराहि सांगणें धाडसाचें आहे. ‘ प्रयत्नान्ती यश ’ हें म्हणणें सोपें आहे, परंतु प्रयत्नांती यश मिळतें असें म्हणण्यापेक्षां यश मिळणारें असेल तरच प्रयत्न फलद्रूप झाल्यासारखें दिसतात.

म्हणूनच प्राचीन ग्रंथांतून दैव व पुरुषार्थ असा वाद माजविला गेला. तिथें चूक ही घडली की कालचा ‘ पुरुषार्थच ’ उद्याचा ‘ दैव ’ बनतों हें लक्षांत घेतलें गेलें नाहीं. मुळांतून तो आपला भूतकाळचा ‘पुरुषार्थच’ असतो. परंतु तसें एकदम वाटत नाहीं. दैव ही तृतीय पुरुषी भानगड नाहीं. ती ज्याची त्याची पूर्वजन्मीची हुंडी असून ती या जन्मी वटवावयाची असते.

त्याच अर्थानें मी म्हणत होतो कीं इतिहासानें काढलेलें ‘ जीवन हा लढा आहे ’ हें तत्त्व चुकीचें असून विकासाला अडथळा करणारें आहे.

युरोपियन किंवा अमेरिकन संस्कृतीनें काढलेलें हें तत्त्व त्यांच्या प्रग-तीचे एकीकडे द्योतक ठरलें तरी आज त्यांच्या जीवनांत निर्माण झालेलें विष हेहि त्यामुळेंच आहे. वैफल्यवादानें त्यांचें जीवन काळवंडून गेलें आहे. वेड्यांची इस्पितळें वाढत आहेत. याचें कारण जीवन संघर्षमय असून सर्वांनी पळत सुटायचे, संघर्ष करायचें ठरविलें आहे. स्त्री–पुरुष संघर्ष, कामगार-मालक संघर्ष, सरकार व प्रजा संघर्ष, विद्यार्थी-गुरु संघर्ष, रंग–संघर्ष, जाति–संघर्ष, भाषा–संघर्ष, सत्ता–संघर्ष. सर्वत्र संघर्षच संघर्ष !

सारी मानवजात होरपळून निघेल असें हें संघर्षाचें तत्त्व आहे. डार्विनला किंवा मार्क्सला किंवा हेगेलला हें तितकेसें जाणवले नसेल. कारण त्यांना विसाव्या शतकांतील माणूस माहित नसावा. त्यांनीं सांगितलेलें हें संघर्षाचे भूत इतकें विनाशकारी आहे हे जर त्यांनीं पाहिले असते तर जीवन-संघर्ष हा शब्दप्रयोग त्यांनीं वापरला नसता. संघर्ष ही वस्तु मुळांतून चुकीची आहे. जिथें संघर्ष तिथें शांतता आढळत नाहीं. जिथें शांतता नसेल तिथें कांहींतरी विकृति निर्माण होते. मन जितकें शांत, स्वस्थ व निर्लेप असेल तितकेच बौद्धिक निर्णय हे विवेकपूर्ण असतात. मानसिक शांति हाच जीवन साफल्याचा भाग आहे. संघर्षानें मन ढवळले जाते. तिथें काम, क्रोध, असूया, द्वेष इत्यादि विकार निर्माण होतात. व्यक्तिपरत्वें त्याचे परिणाम कमी अधिक होत असले तरी प्रचण्ड संघर्षाचे तत्त्व मान्य करून राष्ट्रा-राष्ट्रांत स्पर्धा व त्यांतून युद्ध ! व्यापारांत स्पर्धा व बेकारी ! स्पर्धा ही उन्नतीची जननी नाहीं. स्पर्धेतील मन जुगारी असतें. जुगार ही मानसिक विकृति आहे. जें आपणांला जगायला आवश्यक आहे, त्यासाठीं प्रयत्न व उद्योग असावा. परंतु त्या उद्योगाच्या मुळांशी स्पर्धेचें किंवा संघर्षाचे तत्त्व नसावें. उद्योगशीलतेचे रूपांतर स्पर्धेत किंवा जुगारांत होऊं नये. संघर्षमय जीवनाचें तत्त्वहि असेंच फसवें व विकाराधिष्ठित आहे.

मग जीवनांत संघर्ष नसतोच काय ? असा जर मला कुणी प्रश्न विचारला तर माझें उत्तर त्याला 'नाहीं' असें आहे. जीवनात प्रयत्न, उद्योग, चिकाटी आहे. त्याची गरज आहे. मानवी जीवन पुसून-घासून स्वच्छ ठेवण्यापुरती तरी त्यांची गरज आहे. वंगणानें यंत्र चालतें तसें प्रयत्नानें जीवन चालतें. तें गतिमान दिसतें. पण प्रयत्नाशिवाय ज्यांना यश मिळतें, सिद्धि मिळते, मोठेपणा मिळतो त्याचें काय ? तीं प्रमेयें कशीं सोडवायचीं ? केवळ अपवादानें नियम सिद्ध करण्यासारखें हें नाहीं. हमाल, शेतकरी, पट्टेवाला, कमिशंड ऑफिसर, पेन्शनर यांच्या प्रयत्नांशी कमाईचें त्रैराशिक कसें जमणार ? कमाईचें जमले तर बौद्धिक न्यूनाधिकतेचें प्रमाण कसें बसविणार ? केवळ अतर्क्य म्हणून हें टाळतां येणार नाहीं.

याचसाठीं मी संघर्षाचें तत्त्व मान्य करीत नाहीं. जीवन हा लढा

नसून जीवन ही साधना आहे. आपला सारा जीवनस्त्रोत प्रापंचिक गोष्टीं-तून वळवून तो महन्मंगल अशा आत्म्याकडे वळविला पाहिजे आणि इथें देखील संघर्षाचें कारण नाहीं. ज्यांना वळवितां येणें शक्य आहे त्यांनीं त्या प्रमाणांत तो वळविला पाहिजे. मानवी जीवनांत विकारांचें प्राबल्य असते. त्या विकारांशीं संघर्ष करणारें मन पराभूत होते. परंतु त्या विका-रांची कारणपरंपराच जर ठेवली नाहीं तर संघर्ष कमी होतो. मानसिक संतुलन निर्माण करणें व जें प्राप्त होतें त्याचा आनंदाने स्वीकार करून चांगल्यासाठीं नित्य प्रयत्न करीत असणें या वेगळी आनंददायक गोष्ट नाहीं.

यावेळीं एक मन असें म्हणतें कीं आम्ही कोणी ऋषि-मुनि नाहीं असे वागायला. आम्ही संसारी आहोंत. आम्ही संसार सोडला नाहीं. हे आम्हाला केलेंच पाहिजे.

वरील म्हणणें एकदम बिनतोड आहे असें वाटायला लागतें; पण त्यांतील तर्कविसंगति जीवननाशक आहे. जीवन कुणाचेंहि असो तें मोलाचें आहे. त्यांतून मानवाचे जीवन हें तर अमोल. अशा जीवनांतून विकसणारे तत्त्व हें इतकें तुच्छ लेखून कसें चालेल ? ऋषि-मुनींचे जीवनहि तुमच्या सारखेंच आहे. त्यांना तरी काय सुटलें आहे ? त्यांनीं बराच प्रयत्न करून कांहीं तरी सोडण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांच्या जीवनांत जर थोरपणा आला असेल तर तो याचमुळें कीं त्यांनीं जीवनाला किंमत दिली. जीवन महत्त्वाचें कीं भोग ? जीवन महत्त्वाचें कीं संघर्ष ? जीवन महत्वाचें कीं विकार ? आणि त्यांनीं ठरविलें कीं या साऱ्याहून जीवन महत्त्वाचे आहे आपण अद्याप जीवन ही काय बाब आहे हें जाणलें नाहीं. आंधळ्याला जसा हिरा तसें आपलें आहे, जीवन हें अमृत आहे. आपल्या सामर्थ्यानें तें उज-ळावें, प्रकाशाहे, तेजस्वी व्हावें, लोकोपयोगी व्हावें, कल्याणकारी व्हावें असे आपणांस वाटत नाहीं. तसें वाटले तर प्रपंच सोडावा लागत नाहीं. तो सुटतोच. मन रमत नाहीं. लहानपणची खेळणी तरुणपणीं कुणी खेळतो कां ? ती सुटून जातात. या जीवनाला नवीन खेळणी द्या म्हणजे जुनीं खेळणी सुटतील.

हे नवें खेळणें म्हणजे जीवन हें आनंदानें भरलें आहे असें समजा. दुःख तर आहेच. जें पिऊन आम्ही जगतो त्याचे भय काय ? दुःखाला पचवूनच आपण सार जगत आहोंत. शारीरिक सामर्थ्य आहे तर पैसा नाहीं, पैसा आहे तर शरीर क्षयग्रस्त आहे. दोन्ही आहे तर सवड नाहीं; असे शेंकडों प्रकार आपण पहात नाहीं काय ? म्हणूनच जीवनांतील विषाला अमृत करण्याची कला आपण हस्तगत केली पाहिजे. जें विष आहें असें वाटतें तें अमृत असतें. इकडेहि आपलें दुर्लक्ष असतें. एका सुभाषित-कारानें मोठ्या गमतीने या संघर्षमय जीवनाचें चित्र रेखाटलें आहे--

यौवनं धनसंपत्ति प्रभुत्वमविवेकिता ।
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ।

यौवन, संपत्ती व सामर्थ्य या साठीं तर सारा संघर्ष आहे ना आज ? तरुणपण प्राप्त करून घेण्यासाठीं किती धडपड ? औषधें, कल्प, रसायनें, हार्मोन्सची इंजिक्शनें, तेलें आणि गोळ्या यांचा किती खर ! तारुण्याचे तारु म्हातारपणाच्या दर्यांत पडूं नये म्हणून केवढा आटापिटा ! पण खरें तारुण्य काय असें आमरण टिकतें ! तारुण्याची खरी कमाई स्वतःचें जीवन जगण्यांत व ते आनंदानें जगण्यांत आहे. हा आनंद मात्र विवेकी असावा. डोळस असावा. विवेकपूर्ण भोगानें माणूस मुक्त होतो. भोगांत अनासक्ति केवळ विवेकानेंच निर्माण होते. भोग सोडून भागत नाहीं. ते सुटलें पाहिजेत. पिकले फळ किंवा पान जसें पडतें तसें जीवनाचे भोगोप-भोग पिकून पडूं द्या. हें तेव्हांच घडतें जेव्हां जीवन म्हणजे काय हें कळतें. जीवनाला कंटाळलेले, ' तेंच तें-पणाला ' विटलेले लोक जीवन जाणूं शकत नाहींत. जीवनाची अमर्याद शक्ति व सामर्थ्य जाणून घेतां आली पाहिजे. जें जीवन जन्म-मरणातीत आहे. जें जगल्यानें अधिक उन्नत होतें, जें नेहमी तरुण असते. तें जीवन कळलें पाहिजें. तसें तें कळालें नाहीं तर या जीव-नाला महत्त्व येत नाहीं. त्याचीं किंमत कळत नाहीं.

" तुम्ही अनेक वेळां जीवन हा शब्द वापरला आहे. पण त्यांतून अर्थबोध होत नाहीं," माझा कम्युनिस्ट मित्र म्हणाला.

मी म्हणालों, ' जीवनाची व्याख्या फार सोपी आहे. जें श्रध्देनें, निष्ठेनें घडविलें गेलें, ज्ञानानें पोसलें गेलें व सम्यक् आचारानें गौरविलें गेलें तें जीवन–जिवनाचा एक विचार असा आहे की सारे जीवन ज्ञानमय आहे आणि ज्ञान व जीवन वेगवेगळे नाहीं. परंतु भ्रांति, विकल्प, अश्रध्दा, अज्ञान, अविवेक यामुळें तें वेगवेगळें दिसतें.

संपूर्णपणें सारें जीवन ज्ञानाग्नीनें पेटलेलें आहे. अविवेकाच्या राखेंत सांपडल्यानें तसें दिसत नाहीं. आत्मा व ज्ञान, आत्मा व सुख, आत्मा व अनंत शक्ति हें समजून घेण्याच्या भाषेंत वेगवेगळें शब्द आहेत. जीवनाचा संपूर्ण रस म्हणजे आनंद. तो आनंद ज्ञानमय आहे. आपला जो भौतिक आनंद असतो तो अज्ञानांतून उगम पावतो. म्हणून तो त्याज्य आहे. ज्ञानी माणूस हा आनंदी कां असतो ? याचें उत्तरहि यांत आहे. म्हणून जीवन म्हणजेच सम्यक् ज्ञान. जीवन म्हणजे आत्म्याचें मनोहारी हास्य, जीवन म्हणजे चारित्र्यवानाचे पदलालित्य. जीवन म्हणजे ज्ञानी माणसाचें क्रीडांगण आहे. तिथें निर्भयत्व आहे. तिथें विरागत्व आहे. तिथेंच खरें तप आहे. तिथेंच खरें ज्ञान आहे.

आमच्या जीवनांत गढूळपणा आला आहे. तेथें भय शिरलें आहे. विकार दडी मारून बसले आहेत. तपाच्या ऐवजीं संताप आहे. ज्ञानाच्या ऐवजीं पुस्तकी, ( भौतिक ) तोकडे ज्ञान आहे. म्हणून आमच्या जीवनाला आदि–अन्त आहे. मरण हें आमच्या जीवनाची सावली आहे. पदोपदीं ती आमची पाठीराखी आहे. त्या भीतीने आम्हांला आनंदानें जगतां येत नाहीं. मरणाला सोडून येऊनच आम्ही जन्म घेतला नाहीं काय ? जें मरण जिंकून आम्ही पुनः जन्म घेऊं शकतों त्या मरणाला प्रथम मृत्युभयापासून दूर होणें आवश्यक आहे. त्यानंतर कांहीं जीवननिष्ठा निर्माण करून त्यासाठींच सारे कांहीं करणें जरूर आहे. देहाला जें पाहिजे तें द्याच. परंतु त्या देहाचाहि उपयोग जीवन जाणून घेण्याकडे झाला पाहिजे.

दिव्य जीवन व मुक्ति हे दोन वेगवेगळे शब्द आहेत कां ?

माझ्या मित्राचा हा प्रश्न कांहींसा भ्रमांत टाकणारा आहे, मुक्ति शब्द कशापासून तरी मुक्त व्हा असें सुचवितो. त्याच्याहून योग्य शब्द आहे

व तोहि ज्ञान–वाचक आहे. आपण ‘ सर्वज्ञ ’ बनले पाहिजे. आत्मज्ञ बनले पाहिजे. जीवनाला घुसळून दिव्य जीवन उसळलें पाहिजे. तें दिव्य जीवनच अभिप्रेत आहे. शिवाय मुक्ति ही तर अनिवार्य वस्तु आहे. तुमचे,–आमचे जीवन या अज्ञानांतून बाहेर येणारच आहे. ज्याच्या जीवनांत ज्ञानसूर्य लवकर उदित होईल त्याचें जीवन अगोदर संपूर्ण होईल. कांहींचें उशीरा होईल. भ्रांति नष्ट होणार, अज्ञान नष्ट होणार हें काय खोटें आहे ? यांतून आपलें दिव्य जीवन खास मुक्त होणार आहे. मुक्तीला पर्याय नाहीं. मुक्ति हें जीवन–पूर्ततेला दिलेलें नकारार्थी पण प्रिय असें नांव आहे. मुक्ति हा शब्दच आनंदानें ओतप्रोत भरला आहे. म्हणून दिव्य जीवन व मुक्ति हीहि वेगवेगळीं नाहींत. एकच आहेत.

तेव्हां माझा मुद्दा असा आहे कीं जीवन हें संघर्षमय नसून तें शांत आहे. संघर्षानें उन्नति होत नाहीं. विरोध–विकासवादाचें नांव हें एकपक्षीय असून त्यांतील सत्य हें शेवटीं तकलुपी आहे. विकासाची बाट मानसिक दौर्बल्य घालवून दिल्याशिवाय होणार नाहीं.

मनांतील क्षुब्धता, अस्वस्थता हें मनाचे शत्रु आहेत. अत्यंत शांतपणेंच आपणाला जीवन घडविलें पाहिजे. त्यांत विरोधी सूर मिसळता कामा नये. जीवनांतील रस शांततेनें चाखतां येतो. तो घाई–गडबडींत, पळत–पळत चाखता येत नाहीं. म्हणूनच जीवन हा लढा नसून ती एक साधना आहे, पूजा आहे. आपणच आराध्य व आपणच आराधक. तिथें द्वैत नाहीं.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३५५५२ ........ वि: ..................
क्रमांक ........................ नों दि: २८-११-८८

## निवृत्ति–प्रवृत्ति

महाराष्ट्रांतील विद्वानांना पुन: पुन: चर्चा करून मान्य झालेले सिद्धांत कसोटीवर घासून पाहण्याची एक चांगली संवय आहे. त्यामुळें प्रश्नाच्या अनेक बाजूंचा विचार नव्यानें केला जातो. अशा वादांगापैकीं एक विषय म्हणजे निवृत्ति की प्रवृत्ति असा आहे. प्रथमत: या वादाची सुरवात कां झाली हें पाहिलें पाहिजे.

आमच्यांतील कांही विद्वान पाश्चात्य व भारतीय ( पौर्वात्य नव्हे ) संस्कृतींत वाढलेल्या मानव जातीची तुलना करतात. तुलना करतांना पाश्चात्य संस्कृतीनें भौतिकतेंत मारलेली मजल पाहून त्याचें डोळे दिपतात. मोठमोठीं यंत्रें, त्या यंत्रांनीं दिलेली ‘ आरामशीर ’ साधनें, सुखसोयी व निसर्गावर केलेली मात इत्यादि गोष्टी पाहून ‘ भयचकित नमावें ’ अशी स्थिति त्याची होते. त्यांत गैर कांहींच नाही.

नंतर ते भारतांतील दारिद्र्य, दैन्य, दुःखें व अज्ञान यांच्याकडे पाहतात. आणि खरोखरीच सद्भावानें प्रेरित होऊन त्यांना असें वाटतें कीं आम्ही जर भौतिकवादी असतों तर आम्हीहि सुखांत राहिलों असतों. इथ-पर्यंत विचार करूनच ते थांबत नाहींत. कारण आजच्या अज्ञान-दारिद्र्याचे मूळ शोधण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. कां ? तर कार्यकारणाची मीमांसा करून ही स्थिति भारतीयास कां प्राप्त झाली याचें बुद्धिवादी दर्शन त्यांना घडवावयाचें असतें. हें दर्शन घडवितांना त्यांचा सर्वात मोठा हल्ला असतो ' धर्म ' यावर. भारतीय धर्म हे निवृत्तिपर आहेत. त्यांनीं लोकांना भ्रमांत टाकून, जाणून बुजून दारिद्र्य, अज्ञान व दैन्य अशा अवस्थेंत सर्वांना ढक-ललें आहे, असें त्यांना वाटतें.

वरवर पाहतां ' धर्मावर ' केलेला हा हल्ला लोकप्रिय होईल. कारण भोळ्या लोकांना असें वाटेल कीं दैन्य व दारिद्र्य जर दूर होत असेल तर आपण ' धर्म ' सोडावा.

महाराष्ट्रीय संतांनी देश बुडविला. असा एक आक्षेप त्यांच्यावर घेण्यांत येतो. हा आक्षेप जुना आहे. आणि त्याचाहि अर्थ, निवृत्तिपर धर्माचा उपदेश संतांनीं दिला आणि त्यामुळें देश भिकार झाला. एवढाच आहे.

अशाप्रकारची कारणमीमांसा केल्यावर फार मोठा प्रश्न आपण सोड-विला असा समाधानाचा सुस्कारा ते टाकतात. परंतु अशा विचारपद्धतीने मांडलेली मीमांसा ही नेहमीच सदोष असते. कारण इथें कार्यकारणमीमांसा ही पूर्वग्रह दूषित असते. किंवा अशा मीमांसेतील हे खरे हेतु नसून हेत्वा-भासच असतात.

प्राचीन काळापासून भारतीय धर्मपरंपरेंत पुरुषार्थ साधनेची प्रति-पादना केलेली आढळते. त्यांत अर्थपुरुषार्थ व काम पुरुषार्थ सांगितलेले आहेत. इतकेंच नव्हे तर गृहस्थांचें जीवन हे अर्थ व काम या दोन तत्त्वावर आधारलेलें आहे याची जाणीव प्रत्येक तत्त्वज्ञानी माणसालाहि असते. म्हणूनच गृहस्थाश्रम ( गृहस्थ जीवनाची पोषक अशी अवस्था ) नांवाचा आश्रम आश्रम-चतुष्टयांत प्रतिपादला आहे. कसल्याहि सुखोपभोगांना तेथें

मज्जाव केला नाहीं. मज्जाव आहे तो अतिरेकी प्रवृत्तीला. हा अतिरेक म्हणजेच पाप ! गृहस्थी जीवन ज्यांचे सुखाचें जातें, समाधानाचें जातें अशांनाच वानप्रस्थ आणि संन्यास अशा दोन आश्रमाची ' वाट ' धर्मानें दाखविली आहे.

मूलतः धर्माची प्रेरक शक्ति ही चेतनाशक्तीला विशुद्धतेकडे जायला सांगते, परंतु ती अनाग्रही असतें. हे भौतिकवादी प्रणेते शस्त्रास्त्रांच्या बळांवर असा भौतिकवाद अमलांत आणतात तसा धर्माने किंवा संतांनी निवृत्तिमार्ग कधींच अम्मलांत आणला नाहीं. अनाग्रही व निःस्वार्थीपणानें केलेला धर्मप्रचार किती दृढमूल होत असे याचें उदाहरण डोळ्यासमोर आदर्श म्हणून ठेवण्याऐवजी धर्मप्रचारांतील अपहेतु तेवढाच लक्षांत घेऊन निवृत्तिमार्गाला नांवें ठेवण्याने कारणमीमांसा पूर्ण होत नाहीं हें जडवाद्यांनीं लक्षांत असूं द्यावे. दुसरें, ज्यावेळीं प्रवृत्तिमार्गाचा पंथ होता. पण प्रवृत्ति-मार्गाचा पंथ सफल कां होत नाहीं याची थोडी कारणमीमांसा मात्र ते करीत नाहींत.

माझा विचार या मीमांसेपुरता विवक्षित आहे.

सर्व सामान्यपणें मानवी मन हें प्रवृत्तिपर असतें. प्रवृत्तिपर याचा अर्थ पापी असा मात्र नाहीं. प्रवृत्ति याचा अर्थ आहे ' स्व-केंद्रित. स्वतःचे हित ( आर्थिक, सामाजिक, राजकीय ) पाहण्याकडे त्याची प्रवृत्ति ( कल ) असते. याला तत्त्वज्ञानी माया, मोह, अज्ञान असे कल्पितात. त्याचें दृष्टीनें माया, मोह व अज्ञानमुलक ही प्रवृत्ति आहे असें क्षणभर समजूं या. प्रवृत्ति प्रधान मन म्हणजे स्वतःचें पोट भरण्यासाठींच नव्हे तर जिभेची लालसा पूर्ण व्हावी म्हणून नानाप्रकारचें अन्न निर्माण करायचें, त्यांची चव घ्यायची. यांत पशुप्राण्यांची हिंसा करून त्यांचे मांस रुचकर करून खायचें, दारू प्यायची, भक्ष्य-अभक्ष्य पदार्थ खायचे ही झाली आहाराची प्रवृत्ति. तीच कामभोगाची. स्त्री जाति ही उपभोग्य आहे, ( स्त्रीला पुरुषाइतका समान-दर्जा भौतिक घटनेने दिला आहे तो कां याचाहि विचार करावा.) ही कल्पना उराशी बाळगून तिच्याकडून मिळणाऱ्या सुखाची साधना हा प्रवृत्तिमार्गाचा दुसरा महत्त्वाचा विषय होय.

तिसरा विशेष म्हणजे यंत्रें, कारखानें, उत्पादन, सुखसोयी, वाहनें इत्यादि.

यावर निवृत्तिमार्गीचें म्हणणें काय आहे हें निरपेक्षपणें पाहिलें पाहिजे. निवृत्तिमार्ग सर्वच गृहस्थांना संसार सोडून वनांत चला असा उपदेश करीत नाहीं. संसार करतांना संसार हेंच उद्दिष्ट नसून स्वतःचा विकास हेंहि एक उद्दिष्ट आहे. ज्यांना संसार त्यागाचा व आत्मसाधनेचा उच्च मार्ग साधायाचा आहे त्यांना साधु-संत केवळ मदत करतील .पण ज्यांना शक्य नाहीं त्यांना उत्तम गृहस्थ होण्याचा ते उपदेश करतील. निवृत्तिमार्गाचे दिग्दर्शन हें '**Not failure but low aim a is crime**' या पद्धतीचें असते. जें आचरण सर्व लोक करतात त्यापेक्षां कांहीतरी दिव्य-भव्य ध्येय माणूस डोळयापुढें ठेवणारच. असें ध्येय केवळ व्यक्तिपुरतें मर्यादित राहिलें आहे. साधुसंतानीं संपूर्ण राज्याचें राज्य 'निवृत्तिपर' बनविल्याचा एकतरी दाखला हे विद्वान दाखवू शकतील काय ?

निवृत्तिमार्गाचा एवढा उपदेश, एवढा आटापिटा करूनहि जग तिकडे वळत नाहीं. स्व-केंद्रित पशुप्रवृत्तीला अरविंद महर्षि '**Self-centered Animality**' म्हणतात. मानवाला अतिमानस किंवा उच्चमानस प्रवृत्तीकडे वळविणें हाच निवृत्तिमार्ग आहे. आचार्यांनीं देखील 'असुहादो विणिवित्ती, सुहे पवित्ती य जाण चारित्तं' अशुभ प्रवृत्तींतून शुभ प्रवृत्तीकडे वळणें यालाच चारित्र्य (शील) म्हटलें आहे. तुम्ही देखील ज्यावेळी मानवी मनाच्या प्रवृत्तीचें विश्लेपण करतां तेव्हां प्रवृत्तीचे उच्चीकरण करणें समाजाच्या व राष्ट्राच्या हिताचें आहे असें प्रतिपादतां. राष्ट्रासाठीं त्याग करणाऱ्यांचे पुतळे उभारतां, त्यांचीं चरित्रें लिहितां तें कां ? तर त्यांनीं आपलें स्वार्थकेंद्रित जीवन अनेकांच्या सुखासाठी वापरलें म्हणूनच ना ? कीं ते भोगवादी जीवनाचा प्रचार करीत होतें म्हणून ? यूरोपांत देखील भोगप्रवृतीचा प्रसार असला तरी उत्कृष्ट साहित्य नेहमीच अशुभ व स्वार्थी मानवी प्रवृतीचा प्रवाह बदलून त्यांतून सर्वजनकल्याण किंवा त्या प्रवृत्तीचें उच्चीकरण-शुद्धीकरण म्हणा पाहिजे तर कल्याणासाठीच धडपड असते.

दुसरें, प्रवृत्ति मार्गाचा उपदेश करायचा म्हणजे तरी काय ? असे

एकहि तत्त्वज्ञान नाहीं कीं ज्याने मानवाच्या भोगप्रवृत्तीला चांगलें म्हटलें व त्याच्या अभिवृद्धीसाठीं उपदेश दिला. कारण आहार, निद्रा, भय व मैथून या चार पशुप्रवृत्तींच्या चांडाळ चौकटींत माणूस अडकलेला असतो. परंतु मानवाला जो मेन्दू व विचारशक्ति प्राप्त झाली आहे ती वस्तूच्या सत्य-स्वरूपाला शोधून काढणारच.

आणि असे संशोधन–म्हणजेच जीविताचा अर्थ काय ? जीवनांतील अन्तिम ध्येय काय ? जीवनांतील अनंत, दिव्य शक्तीचा विकास कां व कसा होतो ? इंद्रियांच्या अधिसत्तेहून श्रेष्ठ अशी मनाची शक्ति आहे, तर त्याहूनहि अनंत शक्ति कुठें तरी वास करते का ? चालू झालें तर तें थांब-वितां येईल कां ? मानवी मन हें मनाच्याहि पलीकडे जाऊन सत्य काय आहे याचा शोध घेणारच. आणि अशा आत्मसंशोधनांतून जीं रत्नें बाहेर पडतील तीं जगापुढें मांडणारच. निवृत्ती मार्गाचा अवलंब करा किंवा करूं नका असा कुणाच्या वैयक्तिक विचार–स्वातंत्र्याला तुम्ही बाध आणाल कां ? आणि तसा तो आणणें इष्ट ठरणार आहे कां ? जें मानवी मनाचें कुप्रवृत्तींतून उन्नयन करतें असें तत्त्वज्ञान नेहमींच आदरिलें जातें व आदरिलें जाणार आहे.

शिवाय तुम्ही ज्याला सुसंस्कृतपणा म्हणतां तो तरी काय आहे ? मानवी विकारांना मोडता घालून त्या विकारांचें परिवर्तन सुविचारांत करणें हा जुना मार्ग आहे. आज तुम्ही कर लादून, सर्टिफिकेट्स् विकत घ्यायला लावून, पैसे गुंतवायला सांगून तेंच करण्याचें इच्छितां; पण त्यांतून निवृत्ति साधली जात नाहीं. तिथे बळजबरी आहे. या उलट निवृत्तिमार्ग विचारप्रधान आहे. एकदां विवेकाने लोभ–भावना त्याज्य ठरली म्हणजे धर्माचा आधार देऊन तो त्यास स्थिर करतां येतो. ती गोष्ट कायद्यानें होत नाहीं. धर्माचा आधार हा मानवाच्या विकारांना काबूंत आणण्यास आवश्यक आहे.

लग्नसंस्था, समाजसंस्था किंवा राज्यसंस्था यांना तरी आधार काय आहे ? माणूस घरबंध सोडील, कोणी कुणाचें ऐकणार नाहीं, अराजकता माजेल. हीच कारणें तुम्ही द्याल कीं नाहीं ? त्या संस्थांच्या संचालनासाठीं

म्हणूनच राज्यसंस्था किंवा समाजसंस्था यांचा आधारहि धर्मच असावा व तोहि अशुभांतून शुभाकडे नेणारा.

आपल्या उपभोगप्रवृत्ताचें तुम्ही कधींतरी विश्लेषण करतां काय? तुम्ही ज्याला उपभोग समजतां ती भावना तरी काय आहे? ती केवळ भावनाच नव्हे तर काय आहे? उपभोग-प्रवृत्ति ही अविवेकांतून जन्माला आली आहे असें विचारांती आपणांस दिसून येते. अधिक वस्तूंचा वापर हें आजच्या भौतिक संस्कृतीचें जिवितमान ( **Standard of life** ) वाढविण्याचें धोरण आहे. पण यांतून वर्गविग्रह, कलुषता, वैषम्य आणि युद्धे निर्माण होतात. मोटार वापरणारा सुसंस्कृत व पायी हिंडणारा जंगली, रानटी. बंगल्यांत राहणारा उच्च व झोंपडींत राहणारा तुच्छ अशी भावना केवळ या प्रकारच्या उपभोगप्रवृत्तीवर अवलंबून आहे. समाजवादी विचारसरणी या विचारांची विरोधक आहे. कां, तर वरील उपभोग-प्रवृत्ति सदोष आहे. स्वतः समाजवादी रचनाहि सदोष आहे. कारण तिथें व्यक्तीचा विचार नाहीं. समाज नांवाची जीवंत वस्तु नाहीं. ती कल्पना आहे. परंतु समाजाच्या उत्थानाने व्यक्तित्वाचा नाश होऊं नये म्हणूनच अनेक लोक याहि समाजवादी प्रवृत्तीचा विरोध करतात. कां तर तीहि केवळ भोगवादी आहे. व्यक्तीचें सुख निर्माण करण्याची अवास्तव जबाबदारी ती रचना उचलते. सुख हें आंतून बाहेर येते. केवल भोगानें सुख मिळतें हा एकांगी विचार आहे. त्यागानेहि सुख मिळते. बलिदानाने सुख मिळते. दानाने सुख मिळतें. म्हणून केवळ भोगप्रवृत्तीने सुख निर्माण होईल असें प्रतिपादणें म्हणजे सत्यापलाप होय. सूख हें फुलांच्या सुगंधा-प्रमाणें आहें. वरून अत्तराचा शिडकावा करून तें जमायचें नाहीं. 'निंबा-चिया झाडा साखरेचें आळें' यांतील आशय काय दर्शवितो? सुखाचा जन्म हृदयांत होतो व तें सुख सर्व शरीर व्यापून राहतें. ज्यानें आपलें सुख अप्राप्य किंवा श्रमप्राप्य अशा भौतिक वस्तूंच्या खुंटीवर टांगून ठेवलें असेल त्याला खरें सुख मिळणार नाहीं. कारण उपभोगाचें सामर्थ्य मर्यादित व प्राप्त झालेली सामुग्री विपुल असल्यामुळें उपभोग घेतां येत नाही. म्हणूनहि दुःख होतेच. घरीं गडगंज संपत्ति आहे. पण डॉक्टरी सल्ल्या-

प्रमाणे ताकावर जीवन कंठणारे महाभाग नाहींत कां ? असे कां ? संग्रह म्हणजे सुख नाहीं. सुखाचा शोध अन्यत्र करून चालणार नाहीं. भौतिक दुःखांतून मुक्ति हवी असेल तर भोतिक सुखाच्या कल्पनांचाहि त्याग केला पाहिजे. प्राप्तीनें सुख तर अप्राप्तीनें दुःख हें समीकरणच आहे आणि प्राप्ति हें दैवाधीन, कर्माधीन ! म्हणून त्या माणसाचें सुखहि दैवाधीन व कर्माधीन झालें आणि प्रयत्नवाद किंवा पुरुषार्थ हा जर करा-यचा आहे तर त्याला अडथळा कोण करणार ?

प्रवृत्तिवादाचा आधार पुरुषार्थ आहे अशी त्यांच्या समर्थकांना आशा वाटते. परंतु खरें पाहिलें तर स्वतःचा पुरुषार्थ हा त्या प्रवृतीचा आधार नसून सुखाची भ्रामक कल्पना हा त्या प्रवृतीचा आधार आहे. पैसा मिळ-विणें हा पुरुषार्थ समजला जातो, परंनु हें चुकीचें आहे. कारण त्या पुरु-षार्थाचा आधार भोग असतो, आणि भोगप्रवृतीनें मिळविलेला पैसा त्याला ठरणार नाहीं. त्यासाठी तो कायदे मोडून पैसा मिळवील. अन्यायानें पैसा मिळवील. अशा रीतीनें पैसा मिळविला तर त्यानें अर्थ पूरुषार्थ केला असें म्हणतां येणार नाहीं. अर्थाचा आधारहि धर्मच असावा. तो मिळाला तरी-हि धर्म सोडू नये. व न मिळाला तरीहि धर्म सोडूं नये. कारण जीवनाचा आधार धर्म आहे ही कल्पना जोपर्यंत दृढमूल होत नाहीं तोपर्यंत प्रवृत्ति-वादाची मांडणीं म्हणजे अन्याय आणि अधर्म या दोन गोष्टींना रीतसर दिलेली पावती आहे.

* * *

∴

# सोईच्या तंबूंतील प्रवासी

भारतांतील गंगा-सिंधूच्या खोऱ्यांतील संस्कृतीचा इतिहास असो वा रामायणकालीन दंडकारणांत राहणाऱ्या मानव जातीचा इतिहास असो किंवा मध्यआशियांतील युफ्राटिस व तैग्रिस नदीच्या खोऱ्यांतील संस्कृतीचा इतिहास असो, त्या इतिहासाचा निष्कर्ष-मानव स्वतःच्या सुखसोईसाठीं अहर्निश झगडत आला आहे-हाच निघतो. संस्कृतीची जी वाटचाल झाली तिच्या मागील हेतु काय होता याची चर्चा अनेकांनीं केलेली आहे. या हेतूबद्दल आतां फारशी साशंकता उरली नाहीं. मानवी जीवनाला पंचमहाभूतांशीं झगडा द्यावा लागला व त्यांच्याशीं झगडून त्यानें या गैरसोईच्या

जगांत आपली सोय करून घेतली आहे. ही सोय करून घेतांना त्यानें सुरवातीला फक्त देहाचाच विचार केला. स्वतःच्या देहापलीकडे कुणाचेंहि अस्तित्व मानणें हें जणु अतर्क्य आणि अगम्य आहे, असेंच त्यास वाटलें. ही देहबुद्धि हळूहळू विकसित झाली. देहासाठीं सारें विश्व राबवावें अशी स्वार्थमूलक मूळचीच प्रवृत्ति त्यानें वाढीस लावली.

असें असलें तरी कांहीं तत्त्वज्ञ या देह-संस्कृतींतून मोकळे झाले. त्यांनीं देहापेक्षांहि चिंतनीय व उपास्य असें तत्त्व हुडकून काढलें. तें तत्त्व म्हणजेच आत्मतत्त्व होय. या आत्मतत्त्वानें देह-केंद्रित झालेला मानवसमाज हळंहळू कां होईना आत्मकेंद्रित होण्याकडे प्रवृत्त होऊं लागला. ही आत्मोन्मुखता अनेक प्रसंगीं कसोटीला उतरली आहे. या बाबतीत भारतीय समाजाची परीक्षा घेण्यांत आली. या देशावर भौतिकवाद्यांनीं मोठ्या उत्साहाने चढाया केल्या. देशाला गुलाम बनवून येथील धर्म व संस्कृति लयाला नेण्याचा चंग बांधला. क्षणभर असें वाटलें कीं हा आत्मोन्मुख समाज नष्ट होतो की काय. आम्ही केलेली आत्मसाधना धुळीस मिळते कीं काय असा संभ्रम निर्माण झाल्यासारखा वाटला. संस्कृतीला भौतिकवादाचे प्रचंड हादरे बसले. परंतु या सर्व यवन-म्लेच्छ आक्रमणांना जमिनींत गाडून भारतीय समाज पुनश्च संघटित झाला आहे. चिरकाल टिकणारी सांस्कृतिक मूल्यें पुनश्च तेजानें झळकणार अशीं चिन्हें दिसू लागली आहेत.

असें एकीकडे असलें तरी कांहीं लोकांच्या मनांत विकल्प आणि विभ्रम घर करून आहे. एकदा सहज एका डॉक्टराकडे मी गेलों. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर मी म्हटलें --

'पर्यूषणपर्व आहे. देवळांत वगैरे जातां की नाहीं ?'

'छेः' एखादें झुरळ झटकावें तसा आविर्भाव करून ते म्हणाले, 'आम्ही पापच करीत नाहीं तर कशाला देऊळ ? शिवाय माझी श्रद्धा पण नाहीं. जिथें श्रद्धा नाहीं तिथें जा कशाला ?'

हें उत्तर त्यांनीं इतक्या सफाईने दिलें कीं त्यांना वाटलें एवढ्यानें संपेल. पण मी म्हणालों--' तुम्ही पाप करतां की करीत नाहीं हा मुद्दा

तात्काळ चर्चेला मी घेत नाहीं. कारण तुम्ही म्हणाल की पाप-पुण्याच्या कल्पना ह्या देश-काल-स्थितीप्रमाणें बदलतात. अर्थात ही पळवाट आहे. पळवाट म्हणजे राजमार्ग नव्हे, किंवा विहित मार्ग नव्हे.' पाप आणि पुण्य याच्या दीर्घ चर्चेत न पडतां मी डॉक्टरांना म्हणालों--

' तुमची श्रद्धा देवावर नाहीं. देवळावर नाहीं. ही श्रद्धा तुम्ही कोणत्या निकषावर तपासून घेतली आहे ? तुम्ही सुशिक्षित लोक जर तर्काने विचार करणार नसाल तर सारेंच मुसळ केरांत जाईल. ज्या श्रद्धा शब्दाने आपली जीभ पवित्र केली ती श्रद्धा तरी काय आहे ? जीवनांतील कोण-कोणत्या गोष्टी तुम्ही श्रद्धेच्या व ज्ञानाच्या प्रखर अग्नीवर तावून सुलाखून घेतल्या आहेत? तुम्ही लग्न केलं तें कोणत्या श्रद्धा-निकषावर घासून? पूर्वजांनी निर्माण केलेल्या विवाहसंस्थेच्या आधारानेच ना ? ती विवाह-संस्था, तुम्ही श्रद्धा निकषावर घासून पाहिलीं आहे काय ? तसेंच जे सामाजिक व राजकीय कायदे आहेत त्यांचे पालन तुम्ही करीत आहांत ते प्रत्येक तुम्ही श्रद्धां-निकषावर घासून पाहिलें आहेत काय ? नाहींत. अनेक गोष्टी ' बाबावाक्यं प्रमाणं ' म्हणून किंवा राजकीय शासनांतील कायदे म्हणून तुम्ही ते पालन करितां. बुद्धीचा निकष लावून ते पालन करण्या-इतपत आपण समर्थ झालों नाहीं. आपलें ज्ञान व श्रद्धा ही देखील आपण पूर्वपरंपरेनें मान्य करीत आलों आहोत. श्रद्धा आणि ज्ञान यांच्या आश्रयानं प्रत्येक गोष्ट तपासायची म्हणाल तर तें मानवाला शक्य नाहीं. असें असतांना ज्यामुळें तुम्हाला स्वार्थत्याग करावा लागेल, पैसा खर्चावा लागेल, वेळ खर्चावा लागेल अशा ठिकाणीं ' माझी श्रद्धा नाहीं ' हें सूत्र म्हणत बसल्यानें कार्यभाग होणार नाहीं.

" माझ्या सोईसाठी मी तें एक घरटें तयार केलेलें आहे. या घरट्यांत राहून मी धर्मापासून दूर राहीन अशी तुमची भावना आहे. ज्या सोईसाठीं मानवजातीने केवळ भौतिकविकास केला, अनेक साधनें, यंत्रें, आरामशीर घरें बनविलीं, ती सारी शरीर-संस्कृतीची धात्री आहे. सोय केल्याने दुःखें टळतील अशी भ्रामक समजूत आहे. ज्याला मानव दुःख समजत आहे ती दुःखें खरीं नाहींत. सामाजिक दुरवस्थेमुळें प्राप्त झालेलें दारिद्र्य असो,

अनुक्रम ३७५५१ ... दि: ...
क्रमांक ... नौ दि. २६...

पारतंत्र्य असो किंवा आणखी कांहीं दुःख असो हीं सारीं दुःखें दूर करतां येतात. पण जर मी माझी श्रद्धा व माझें ज्ञान पळवाट म्हणून वापरूं लागलों तर होणारा अधःपात शतमुखी ठरेल. श्रद्धा पूज्य आहे. तिची टवाळी, तिची टिंगल होऊं शकते. ज्ञानाची चेष्टा केली जाते. ज्ञान हें पैसा खेंचण्याचेंच फक्त साधन आहे हें समजलें जाऊं शकतें. पण परिणामी तें घातक ठरणार आहे. विज्ञानाची साधना मानवांच्या नाशासाठीं करणें शक्य आहे. पण तें विज्ञान नव्हे, तो आत्मघातकी मार्ग आहे. म्हणूनच खोटया आवरणाला श्रद्धा आणि आभासात्मक सत्याला ज्ञान समजणें धोक्याचें आहे. हा धोका सुशिक्षित म्हणविणाऱ्यानें पसरूं नये. ज्या श्रद्धेचा उल्लेख तुम्ही करतां ती श्रद्धा म्हणजे आत्मवंचना नाहीं. त्या श्रद्धेनें या जगांत जीवनाला उजाळा दिला आहे. सारें जग त्याच एका आधारानें चालत आहे. म्हणून श्रद्धेच्या मायावी आवरणानें स्वतःसाठीं आणि परक्यासाठीं नवीं संकटें उभीं करूं नका. पूतनेनें मातेचें रूप घेणें हें जितकें निंद्य, गर्ह्य आणि त्याज्य आहे तितकेच श्रद्धेच्या नांवाखालीं लपून खऱ्या मुल्यांना मूठमाती देणें हें आत्मघातकी ठरणार आहे.

'सोईसाठीं धर्म बदलावा, मुनींनी आचार बदलावेत असा सूर आजकाल निघत आहे. ही सोय काय चीज आहे याचे पृथःकरण होणें आवश्यक आहे. सोईच्या तत्त्वाखालीं जीवनविनाशक असें भुजंग आहेत. मानवी मूल्यांना स्थिर न होऊं देण्याचें व पापमूलक प्रवृत्तींना खतपाणी घालण्याचें कार्य हें सोईचें सत्त्व करूं पाहतें. भ. महावीरांनीं राज्योपभोगाचा त्याग करून जंगलाचा मार्ग स्वीकारला तो कां ? सोईच्या मंगल तंबूत राहून धर्मसाधना त्यांना नसती कां करतां आली ? तीर्थंकरासारख्या शूरवीर क्षत्रियांना देखील स्वतःची श्रद्धा व ज्ञान तपाच्या अग्नींत तावून सुलाखून घ्यावी लागतात. पण आमच्यांतील कांहींना अशी सोय हवी आहे की घरीं बसून मुक्तिमार्गाची दारें उघडतील. अशीं दारें उघडी असलीं तरी प्रवेश करायला दीर्घ तप व कायक्लेशयुक्त साधना आवश्यक आहेच.'

त्यावर डॉक्टर म्हणाले--'अहो, तुम्ही हें जें सांगत आहांत हें आम्हाला कळत नाहीं. तें सारे आमच्या डोक्यावरून जात आहे. तुमचा धर्म व तुमचा मोक्ष हे सारे अनाकलनीय आहे.'

मी म्हणालों, ‘ शरीराचें यंत्र जसें अनाकलनीय असलें तरी तें जाणून घेण्याचा तुम्ही प्रयत्न करतां. रोगांचें निदान व त्याची चिकित्सा करतां. हें सारे तुम्ही करतांना जसे स्वहित साधतां व जनकल्याणहि करतां त्याप्रमाणेंच सामाजिक किंवा धार्मिक कार्यें ही देखील स्वतःच्या व इतरांच्या फायद्यासाठीं आहेत; पण हें तुम्ही मुद्दाम टाळतां. धार्मिक कार्यांना ढोंग म्हणतां. त्यांतील दोष तेवढें वेंचून त्या कार्याची निंदा करतां. पण कलेक्टरने जर कां एकाद्या कार्याला हजर व्हा म्हटले तर तत्परतेनें आपण हजर होतों त्याच्या फंडास भीतीनें कां होईना मदत करतों. याचा स्पष्ट अर्थ आहे कीं तुम्ही भीतीनें जगतां, श्रद्धेनें नाहीं, ज्ञानानें नाहीं. भीति हीच तुमच्या जीवनाची अधिष्ठात्री असेल तर तुम्ही क्षणोक्षणी मरत आहांत. भ्याडांचें जीवन हें गर्ह्य अ हे. दारिद्र्याच्या भीतीनें ग्रस्त असलेला धनिक असूं शकत नाहीं. खरा धनिक हा दानानें संपत्तीचा उपभोग घेतो. तो संपत्तीच्या नाशानें घाबरत नाहीं. भीतीपेक्षां पराक्रम, सोईपेक्षां श्रद्धा व त्यासाठीं गैरसोयच नव्हे तर मृत्यू पत्करणारा तो असतो. श्रद्धेची चेष्टा करणें सोपें आहे; पण त्यांतून होणारा विनाश सहन करणें कठीण आहे.

राजकारणांत देखील केवळ सोयीसाठीं अहिंसा वापरलीं गेली तर ती जागतिक शांतता निर्माण करूं शकणार नाहीं. केवळ रंग बदलला तरी विषाचें विषारीपण नष्ट होत नाहीं. मूळांतून अश्रद्धेचें विष मारलें गेलें पाहिजे.

‘ धर्म हीं आपल्या जीवनाशीं निगडित बाब नाहीं, अशी भ्रममूलक समजूत तुम्ही करून घेत आहांत. तुमचें जीवन व तुमचा धर्म हे दोन पदार्थ नाहींत. धर्म लेबल नाहीं. धर्म हा आत्म्याचा सहचारी भाव आहे. सूर्याच्या प्रकाशांत वावरतांना नित्य सूर्याचें स्मरण राहत नाहीं. सूर्याचे अस्तित्व लक्षांत येत नाहीं. तसेंच धर्माचें आहे. जीं सुख–दुखें आपण अनुभवतों तीं आपण आचरलेल्या धर्माचीं आहेत. तुमच्या आचाराचे परिणामच ( **After-effects** ) होत नाहींत ? क्रिया प्रतिक्रियेशीं संबंधित नाहीं असें मानाल काय ? एखादें औषध दिल्यावर त्याच्या शरीरावर होणाऱ्या प्रतिक्रिया ( **Reactions** ) तुम्ही मानतां कीं नाहीं ? तसेंच

मानवी मनांत उद्‌भूत झालेलें क्रोधादि विकार प्रतिक्रियेशिवाय आहेत का ? एकदां तुम्हीं विचार, तर्क व संगति या दृष्टीनें जीवनाची घडी बसवूं लागलांत तर धर्म उपेक्षिणीय वाटणार नाहीं. झाडाला फळें येणें ही बीज-गुणाची परिणत अवस्था आहे. तिथें तुमची इच्छा महत्त्वाची नाहीं. तसेंच तुमच्यांतील पाशविक गुण संपुष्टांत आणून तेथें आध्यात्मिक मूल्यें स्थापित करणें ही प्रत्येक जीवाची स्वाभाविक परिणति आहे. माझ्या ' हो ' म्हणण्यानें व तुमच्या नकारानें हा विकास थांबणार नाहीं.

शेवटीं डॉक्टर म्हणाले, ' म्हणजे धर्म ही टाळतां येणारी गोष्ट नसेल तर मग ती स्वीकारलीच पाहिजे. '

मी म्हणालों, ' धर्म तुमच्या स्वीकृतीची वाट तरी कुठें पाहतों ? अग्नीची उष्णता ही अग्नीची सहचारीणी आहे. तसेंच मानवी जीवनाची प्रेरक शक्ति धर्म आहे. या धर्म शब्दाने मी कुणा विशिष्ट प्रचलित धर्मांचा आग्रह धरणार नाहीं. आजचे प्रचलित धर्म उद्यांच्या काळांत टिकणार नाहींत. त्यांचीं नांवेंहि बदलतील. पण ज्या अन्तःप्रवृत्तीमुळें मानवाच्या ठायीं साम्यभाव, वीतरागत्व आणि सर्वज्ञत्व येईल त्या प्रवृत्ति म्हणजेच धर्म. माझें अज्ञान आणि माझ्या वासना ज्या प्रवृत्तींनीं लोपतील तो धर्म अमरच राहणार. या धर्माला वेगवेगळी नांवें दिलीं तरी धर्म हा धर्मच राहतो. आपल्या वर्तनानें धर्म बदनाम झाला तर धर्म त्याज्य न मानतां आपलें वर्तनच त्याज्य मानलें पाहिजे. धर्मपालन करणाऱ्यांत दंभ निर्माण झाला तर त्याला जबाबदार तुम्ही-आम्ही आहोंत.

धर्म जबाबदार नाहीं. दिवसा ढवळ्या चोऱ्या झाल्या तर त्याला सूर्य जबाबदार कसा ? यासाठींच असें मानलें पाहिजे कीं आपल्या उच्च-तम अन्तःप्रवृत्तींतूनच आपण धर्म निर्माण करावा. पण सर्वांना इतका विचार करतां येत नाहीं.

म्हणूनच भगवान् महावीरासारख्या आत्मजित् पुरुषांचा उपदेश हाच धर्म मानून आपण आचरण करतों. त्यांनीं त्या वेळच्या समाजाला उद्दे-शून जरी धर्म निरूपण केलेला असला तरी त्यांतील सिद्धांत दिक्कालातीत आहेत. अहिंसा, सत्य, अचौर्य, अपरिग्रह ( नियंत्रित भोगोपभोग ) व ब्रह्म-

चर्य या विविध स्वरूपांत सांगितला जाणारा धर्म हा जीवनमूलक आहे. सारें जीवनच धर्ममूलक आहे. परंतु अज्ञानामुळें कुठें तरी चुकतें आणि सारें जीवन कलंकित बनतें. अधर्ममय बनतें.

'या बाबतींत सर्वांत मोठा दोष म्हणजे उदासीनता होय. जाणूनच घ्यायचें नाहीं असा जणु हटाग्रह आम्ही स्वीकारला आहे. त्या हट्टाला 'मत' 'विचारसरणी' 'बुद्धिवाद' किंवा 'पटत नाहीं' 'विश्वास नाहीं' अशीच जर नांवें देणार असलांत तर ती गोष्ट हिताची होणार नाही. जसें औदासिन्य वाईट तसाच हट्टहि त्याज्यच होय.

'रत्नकरंडक' ग्रंथांत एक मोठा चांगला उल्लेख आलेला आहे. त्यांत म्हटलें आहे--

स्वयं शुद्धस्य मार्गस्थ बालाशक्तजनाश्रयाम् ।
वाच्यतां यत् प्रमार्जन्ति तद्वदन्त्युपगूहनम् ॥

उपगूहन अंगाचें वर्णन करतांना असें मुद्दाम सांगितलें गेलें आहे कीं, धर्ममार्ग स्वतः निर्दोष आहे. शुध्द आहे. विकृति वाटते ती अज्ञ आणि असमर्थ मानवांच्या चारित्र्यामुळें. तेव्हां कार्यकारण-मीमांसा टाळून मुद्दाम धर्मवस्तूची निंदा करणें हें आत्मघाताइतकेंच भयंकर आहे. अशा रीतीनें स्वतःच्या दोषांमुळें अशुध्द; अमंगल व हेय वाटणाऱ्या धर्माविषयीं पूज्यता निर्माण करणें हें धार्मिक माणसाचें कर्तव्य आहे.

जें चांगलें आहे, तें चांगलेंच आहे, हें म्हणण्याइतकें धाडस लोकांतून लोपत चालले तर नीतिमत्ता, चांगुलपणा व परस्पर सहकार्य लोपत जाऊन गुंड-प्रवृत्तींना ऊत येतो. आमच्यांतील चांगुलपणा आम्हालाच टिकविला पाहिजे. तो न टिकविला तर इतर प्रवृत्ति उफाळतील.

डॉक्टर म्हणाले,--'तुमच्या म्हणण्यांतील सत्य पटतें. परंतु धर्मातील कांहीं भाग रॅशनल् (तर्कसंगत) वाटत नाहीं. पुण्य-पाप, पुनर्जन्म, मोक्ष इत्यादि केवळ शब्द आहेत.'

मी म्हणालों,--'हें रॅशनलचें तत्त्व तुम्हीं सोयीस्कर रितीनें वापरतां. जें रुचत नाहीं तें रॅशनल नाहीं अशी कां तुमची व्याख्या आहे? ज्याला तुम्ही रॅशनल समजतां तें तरी शंभर टक्के रॅशनल असतें कां?

नाहीं. ज्याला तुम्ही रॅशनल समजतां तिथेंहि पंचवीस–तीस टक्कें रॅशनल नसतोच. तुम्ही जन्म घेतां तें रॅशनल आहे कां ? मरतां तें रॅशनल आहे का ? सर्व गोष्टी बुद्धीच्या निकषांवर लावून घ्याव्यांत हें खरें. पण बुद्धि हें अंततो गत्वा उरणारें एकमेव तत्त्व नाहीं. बुद्धीच्या पलीकडे असणारें एक तत्त्व आहे. तिथपर्यंत बुद्धीची मजल जात नाहीं म्हणून त्यास ' अनाकलनीय ' संबोधून सामान्य व सोईस्कर बुद्धीलाच तुम्ही प्राधान्य देतां. पण त्यामुळें सत्याचें स्वरूप पूर्णत: आकलन होत नाहीं. म्हणूनच मी सांगत होतों कीं, आम्ही आमच्या बुद्धिवादाच्या आहारीं जाणें हेंहि चांगलें नाहीं. कारण आमची बुद्धि ही ' रावण–बुद्धि ' नाहीं याची काय खात्री ? ' रामबुद्धी ' चीं किती माणसें देशांत आहेत हें तुम्ही पाहतांच. प्रत्येकानें स्वत:च्या सोयीपुरता तंबू उभारला आहे. त्यासाठीं तत्त्वज्ञान उभें केलें आहे. धर्म उभा केला आहे. गुरु निर्माण केले आहेत व तंत्र निर्माण केले आहेत. परंतु हा सुखमय तंबू उभारून आपण सुखांत आहोंत अशी वंचना करून घेत आहोंत. खरें आत्मीय वैभव आपल्या वेंगवेंगळ्या अन्त:प्रवृत्तींना जागृत करून त्यांचा विकास करण्यांत आहे. '

डॉक्टर म्हणाले, ' तुमच्या या विवेचनाबद्दल धन्यवाद. '

मी म्हणालों, ' केवळ धन्यवादानें भागणार नाहीं. अशा प्रकारच्या सोयीस्कर तत्त्वज्ञानाच्या तंबूतील प्रवासी आपण बनूं नये. यासाठीं आपण काय करणार आहांत हें मला अधिक प्रिय आहे. '

* * *

## मी सचिंत आहे

प्रवासांत भेटणारीं माणसें हीं कधीं कधीं तत्त्वज्ञान बोलतात. खरें पाहिलें तर प्रवास हा मौजेखातर लोक करतात असा समज आहे. पण तसें असतेंच असें दिसत नाहीं. मी असें प्रवासी पाहिले आहेत की ज्यांनीं मला कधीं कधीं असं 'सुनवलं' आहे कीं तें मी कोणत्याहि शाळा कॉलेजांत शिकलों नसेन.

असेच एक प्रवासी सद्गृहस्थ मला भेटले. मला झोंप येत नव्हती व त्यांना वेळ कसा घालवावा हें कळत नव्हतें. मी विचारलें, 'आपण कुठें चाललांत ? काय करतां ? इ. इ.'

या संभाषणांतून मैत्रीहि झाली आणि एकप्रकारचा परिचय. ते एक जैन प्रोफेसर असून कांहीं हस्तलिखितें मिळतात का म्हणून गांवें धुंडाळत फिरत होते. हा छंद कां उद्भवतो, कसा जडतो हें कोडें आहे. कांहीं तरुण

माणसें संशोधनांत रमून जातात. घर, मुलें-माणसें आणि जग यांना विसरून अविश्रान्त श्रम करून ग्रंथसंपदा निर्माण करतात. कधी मान-मरातबासाठीं झगडत नाहींत. हार-तुरे, प्रसिद्धि इत्यादिसाठीं हेवा-दावा करीत नाहींत. एका स्वतःच निर्माण केलेल्या रेशमी विश्वांत ते वावरत असतात. कांहीं सामाजिक कार्यांत लक्ष घालतात. वर्तमानपत्रें काढतात. नवे विचार मांडण्याचा, कांहीं [तरी जागृतीचा क्षण निर्माण करण्याचा, जुन्या चाली मोडण्याचा, अंधश्रद्धा घालविण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. या उद्योगांत त्यांचीं घरें, शेतें, धनधान्य लिलावांत निघालीं आहेत. कांहींना समाजाने वाळींत टाकलें. कांहींची निंदाकुचाळकी केली. कांहींना जगणेंच काय पण मरणें देखील अशक्य करून सोडले. तरीपण ही चिवट जात हरळीसारखी तग धरून असल्याचाहि देखावा दिसतो आहे.

जैनसमाजाचाच विषय प्रामुख्यानें आमच्या चर्चेचा भाग असल्यानें पंडित टोडरमल्लांनी कशा प्रकारे समाजाला नवी दृष्टि देण्याचा प्रयत्न केला ? कर्मकांडी गृहस्थच नव्हे तर खोटा धर्म आचरणाऱ्या जैन मुनीचीहि त्यांनीं परीक्षा घेतली ? मोक्षमार्गप्रकाशक ग्रंथ कशा सामाजिक विरोधांतून पुढें आला. मुनींनीं श्रावकांना धर्म सांगावा कीं श्रावकानें मुनींना धर्माभ्यास घडवावा ? उत्तरेंतील पंडितांनीं अनेक ग्रंथांच्या वचनिका ( टीका ) कशा लिहिल्या ? मुसलमान आमदानींत किती व कोणत्या हालअपेष्टा त्यांनीं सहन केल्या, याचा इतिहास कुठें आहे ? देशांत दंगल माजली आहे. राज्यें बदलत आहेत. तरीहि जिनवाणीचा आश्रय करून खरें मर्म दाखविणारे पंडित आज किती आहेत ? ज्ञानाची लालसा, त्यासाठीं परिश्रम, काबाडकष्ट करणारें किती आहेत ?

आणि जे आहेत त्यांचे काय हाल आहेत ? समाज त्यांच्याकडे कोणत्या दृष्टीनें पाहतो ? संपत्ति नाहीं तो विद्वान कसला ? संपत्ति नाहीं तो आदरणीय कसला ? अशा विकृत दृष्टिकोण किती जहालपणें समाजांत शिरला आहे ? त्याला दुरुस्त करण्याचे उपाय आहेत का ? अशी प्रश्नांची मालिकाच मालिका ! या असंख्य प्रश्नांचीं उत्तरें शोधून कोण काढणार ? केवळ

प्रश्नच प्रश्न ? उत्तरें नाहींतच कीं काय ? उत्तरें मिळणार नसतील तर या प्रश्नाचें काय ?

असा सारा चर्चेचा भाग होता. चर्चेचा भाग कांहींसा नैराश्याचा होता. कारण तिथें प्रश्नच प्रश्न होते, उत्तरें नव्हतीं व तीं सांपडत नव्हतीं.

यावर त्या माझ्या मित्रानें एकच उत्तर दिलें व तें म्हणजे मी सचित आहे. काळजी वाटते. मग त्याने खुशाल एक सिगारेट पेटविली. तो धूर सोडीत बसला. मला त्याचा थोडासा राग आला. समाजाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न चर्चिला जात आहे आणि हा तर भलताच थंड आहे. शांत आहे. पेटलेला नाहीं.

मी म्हणालों--' हें काय ? तुम्ही समाजासाठीं एवढें करतां. पण तुम्ही समाजाच्या जागृतिसंबंधानें कांहीं सांगत नाहीं ? इतर मागासलेले समाज पुढें जात आहेत. शाळा-कॉलेजेस काढीत आहेत. वर्तमानपत्रें चालवीत आहेत. मग आपला समाजच असा मागे कां ? खरें पाहिलें तर जैन जागृतीचें महान् पर्व सुरूं करायला हाच क्षण आहे. सरकार मदतीला उभें आहे. समाजाला जागृत केलें तर भारतीय समाजांत जैन समाजाची प्रतिष्ठा वाढेल. बुद्धि, पैसा व उच्चप्रकारची खरी सामाजिकता समाजाला लाभेल. पैशाचीं खोटी प्रतिष्ठा हळूहळू कमी होणार आहे. श्रम व बुद्धिकौशल्य यांचें नवें युग येत आहे. अशावेळीं जर आपण आपली चालू पिढी योग्य केली नाहीं तर अक्षम्य असा गुन्हा ठरणार नाहीं काय ?–'

तो म्हणाला--' तुम्ही भावनेच्या आहारी जाताहात ! समाजाला हें कळत नसेल तर त्याला तुम्ही पटवून द्या. घरोघरीं हें जाऊन सांगा. तें एक जीवनाचें मिशन ( ध्येय ) समजा. कुणी तरी तें करावें. याला वाहून घेणारीं वेडीं माणसें असतात. तुम्ही गुरुकुलांतील माणसें हीं कामें कराल असें वाटलें होतें. पण समाज तशीं माणसें या न्यायानें तुम्हीं गुरुकुल स्नातकांनाहि परिस्थितिविवश का होईना मिशन दूर सारावे लागले व पैसा पाहावाच लागला, तुम्ही ध्येयच्युत होत आहांत. नंतर तो म्हणाला–' माफ करा हं !' हें माझें म्हणणें धाडसाचें व आक्षेपार्ह आहे. मला हें विधान करायचा अधिकार नाहीं. जीवन कसें घालवावें हा ज्याचा त्याचा अधिकार

आहे. हक्क आहे. पण अशी ध्येय–वेडी माणसें बनविणारी एक तरी संस्था असावी. खपणारी माणसें ! कशाकडेहि लक्ष नाहीं ! समाजांच्या वेडचा–वाकडचा आप्रसंगिक बोलांची, खोटचानाटचा आक्षेपविक्षेपांचीहि चिंता करण्यापेक्षां आपल्या ध्येयाचीच चिंता करणारी मंडळी अधिक संख्येंत हवी आहेत. समाज काय म्हणेल ? आपलें काय होईल ? याचा विचार न करणारी माणसें निर्माण झालीं पाहिजेत.'

आणि दुसरी बाजूहि आहे त्याला. समाजाने जरी अशा माणसाकडे दुर्लक्ष केलें तरी त्यागावर उभ्या असणाऱ्या संस्थांनी तरी अशा माणसांचा संग्रह केला पाहिजे, त्यांच्या कार्याचा गौरव केला पाहिजे. त्यांना मदत केली पाहिजे. पण दुर्दैवानें तसें घडलेलें, घडणारें दिसत नाहीं. त्यांच्यांत असावें तसें व तितकें सौदार्ह नाहीं. कां नाहीं ? ह्याची चर्चा करण्याची माझी इच्छा नाही. कारण कांहीं गोष्टी कालान्तरानें बदलतील याबर विश्वास ठेवावा लागतो. बदल करावयास धडपडणारीं माणसें हवींत. पण तीं फार शहाणी, समयज्ञ व चतुर असावी लागतात. बदल आणि तोहि चांगल्यासाठीं बदल हवा आहे.'

त्यांच्या अंतर्यामीं कांहीं तरी बदलत होतें त्याला अधिक स्पष्ट बोलायला हवें होतें. पण तो बोलत नसावा असें मला वाटलें. बोलून तरी तो काय करणार ? साऱ्याचें जीवन अश्रद्ध–ध्येयहीन ! मरतां येत नाहीं म्हणून जगणाऱ्यांच्या जातीचें ! तेव्हां त्याच्या टीकेचा भाग सोडला तरी यांतून सामाजिक-दृष्टि काय आहे हें मात्र मला कळालें.

त्यागाच्या आश्रयानें उभ्या असलेल्या संस्थानीं व संस्थेच्या घटकांनी सर्व प्रकारच्या समाजसेवकांच्या त्यागाचें कौतुक करावें, प्रोत्साहन द्यावें व नवीन नवीन कार्यकर्त्यांचा शोध घेऊन कार्यांची प्रगति करावी.

कार्यकर्ते कां मिळत नाहींत ? याचाहि उहापोह झाला. सामाजिक कार्य ही सुळावरची पोळी आहे अशी भीति जगांत निर्माण झाली आहे. याचे कारण गेल्या अनेक पिढींतून निर्माण झालेल्या कार्यकर्त्यांना दारिद्रय, निंदा आणि बहिष्कार यांचाच घरोबा करावा लागला. पण आतां इतकें घाबरण्याचे कारण नाहीं. सामाजिक कार्यकर्त्यांना शाश्वति वाटेल असें करतां येईल,

पैसा ही त्यागाची कसोटी नाहीं. श्रम हीच कसोटी मानली पाहिजे. पैसा ही खोटी कसोटी आहे. त्याग, कळकळ, अविरत श्रम करण्याची मनाची तयारी, व रक्त जाळण्याची हिम्मत हीच कार्यकर्त्याची कसोटी आहे. कोणत्याहि कार्यकर्त्याच्या कामाची किंमत पैसा देऊन चुकविता येत नाहीं. आईने पाजलेल्या दुधाचें मोल कोणता मूर्ख द्यावयास धजेल? कांहीं गोष्टींचें मोल होणेंच शक्य नाहीं. पण समाजांतील कांहीं लोकांना हें मुळींच पटत नाहीं. त्यांचा सर्व विचार पैशाच्या मध्याभोंवतीं गुरफटलेला असतो. पण हा विचार अपूर्ण आहे. कांहीं बाबतींत तो चुकीचा आहे हेंहि त्यांना लक्षांत घ्यावें लागेल.

एकदां सन्मति मासिकाच्या प्रचारासाठीं एका सधन व्यक्तीकडे गेलों. ती व्यक्ति व घरांतलीं माणसें सुशिक्षित होती. 'सन्मतीचे वर्गणीदार व्हा' असें म्हणतांच ते म्हणाले, 'ते पाहा तुमचे अंक गोळा करून तसेंच ठेवलें आहेत. रॅपर देखील फाडलीं नाहींत.' मग एका नोकरानें ते रॅपर न फाडलेले १२–१५ अंक माझ्यासमोर आणून ठेवले. मी सर्द झालों! अगदीं पंचवीस घडे पाणी कुणी अंगावर टाकल्यासारखा सर्द झालों! 'अरसिकेषु कवित्व–निवेदनं शिरसि मा लिख मा लिख।' असें आर्त गीत आळवणाऱ्याची मला आठवण झाली. पण मनांत आले कीं कार्यकर्ताहि याच लोकांसारखा निढावला पाहिजे. निंदेची भरजरी वस्त्रें घालण्याला कार्यकर्त्याएवढीं लायक व्यक्ति या जगांत तरी नसावी. त्या व्यक्तीनें ते अंक व सहा रुपये वर्गणी माझ्याकडे दिली. मी म्हटले, 'अहो अंक तरी ठेवा' ते म्हणाले, 'छे! छे! त्यांत धर्माचे 'कांहीं असतें' तें मुलांच्या हातीं–लाथीं पडून अवमानित होईल. तुम्ही ते घेऊन चला.

अशी मण्डळी भेटतात, पण थोडी. त्या मंडळीमुळें कार्याच्या प्रगतीस अडथळा होतोच असें मात्र नाही. अशा विरोधामुळें कार्य चमकतें व कार्यकर्त्यांला सावधगिरीनें कार्य करण्याचें शिक्षणहि मिळतें.

अर्थात विरोधकांना भांडून दमविणें कार्यघाताचें लक्षण होय हेंहि विसरतां उपयोगी नाहीं. योग्यवेळीं मौन स्वीकारण्याचें व कार्याचा वेळो-

वेळी प्रचार करण्याचेंहि कार्य कार्यकर्त्यांला करावें लागतें. तें केलें नाहीं तर कार्य झालेंच नाहीं अशी समजूत विरोधक पसरवितात.

मी म्हटलें,--' ध्येयानें वेडे होणाऱ्यांना प्रचार आवडेल का ? त्यानें प्रचार स्वतः करावा कां ?'

तो म्हणाला,--' प्रचार हा देखील त्याच्या वेडाचाच भाग आहे आणि विशेषतः हें युग प्रचाराचें आहें. आपलें म्हणणें मांडलें पाहिजे. तर्क-कठोरपणें मांडले पाहिजे. आजच्या जगाला आपण वेडें वाटलों तरी तें कार्य भावी पिढीला आदरणीय वाटेल यांत शंका नाहीं.

' जैनधर्मासंबंधीं जैनांतहि वेडगळ समजुती आहेत. आमच्या धर्मात कांहीं जीव नाहीं, असे म्हणणारे आमच्याकडे आहेत. स्वतःची टर उडवुन घेणें, स्वत्व न बाळगणें या फॅशनच्या गोष्टी झाल्या आहेत. '

मी म्हणालों, ' याला कारण काय ?'

' हेंच कीं, चांगल्यांतील चांगलेपणा यांना कळत नाहीं. चांगलें काय काय आहे हेंहि कळत नाहीं. आपण आपल्याच धर्मासंबंधानें असें बोलावें हें निंद्य न वाटण्या इतपत पारतंत्र्याचा यांच्या मनावर गंभीर परिणाम झाला आहे.

" गुलामी किती वाईट असते याचें हें निदर्शक आहे. स्वधर्म व स्वदेश यांची अहोरात्र निंदा करणाऱ्या या सुशिक्षित (?) वर्गाबद्दल मी तर अधिक सचिंत आहे. समाजाचीं सूत्रें यांच्या हातीं दिलीं तर फारच भयांनक गोष्टी घडणार आहेत. जें निंद्य आहे तें यांना उपास्य वाटतें. आणि जें त्याज्य आहें तें यांना ग्राह्य ! अशा प्रकारची चित्तभ्रान्त माणसेंच अधिक त्रासदायक आहेत. अशा माणसांची चित्तशुद्धि ही महत्त्वाची समस्या आहे.

नंतर तो पुन्हा थांबून म्हणाला, ' आपल्या समाजांत तीन प्रकारची माणसें आहेत. एक तुमच्यासारखी सचिंत. दुसरी संचित आणि तिसरी निश्चित. या तीन प्रकारच्या मनोवृत्तींतून आपणांला पुढें जाण्यासाठीं धडपड करावयाची आहे. साधा शिक्षणाचा प्रश्न घ्या. जैनसमाजाइतक्या पाठशाळा क्वचितच इतर समाजाच्या असतील. हायस्कूल्स् आहेत. पण जैन तरुण शिक्षणाच्या कामीं वाहून घेत नाहींत. तें कार्य गौण आहे. असें त्यांना

अ.क्र. ...... दि: ........ कॉ. दि.

वाटतें. शिक्षकाचा पेशा गौण आणि हीन असें वाटणें शहाणपणाचें द्योतक तर नाहींच उलट स्वकार्यसिद्ध्यर्थ हाच धंदा श्रेयस्कर मानला पाहिजे. जैन समाजांतील तरुण, शिक्षक, प्रोफेसर, रिसर्च स्कॉलर्स बनतील तर हवे आहेत. शिक्षण-संस्थाचें संचालन जैन मंडळींनी करावें, अध्यापनहि जैन मंडळींनी करावे. यांत जातीयता नाहीं. जैन तरुणांनीं पैसा हेंच ध्येय समोर ठेऊन भागावयाचें नाहीं. पैसा काढून घेण्याचें सामर्थ्य पुरे ! नवें जग तयार करावयाला नवी मण्डळी पुढें आली पाहिजे. हें नवें जग म्हणजे शिक्षणक्षेत्र होय. 'बनारस' क्षेत्रीं मालवीयांनीं, 'शांतिनिकेतन' येथें गुरुदेव टागोरांनीं व 'साताऱ्याला' कर्मवीर भाऊराव पाटलांनी जी कामगिरी केली तशी कामगिरी करणारे जैन युवक पुढें यावेत. नव्या पिढीचा खरा दुवा त्यांनाच मिळणार आहे.

शिक्षणासंबंधी तक्रार करणाऱ्यांनी खरें पाहिलें तर तक्रार न करतां नव्या उभारणीसाठीं सिद्ध झालें पाहिजे. तक्रारीच्या सुरांत शिक्षणाच्या प्रगतीचें तुणतुणें वाजविण्यापेक्षां नव्या उमेदीनें शिक्षणक्षेत्रांत उडीं ठोकणारी मण्डळी पुढें आली तर सारें कांहीं ठीक होणार आहे.'

माझ्या मित्राच्या म्हणण्यांतील मुख्य रोख शिक्षणक्षेत्रांतील प्रत्येक शाखेंत जैन तरुण उतरला पाहिजे व त्यानें नव्या उमेदीनें नवें शैक्षणिक विश्व उभें केलें पाहिजे. याकडे होता. पण माझ्या समाजाजी मुख्य अडचण तर तिथेंच होती.

शिक्षक म्हणजे दरिद्री, आणि दारिद्र्यांत जीवन कंठणें त्याला नको आहे. व्याजबट्टा केला तर अशिक्षित माणूस देखील सुशिक्षितांसारखा सर्व बाबतींत सल्ला देतो. हाताखालीं शेंकडों पदवीधर राबवून घेतल्याचा आविर्भाव करतो. एखादे नुसतें स्टोअर्स चालविलें तर शिक्षकांपेक्षां चांगले राहतां येतें. हें सारें खरें आहे व हें तर चालूंच राहणार आहे. परंतु ज्यांनीं दिव्यावर झेंप घेणाऱ्या पतंगाला गुरु केला असेल, 'ॐ भवति भिक्षां देहि' हा मंत्रच जपण्याचें ठरविलें असेल, त्यानें मात्र या अग्निकुंडांत उडी घ्यावी. स्त्रिया शीलासाठीं जोहार करतात हें याच देशानें

सिद्ध केलें आहे. मनुष्य म्हणविणाऱ्या प्राण्यानें खऱ्या शैक्षणिक कार्यास जुंपून घ्यावें हा एक मार्ग आहे '–मी म्हणालों.

तो म्हणाला–' समाजाचा विचार करीत बसलों तर आडचणी फार. कार्य करीत राहणें याच्या पलीकडे ' आपल्या हातीं तरी काय ? ज्यांच्या मागें समाज आहे अशा त्यागी जनांना या कार्याचीं गोडी नाहीं. ज्यांना गोडी आहे अशांच्या मागे त्यागी वर्गहि नाहीं व समाजहि नाहीं. आपल्या समाजांत आजहि समाजसेवा म्हणजे अग्निकाष्ठ भक्षण करण्यासारखें आहे. हीं भक्षण करणारीं कांहीं धडाडीचीं माणसेंहि आहेत. घरचें खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याची जी म्हण वाईट अर्थानें रूढ आहे ती आपत्तीच्या वेळीं गरजेच्या वेळीं, आवश्यक आहे. बिहार येथें बारा वर्षाचा जो दुष्काळ पडल्याचा प्राचीन उल्लेख आहे त्यावेळी जैन समाजाची जी स्थिति झाली होती ती आपण विसरलों आहोंत. पण आजहि जैन समाजांतील विविध थरांतून भयंकर उद्वेगजनक अवस्था आहे. त्या थरांतून तो बाहेर पडावा असे प्रयत्न झाले पाहिजेत. त्या जमातीच्या उत्थानासाठीं झटणारी मंडळी हवी आहेत. म्हणूनच मी म्हणालों होतों की, तुमच्या गुरुकुलांतील मंडळींनीं आत्मसंशोधन करावें व यासाठीं ती मंडळी काय करायला तयार आहेत याचाहि विचार करावा. गुरुदेवांचें जीवन आतां सर्वच दृष्टीनें निर्लेप झालेलें आहे. अशा वेळीं कांहींनी पुढे येऊन त्यांच्या कार्याची धुरा स्वीकारली पाहिजे. असें नाही का तुम्हाला वाटत ?

मी म्हणालों–' वाटतें. पण मी सध्यां या संबंधानें एवढेंच सांगतो कीं तुम्ही ज्याप्रमाणें संचित आहांत तसाच मीहि संचित आहे. संचित ( Wealthy ) असतों तर तुमच्यांतील कांहींचा संचितपणा दूर करतां आला असता. लक्ष्मी मुक्तहस्ताने विखरून टाकणारा भामाशाह अवश्य पैदा होईल याची खात्री असूनहि मी तुझ्यासारखाच संचित आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
दा. क्र. १३० अनुक्रम ३५५५८ वि:
नों दि: 15-11-58

REFBK-0013749
REFBK-0013749